# सुवार्ता म्हणजे काय?

निर्णायक प्रश्न मालिका

आर. सी. स्प्रॉल

# सुवार्ता म्हणजे काय?

CQ

# सुवार्ता म्हणजे काय?

आर. सी. स्प्रौल

*Originally translated in English under the title:*

**What is the Gospel?**
© 2020 by R.C Sproul
Published by Ligonier Ministries
421 Ligonier Court, Sanford, FL 32771
Ligonier.org
Translated by permission. All rights reserved.
***First Marathi Translation and Print 2026***
*Translated and Published by*
Soli Deo Gloria Publishing

मराठी भाषांतर व मुद्रण २०२६
सोली डियो ग्लोरिया पब्लिशिंगद्वारे अनुवादित व प्रकाशित

# अनुक्रमणिका


**प्रकरण** १ देवाची सुवार्ता . . . . . . . . . . . . . . . . . . 7

**प्रकरण** २ तारणाचे सामर्थ्य . . . . . . . . . . . . . . . . 15

**प्रकरण** ३ येशू एकमेव तारणारा . . . . . . . . . . . . . . 25

**प्रकरण** ४ येशू : देव - मनुष्य . . . . . . . . . . . . . . 33

**प्रकरण** ५ परिपूर्ण यज्ञार्पण . . . . . . . . . . . . . . . . 43

**प्रकरण** ६ पुनरुत्थान आणि नीतिमान ठरणे . . . . . . . . . . 53

**प्रकरण** ७ नीतिमान गणले जाणे . . . . . . . . . . . . . . 63

**प्रकरण** ८ ख्रिस्ताचे नीतिमत्त्व . . . . . . . . . . . . . . . 71

**प्रकरण** ९ जीवन बदलणारी सुवार्ता . . . . . . . . . . . . . 79

**प्रकरण** १० तारणदायी विश्वास . . . . . . . . . . . . . . . 85

**प्रकरण** ११ ख्रिस्त आणि धर्मसिद्धांत . . . . . . . . . . . . 93

**प्रकरण** १२ सुवार्तेची घोषणा . . . . . . . . . . . . . . . . .101

## प्रकरण १

# देवाची सुवार्ता

सुवार्ता म्हणजे काय? आपल्या समोर उभ्या राहणाऱ्या प्रश्नांमध्ये कदाचित याहून अधिक महत्त्वाचा दुसरा प्रश्न नाही, कारण आपण जे उत्तर देऊ, त्यावर आपल्या सार्वकालिक भवितव्याचा निर्णय अवलंबून असणार आहे. दुर्दैवाने, आज स्वतःला इव्हॅन्जेलिकल्स (सुवार्तावादी) म्हणवून घेणाऱ्यां-मध्येही सुवार्ता नेमकी काय आहे याविषयी मोठ्या प्रमाणावर अज्ञान दिसून येते. तिचा आशय काय आहे? ती चांगली वार्ता कोणती, ती चांगली का आहे, आणि येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेवर विश्वास ठेवणे म्हणजे नेमके काय? म्हणून केवळ सुवार्तेचा उगमच नव्हे, तर सुवार्तेचा अर्थ देखील आपल्याला समजला पाहिजे. आपण ख्रिस्ती लोकांनी सुवार्ता अचूकरीत्या समजून घेतली पाहिजे, कारण जर येथेच आपण चुकलो, तर ख्रिस्तावरील आपल्या विश्वासाच्या परिपूर्णतेचे आकलनही इतर बाबतींत फारसे योग्य होणार नाही.

## सुवार्ता म्हणजे काय?

सुवार्ता आपल्याला सांगते की, आपण आपल्या पापापासून तारण कसे पावू शकतो. जर आपण हा मुद्दा समजण्यास चुकलो, तर गलतीकरांस पत्र १:६-९ मध्ये पौल म्हणतो त्याप्रमाणे आपण शापित ठरतो. पण जर आपण हा मुद्दा योग्य रीतीने समजून घेतला, तर आपल्यासाठी आशा आहे. म्हणून आपण कशा प्रकारे तारण पावू शकतो, याविषयी देव आपल्याला काय सांगतो, हे स्पष्टपणे मांडता यावे, यासाठी आपण पवित्र शास्त्रात अत्यंत काळजीपूर्वक शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

फेब्रुवारी १९९८ मध्ये वॉशिंग्टन, डी.सी. येथे सुवार्तावादी पुढाऱ्यांची जी सभा भरली, तिचे ध्येय हेच होते. त्या सभेतील सहभागींनी मान्य केले की सुवार्तावादी जगतात काही गंभीर समस्या निर्माण झाल्या होत्या, आणि त्या सोळाव्या शतकातील प्रोटेस्टंट रिफॉर्मेशनपासून घडून आलेल्या ऐक्याच्या विघटनाचे प्रतिबिंब होत्या. हे असे ऐक्य होते जे ४५० वर्षे दृढ राहिले होते. आणि जरी सुवार्तावादी मंडळ्यांमध्ये ईश्वरशास्त्राच्या अनेक मुद्द्यांवर मत-भेद होते, तरी केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताच्या मध्यवर्ती पुष्टीकरणाच्या बाबतीत त्यांनी नेहमीच ऐक्याची भावना टिकवून ठेवली होती. ऐतिहासिकदृष्ट्या सुवार्तावाद्यांनी या सिद्धांताला नव्या करारा-तील सुवार्तेचा अत्यावश्यक घटक मानले होते.

या सुमारास, आपल्या काळातील सर्वांत निकडीच्या ईश्वरशास्त्रीय प्रश्नांवर विचार करण्यासाठी अलायन्स ऑफ कन्फेसिंग इव्हॅन्जेलिकल्सची फिलाडेल्फिया येथे सभा भरली. या गटाने मान्य केले की ईश्वरशास्त्रीय दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न सुवार्ता हाच होता. फिलाडेल्फिया आणि वॉशिंग्टन येथील बैठकींच्या परिणामी, विशेषतः नीतिमत्त्वप्राप्तीच्या आपल्या आकलनात सुवार्तावाद्यांमध्ये पुन्हा ऐक्य प्रस्थापित व्हावे, या हेतूने विश्वासाचे एक संयुक्त विधान तयार करण्यात आले.

या घोषणापत्राला "द गॉस्पेल ऑफ जीझस क्राइस्ट : ॲन इव्हॅन्जेलिकल सेलिब्रेशन" असे म्हटले जाते, आणि ते दोन भागांत विभागलेले आहे. पहिला भाग पुष्टी करण्यात आलेल्या मुख्य मुद्द्यांचा सारांश मांडतो. तो तांत्रिक ईश्वरशास्त्रीय विधानांना टाळून सामान्य लोकांच्या भाषेत सुवार्तेचे स्पष्टीकरण करतो. दुसरा भाग पुष्टीकरणे आणि नकार या स्वरूपाचे अनुसरण करून अधिक अचूक ईश्वरशास्त्रीय भाषेत आपली विश्वास - निवेदने मांडतो. सुवार्तेच्या संदेशाची स्पष्ट मांडणी व्हावी, यासाठी हे पुस्तक त्याच पुष्टीकरणांची आणि नकारांची सविस्तर पाहणी करणार आहे.*

ती पार्श्वभूमी ध्यानात घेऊन, आता आपण त्या विश्वास-निवेदनांकडे आपले लक्ष वळवूया. पुष्टीकरण १ असे म्हणते:

> आम्ही पुष्टी करतो की मंडळीच्या स्वाधीन करण्यात आलेली सुवार्ता ही प्रथमदर्शनी देवाची सुवार्ता आहे (मार्क १:१४; रोम. १:१). देवच हिचा कर्ता आहे, आणि तो तिला त्याच्या वचनात व त्याच्या वचनाद्वारे आम्हांवर प्रकट करतो. केवळ तोच तिचा अधिकार आणि तिचे सत्य यांचा पाया हा आहे.
>
> त्यास अनुसरून नकार पुढीलप्रमाणे आहे:
>
> आम्ही नाकारतो की सुवार्तेचे सत्य किंवा अधिकार कोणत्याही मानवी अंतर्दृष्टीतून किंवा कल्पक रचनेतून उद्भवतो (गलती. १:१–११). तसेच आम्ही हेही नाकारतो की सुवार्तेचे सत्य किंवा अधिकार कोणत्याही विशिष्ट मंडळीच्या किंवा मानवी संस्थेच्या अधिकारावर अवलंबून आहे.

* तुम्ही ते पूर्ण विश्वास-निवेदन येथे पाहू शकता : *https://www.ligonier.org/learn/articles/gospel-jesus-christ-evangelical-celebration.*

## सुवार्ता म्हणजे काय?

हा पहिला लेख पुष्टी करतो की देव सुवार्तेचा कर्ता आणि स्वामी आहे. रोमकरांस लिहिलेल्या आपल्या पत्रात पौल असे लिहितो, “ख्रिस्त येशूचा दास, प्रेषित होण्यासाठी पाचारण केलेला, देवाच्या सुवार्तेसाठी वेगळा केलेला पौल याजकडून. ही सुवार्ता देवाने पवित्र शास्त्रात आपल्या संदेष्ट्यांच्या द्वारे पूर्वीच अभिवचन देऊन ठेवली होती” (रोम. १:१-२). येथे पौल “देवाची सुवार्ता” हा शब्दप्रयोग करतो. जेव्हा तो देवा*च्या* सुवार्तेविषयी बोलतो, तेव्हा तो आपल्याला हे दाखवितो की सुवार्तेचा संदेश हा केवळ देवा*विषयीचा* संदेश नाही, जरी तो खचितच त्याच्याविषयी देखील आहे. परंतु येथे “देवाच्या” या शब्दात *“च्या”* साठी जो ग्रीक भाषेतील आहे त्या शब्दाचा अर्थ असा होतो की ही सुवार्ता देवा*ची* आहे, ती त्याचीच आहे. ही त्याची घोषणा आहे. हा त्याचाच संदेश आहे. सुवार्तेचा उगम, किंवा तिचा लेखक व कर्ता, तोच आहे.

*“कर्ता”* आणि *“अधिकार”* या शब्दांमध्येही जवळचा संबंध असल्याचे आपल्याला दिसते. देवच  तो आहे जो प्रामुख्याने सुवार्तेची घोषणा करतो. तोच तिचा मूळ उगम आणि कर्ता आहे, आणि तिचा स्वामी व कर्ता या नात्याने तोच सुवार्तेला तिचा कायमस्वरूपी अधिकार देतो. म्हणून आपण ख्रिस्ती म्हणून ज्या संदेशाची घोषणा करतो आणि ज्याला *सुवार्ता* म्हणतो, तो एखाद्या प्राचीन धार्मिक शिक्षकाने सुचवून काढलेली कल्पना नाही. आपण जुन्या करारातही सुवार्तेच्या घोषणेचे संकेत पाहतो, आणि नव्या करारातील मंडळीने तर सुवार्ता थेट ख्रिस्ताकडून आणि त्याच्या प्रेषितांकडूनच प्राप्त केली. असे म्हणता येईल की सुवार्तेचा पहिला महान थोर प्रेषित प्रत्यक्षांत ख्रिस्तच आहे. परंतु ख्रिस्ताने सुवार्तेची घोषणा केली तेव्हाही तो पित्याची इच्छा पूर्ण करीत होता. ही घोषणा करण्यासाठी पुत्राला पित्यानेच पाठविले. आपल्या समकालीन लोकांशी हे बोलण्याचा अधिकारही पित्यानेच पुत्राला दिला होता (योहान. ५:१९, ३०).

सोळाव्या शतकातील रिफॉर्मेशनच्या (धर्मसुधारणेच्या) काळात आमचे नीतिमान ठरविले जाणे या विषयासंबंधीचा प्रश्न हा एक मध्यवर्ती प्रश्न होता. सुधारकांनी *'सोला फिडे'* या सिद्धांताचा पुरस्कार केला. याचा अर्थ असा की, आपण कर्मांवाचून केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जातो. यालाच अनेकदा रिफॉर्मेशनचे 'भौतिक कारण' *(material cause)* असे म्हटले जाते. आपण कशा रीतीने नीतिमान ठरविले जातो, हा प्रश्न सुवार्तेच्या केंद्रस्थानी आहे. आणि रिफॉर्मेशनच्या काळात या प्रश्नाला असलेल्या निर्णायक महत्त्वामुळेच प्रोटेस्टंट लोक *"इव्हॅन्जेलिकल्स"* म्हणून ओळखले जाऊ लागले. *"इव्हॅन्जेलिकल"* हा शब्द ग्रीक युअँजेलिऑन या शब्दापासून आलेला आहे, आणि तो नव्या करारात "सुवार्ता" या अर्थाने वापरला जातो. प्रोटेस्टंट धर्मसुधारकांना "इव्हॅन्जेलिकल्स" असे म्हटले गेले कारण त्यांचा असा विश्वास होता की नीतिमत्त्वप्राप्तीच्या सिद्धांताशी संबंधित वादात, पणाला लागलेली मध्यवर्ती गोष्ट म्हणजे स्वतः सुवार्तेचा आशय हीच होती. परंतु या संपूर्ण वादाच्या मागे अधिकाराबद्दलचा सतत चालणारा वाद होता.

मार्टिन लूथर यांनी आपल्या जननी-मंडळीच्या शिकवणीशी मतभेद करण्याचे धाडस नेमके कोणत्या आधारावर केले? लूथरांना सार्वजनिकरीत्या हे मान्य करावे लागले की, त्यांनी जो पवित्रा घेतला होता त्यानुसार पोप आणि मंडळीच्या परिषदाही चुकू शकतात. त्यांनी असे म्हटले की, त्यांची शिकवण पवित्र शास्त्राशी विसंगत आहे, हे जर त्यांना सिद्ध करून दाखविण्यात आले, तर नीतिमान ठरविले जाणे या विषयावरील आपली भूमिका बदलण्यास ते तयार आहेत. लूथरांच्या दृष्टीने अंतिम अधिकार पवित्र शास्त्राचा, आणि केवळ पवित्र शास्त्राचाच, होता. १५२१ मध्ये डाएट ऑफ वर्म्स येथे, लूथरवर खटला सुरू असताना जेव्हा त्यांना आपली शिकवण मागे घेण्यास सांगितले गेले, तेव्हा हा निर्णायक क्षण आला. त्यावेळी त्यांनी आपले हे सुप्रसिद्ध कथन केले: "जोपर्यंत पवित्र शास्त्र आणि स्पष्ट तर्क यांच्या आधाराने माझी खातरी

पटवून दिली जात नाही, आणि स्वतःशी वारंवार विसंगत ठरलेल्या पोप व परिषदांच्या आधारे नाही, तोपर्यंत माझी विवेकबुद्धी ही देवाच्या वचनाला बंदिस्त आहे. विवेकबुद्धीच्या विरुद्ध जाणे हे ना योग्य आहे, ना सुरक्षित. मी माझे शब्द मागे घेऊ शकत नाही आणि घेणार नाही.”

या प्रतिपादनात रिफॉर्मेशनचे ‘औपचारिक कारण’ जाहीरपणे व्यक्त झाले होते: विश्वासणाऱ्याच्या विवेकावर बंधनकारक अधिकार केवळ पवित्र शास्त्राचाच आहे. रोमने असा युक्तिवाद केला की पवित्र शास्त्राचा अधिकार हा पूर्वीपासून असलेल्या मंडळीच्या अधिकारावर आधारलेला आहे, आणि मंडळीच आहे जी पवित्र शास्त्राच्या प्रारंभिक अधिकाराची घोषणा करते.

लक्षात ठेवा की पहिले पुष्टीकरण असे सांगते की देव सुवार्तेचा कर्ता आहे; तो तिला आपल्या वचनात आणि आपल्या वचनाद्वारे आम्हावर प्रकट करतो, आणि तिचा *अधिकार* व सत्य यांचा पाया केवळ तोच आहे. आपल्या विवेकबुद्धीला बांधून ठेवण्याचा अंतिम आणि निरपेक्ष अधिकार हा केवळ देवाच्या वचनालाच आहे. त्याचप्रमाणे, नकार असे म्हणतो: “आम्ही नाकारतो की सुवार्तेचे सत्य किंवा अधिकार कोणत्याही मानवी अंतर्दृष्टीतून किंवा कल्पक रचनेतून उद्भवतो. तसेच आम्ही हेही नाकारतो की सुवार्तेचे सत्य किंवा अधिकार कोणत्याही विशिष्ट मंडळीच्या किंवा कोणत्याही मानवी संस्थेच्या अधिकारावर आधारलेला आहे.” सुवार्तेचा अधिकार देवावर, आणि केवळ देवावरच, आधारलेला आहे.

जेव्हा आपण सुवार्तेची घोषणा करतो आणि तिचा प्रचार - प्रसार करतो, तेव्हा आपण ते दैवी अधिकाराच्या छत्राखाली राहूनच करतो. आपण मानव म्हणून आपल्या स्वतःच्या अधिकाराच्या आधारावर कोणालाही येशू ख्रिस्तावर आपला तारणारा म्हणून विश्वास ठेवण्यास पाचारण करू शकत नाही. उलट, जेव्हा आपण सुवार्तेचा प्रचार करतो, तेव्हा आपण केवळ संदेशवाहक असतो; आपण देवातच उगम पावलेल्या संदेशाचे संप्रेषण

(दळणवळण) करीत असतो. पौल रोमकरांस पत्राच्या प्रारंभी नेमके हेच सांगतो. सुवार्तेच्या आशयाचे विवेचन सुरू करण्यापूर्वी तो स्वतःची ओळख प्रेषित म्हणून करून देतो, म्हणजे देवाकडून पाचारण केलेला आणि त्याच्याद्वारे वेगळा केलेला मनुष्य म्हणून. परंतु तो जो संदेश देत आहे, तो पौलाने स्वतः घडविलेला नव्हता. पौलाचा प्रेषितीय अधिकार हा त्या संदेशाचा अंतिम अधिकार नाही. देवच त्याची घोषणा करतो. देवच त्याचा स्वामी आहे. देवच त्याला अधिकारयुक्त बनवतो.

प्रकरण २

# तारणाचे सामर्थ्य

“द गॉस्पेल ऑफ जीझस क्राइस्ट: ॲन इव्हॅन्जेलिकल सेलिब्रेशन” या घोषणापत्रातील अनुच्छेद २ आणि ३ मधील पुष्टीकरणे ही नव्या करारातील सत्यात मुळावलेली आणि आधारलेली आहेत. अनुच्छेद २ आपल्या आध्यात्मिक जीवनातील परिणामकारक सामर्थ्यासाठी देवाकडे आणि त्याच्या सुवार्तेकडे पाहण्याच्या गरजेवर लक्ष केंद्रित करतो. अनुच्छेद ३ मधील पुष्टीकरण वाचताना, त्यातली “शुभवार्ता” नेमकी कोठे आहे, असा आपल्या मनात प्रश्न उत्पन्न होऊन आपण विचारात पडू शकतो.

पुष्टीकरण २ असे म्हणते:

> आम्ही पुष्टी करतो की सुवार्ता ही तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे; कारण ही सुवार्ता कोणताही पक्षपात न करता विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकामध्ये तारण घडवून आणते (रोम. १:१६).

सुवार्तेचा हा प्रभावकारकपणा स्वतः देवाच्या सामर्थ्यामुळे आहे (१ करिंथ. १:१८).

त्यास अनुसरून नकार असा आहे:

आम्ही नाकारतो की सुवार्तेचे सामर्थ्य प्रचारकाच्या वक्तृत्व कौशल्यावर, सुवार्तिकाच्या तंत्रावर, किंवा तर्कसंगत युक्तिवादाच्या मनधरणीवर आधारलेले आहे (१ करिंथ. १:२१; २:१-५).

पौल असे लिहितो: "हेल्लेणी व बर्बर, ज्ञानी व अज्ञानी, ह्यांचा मी ऋणी आहे. ह्याप्रमाणे रोम शहरात राहणाऱ्या तुम्हांलाही सुवार्ता सांगण्यास मी अगदी उत्सुक आहे. कारण मला [ख्रिस्ताच्या] सुवार्तेची लाज वाटत नाही; कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला, प्रथम यहूद्याला व मग हेल्लेण्याला, तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे" (रोम. १:१४-१६). येथे पौल या सुवार्तेचा अर्थ व आशय स्पष्ट करत आहे, आणि तसे करताना तो हे म्हणतो की *ती तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे.*

हे प्रतिपादन ऐतिहासिक सुवार्तावादी ख्रिस्ती विश्वासासाठी इतके स्वयंसिद्ध आहे की, आज अशा प्रकारचे पुष्टीकरण करण्याची गरजच का भासावी, असा प्रश्न आपल्याला पडू शकतो. सुवार्ता ही तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे, या उघड सत्याकडे पुन्हा लक्ष वेधण्याचे कारण काय? आणि आपल्या प्रतिपादनातील नकारामध्येही, देवाचे तारणारे सामर्थ्य हे सुवार्तिकाच्या तंत्रांवर, प्रचारकाच्या वक्तृत्व कौशल्यावर, किंवा तर्कसंगत युक्तिवादाच्या चातुर्यावर अवलंबून आहे, या कल्पनांना फेटाळून लावणे का आवश्यक ठरते? मला असे वाटते की आपल्या काळात अशा प्रतिपादनाची गरज यासाठी आहे की, आपण देवाच्या वचनाचा अभ्यास करण्याऐवजी विपणनाच्या म्हणजे मार्केटिंगच्या तंत्रांचा अभ्यास करण्यात अधिकच पारंगत झालो आहोत, आणि लोकांना तारणाच्या स्थितीत आणण्याचे कार्य

हे काही विशिष्ट कार्यक्रम साध्य करतील, अशा उपाययोजनांवर आपण अनेकदा आपली आशा ठेवतो. हळूहळू आपण असा समज करून घेतो की लोकांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य आपल्या उपाययोजनेत किंवा आपल्या पद्धतींत आहे. आणि काही वेळा तर आपण आपल्या तंत्रांच्या मोहात इतके गुरफटून जातो की, सुवार्तेचे स्पष्ट आणि निर्भीड सादरीकरण नकारात्मक परिणाम घडवून आणील, अशीच भीती आपल्याला वाटू लागते.

ल्युथर यांनी सावधगिरीचा इशारा दिला होता की, जेव्हा जेव्हा सुवार्तेची घोषणा ही अगदी स्पष्टतेने आणि निर्भीडपणे केली जाते, तेव्हा तेव्हा तिचा परिणाम संघर्षरूपानेच प्रकट होतो. आणि हाच तो संघर्ष आहे की, ज्याला टाळण्यासाठी अनेक जण जीवापाड धडपड करीत असतात. काही प्रसंगी आपण सुवार्तेलाच अस्पष्ट करून टाकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतो, कारण आपल्या मंडळीत संघर्ष निर्माण करण्याचे तिचे सामर्थ्य नकारात्मक ठरेल, अशी भीती आपल्याला वाटत असते. त्यामुळे आपण सुवार्ता सोडून इतर सर्व गोष्टींवर लक्ष केंद्रित करतो, आणि हे विसरून जातो की देवाने त्याचे सामर्थ्य, तसेच पवित्र आत्म्याचे सामर्थ्यही, अगदी सुवार्तेमध्येच देऊ केले आहे.

पौल जेव्हा म्हणतो की सुवार्ता ही तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे, तेव्हा तो हे सांगत आहे की मानवजातीची मुक्ती घडवून आणण्यासाठी देवाने स्वर्गीय संपत्तीचे सामर्थ्य याच संदेशात देऊन ठेवले आहे. देवच आपल्या सुवार्तेला सामर्थ्य देतो. पवित्र आत्मा देखील ह्याच सुवार्तेच्या सोबतीने कार्य करतो, आणि जगाला पापाविषयी व नीतिमत्वाविषयी दोषी ठरविण्यासाठी, तसेच लोकांना विश्वास आणि सार्वकालिक जीवनप्राप्तीसाठी जीवंत करावे म्हणून, सुवार्तेचा साधन म्हणून उपयोग करण्याचे अभिवचन देतो. जर आपण त्या सामर्थ्याची जोडच तोडून टाकली आणि तिच्या जागी दुसरे काही मानवी सामर्थ्य उभे करण्याचा प्रयत्न केला, तर आपण मंडळीचे संपूर्ण ध्येय

समजण्यास चूक करत आहोत.

आपल्याला पुन्हा पुन्हा या गोष्टीची आठवण करून देणे अगत्याचे आहे की, आपल्या मंडळ्यांमध्ये देवाची आणि पवित्र आत्म्याची सामर्थ्यपूर्ण उपस्थिती पाहावयाची असेल, तर हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की ते सामर्थ्य सुवार्तेच्या प्रचाराद्वारेच मुक्त होते. होय, संघर्ष होईल. होय, काही जण अडखळतील. परंतु विश्वासूपणा राखण्यासाठीची किंमत हीच असते, आणि लोकांना तारणाकडे आणण्यासाठी देव जे सामर्थ्य उपयोगात आणतो, त्याची किंमतही हीच असते.

या नकारात असे प्रतिपादन करण्यात आले आहे की सुवार्ता प्रचारकाच्या वक्तृत्व कौशल्यावर अवलंबून नाही. वक्तृत्व-कौशल्य आपणहूनच काही पाप नाही, आणि प्रचारकांनी आपल्या दानांना अधिक परिपक्व करण्याचा प्रयत्न करण्यातही काही गैर नाही. सेमिनरीतील अभ्यासक्रम प्रचारकांना सार्वजनिक भाषणाच्या सुदृढ पद्धती शिकविण्यास, तसेच आपल्या प्रवचनातील आशय शिस्तबद्ध रीतीने मांडण्यास साहाय्य करतात. परंतु सुवार्तेच्या परिणामकारकतेला सामर्थ्य पुरविणारे साधन म्हणून आपण अशा बाह्य रूपांवर किंवा वक्तृत्वकौशल्यावर भरवसा ठेवत नाही. पौल लिहितो:

> कारण ज्यांचा नाश होत आहे त्यांना वधस्तंभाविषयीचा संदेश मूर्खपणाचा आहे; पण ज्यांना तारण प्राप्त होत आहे अशा आपणांस तो देवाचे सामर्थ्य असा आहे.
>
> “कारण मी ज्ञान्यांचे ज्ञान नष्ट करीन,
> व बुद्धिमंतांची बुद्धी व्यर्थ करीन,”
>
> असा शास्त्रलेख आहे. ‘ज्ञानी कोठे राहिला? शास्त्री कोठे राहिला?’ ह्या युगाचा वाद घालणारा ‘कोठे राहिला?’ देवाने जगाचे ‘ज्ञान मूर्खपणाचे ठरवले’ की नाही? कारण जग देवाच्या

ज्ञानाने वेष्टित असताही त्याला आपल्या ज्ञानाच्या योगाने देवाला ओळखता आले नाही, तेव्हा गाजवलेल्या वार्तेच्या मूर्खपणाच्या योगे विश्वास ठेवणाऱ्या लोकांचे तारण करणे देवाला बरे वाटले." (१ करिंथ. १:१८-२१).

आणि पुढे:

"बंधुजनहो, मी तर तुमच्याकडे आलो तो वक्तृत्वाच्या अथवा ज्ञानाच्या श्रेष्ठतेने देवाचे रहस्य तुम्हांला सांगायला आलो असे नाही. कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला. आणि मी तर अशक्त, भयभीत व अतिकंपित असा झालो.तुमचा विश्वास मनुष्यांच्या बुद्धिमत्तेवर उभारलेला नसावा तर देवाच्या सामर्थ्यावर उभारलेला दिसावा म्हणून माझे भाषण व माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळवणाऱ्या शब्दांची नव्हती, तर आत्मा व सामर्थ्य ह्यांची निदर्शक होती." (१ करिंथ. २:१-५).

पौल असे सूचित करत आहे की त्याच्या बोलण्यात काही दोष असू शकतात, परंतु जर त्याची पत्रे पाहिली, तर प्रेषित पौल अस्पष्ट किंवा अडखळत बोलणारा होता, असा आरोप कोणीही त्याच्यावर करणार नाही. निदान त्याच्या लेखनात तरी पौल निःसंशय वक्तृत्वसंपन्न आहे. पौल विलक्षण ज्ञान प्रदर्शित करतो, आणि त्याच्या बुद्धीची कुशाग्रता तसेच त्याच्या तर्कसंगत युक्तिवादाची शक्ती किती प्रभावी आहे. तरीसुद्धा, पौलाने मानवी क्षमतांवर आपला भरवसा ठेवला नाही. त्याची ठाम खातरी अशी होती की सामर्थ्य त्याच्या कौशल्यात किंवा तंत्रात नसून ते देवात होते. आणि

देवाच्या दृष्टीने ज्या गोष्टी ज्ञानी मानल्या जातात, त्या या जगाला अनेकदा मूर्खपणाच्या वाटतात. म्हणून पुन्हा येथे नाकारलेली गोष्ट म्हणजे वक्तृत्वाचे, सुवार्तिकाच्या तंत्रांचे, किंवा तर्कसंगत युक्तिवादाचे मूल्य नव्हे, तर तारण घडवून आणण्याचे सामर्थ्य या गोष्टींमध्ये आहे, या कल्पनेचाच येथे नकार करण्यात आला आहे.

अनुच्छेद ३ मध्ये आपले लक्ष मानवी स्थितीच्या पापमय अवस्थेकडे वळते. पुष्टीकरण ३ असे सांगते:

> आम्ही पुष्टी करतो की सुवार्ता सार्वत्रिक मानवस्थितीविषयी असे निदान करते की ती देवाविरुद्धच्या पापी बंडखोरीची अवस्था आहे, आणि ही अवस्था जर बदलली गेली नाही, तर प्रत्येक मनुष्य देवाच्या दंडाज्ञेच्या दडपणाखाली सार्वकालिक नाशाकडे जाईल.
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> मानवी स्वभावाच्या पतित अवस्थेचा कोणताही नकार, किंवा मानवी वंशाच्या नैसर्गिक चांगुलपणाचा, अथवा त्याच्या देवत्वाचा कोणताही दावा, आम्ही नाकारतो.

सुवार्ता ही चांगली बातमी आहे. ती ख्रिस्ताचे व्यक्तित्व आणि त्याचे कार्य यांचा सारांशरूपाने उलगडा करते, आणि ख्रिस्ताने आपल्या करिता जे काही साध्य केले आहे, त्याचे लाभ आपण कशा रीतीने प्राप्त करू शकतो, हेही सांगते. मग देवासमोरची पापी बंडखोरी ही सर्व मानवांची सार्वत्रिक स्थिती आहे, अशी घोषणा या सुवार्तेचा भाग कशी असू शकते? आणि या घोषणापत्रात असे प्रतिपादन समाविष्ट करण्याची गरजच काय? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी आपण पुन्हा पौलकडे वळू शकतो.

रोमकरांस पत्र १ मध्ये पौल सुवार्तेची ओळख करून देतो, सुवार्ता ही तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे, हे स्पष्ट करतो, आणि त्या सुवार्तेच्या प्रकटीकरणाविषयी बोलतो. पुढे तो सुवार्तेच्या आशयाचे विस्तृत विवेचन करतो. परंतु असे जाणवते की तो त्याआधी जणू मानवाच्या पतित अवस्थेच्या चर्चेकडे वळत आहे. पौल असे लिहितो, "वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रकट होतो" (रोम. १:१८).

रोम. १-३ या संपूर्ण शास्त्रभागात पौल सुवार्तेची गरज का आहे, याची पायाभरणी करतो. आपण ज्या दारुण अवस्थेत पडून आहोत, त्या रोगावरचे औषध म्हणजे सुवार्ता होय. कोणताही वैद्य रोग बरा करण्यापूर्वी प्रथम आपल्या रुग्णाची तपासणी करतो आणि त्याचे निदान ठरवितो. एखाद्याला सुवार्ता ही चांगली बातमी म्हणून ऐकू यावी, यासाठी आवश्यक पूर्वअट हीच आहे की त्याने प्रथम वाईट वार्ता समजून घेतली पाहिजे, म्हणजेच, आपल्याला सर्वप्रथम सुवार्तेची गरजच का आहे, हे स्पष्टपणे उमगले पाहिजे.

मंडळीच्या इतिहासात प्रोटेस्टंट पाळकवर्ग आणि शिक्षकांनी मंडळीतील लोकांना सुवार्तेची गरज समजावून सांगण्यासाठी देवाच्या नियमशास्त्राकडे निर्देश केला आणि त्याचे स्पष्टीकरण केले. जोपर्यंत लोकांना देवाचे नियमशास्त्र समजत नाही, आपण ते मोडले आहे हे कळत नाही, आणि त्यामुळे आपण देवाच्या न्यायाखाली उभे आहोत, ही जाणीव होत नाही, तोपर्यंत सुवार्तेच्या संदेशात त्यांना काहीही शुभ वाटत नाही. आजही अनेक जण सुवार्ता ऐकून, "मग आता काय?" असे म्हणतात; कारण देवासमोर बंडखोर म्हणून आपण ज्या संकटपूर्ण अवस्थेत उभे आहोत, तिची जाणीव त्यांच्या मनाला बोथट झाल्यामुळे उरत नाही.

सुवार्तेच्या केंद्रस्थानी समेटाचा संदेश आहे. आणि समेट होण्यासाठी पूर्वीपासून दुरावा असणे ही एक आवश्यक अट आहे. आज लोक सुवार्ते-

विषयी उत्साहित होत नाहीत, कारण त्यांना असे वाटत नाही की त्यांच्या आणि देवाच्या दरम्यान कोणताही वास्तविक दुरावा आहे. परंतु पवित्र शास्त्र, विशेषतः रोमकरांस पत्र २ आणि ३ मध्ये पौल, हे शिकवितो की सर्व मनुष्यांनी देवाविरुद्ध बंड केले आहे. सर्वांनी त्याच्या सत्याला विकृत केले आहे. देवाच्या सृष्टीतील बंडखोर म्हणून आपण त्याला देव म्हणून गौरव देण्यास आणि त्याचे आभार मानण्यास नकार देतो (रोम. १:२१). हे प्रत्येक मनुष्याविषयी खरे आहे. संपूर्ण जग देवाच्या न्यायासनासमोर दोषी ठरते; कोणीही नीतिमान नाही. कोणीही सत्कृत्ये करीत नाही, आणि सर्वांनी पाप केले आहे व देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत (रोमकरांस ३:१०-१२, २३). जोपर्यंत हे आपल्याला समजत नाही, तोपर्यंत सुवार्तेचे महत्त्व आपल्याला खऱ्या अर्थाने समजू शकत नाही.

आपण केवळ विश्वासानेच नीतिमान ठरविले जातो हा विषय इतका महत्त्वाचा का आहे? कारण देव न्यायी आहे, आणि आपण न्यायी नाही. स्वर्ग व पृथ्वीवर राज्य करणारा देव पवित्र आणि न्यायी आहे; तो आपल्या परिपूर्ण न्यायानुसार आपला न्याय करील, आणि आपण तर अन्यायी आहोत. जर देवाने आपल्या न्यायाच्या निकषानुसार आपला न्याय केला, तर आपण सार्वकालिकरीत्या त्याच्या दंडाज्ञेखाली राहू. जोपर्यंत या गोष्टी आपल्याला कळत नाहीत, तोपर्यंत नीतिमान ठरविले जाणे हा सिद्धांत आपल्याला किरकोळ, किंबहुना तुच्छच वाटतो. पण देव न्यायी आहे आणि आपण न्यायी नाही, हे जेव्हा आपल्याला समजते, तेव्हा अन्यायी मनुष्य पवित्र आणि न्यायी देवाच्या दृष्टीने नीतिमान कसा ठरू शकतो, हा प्रश्न आपल्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न बनतो (रोम. ३:२१-२८). म्हणूनच अनुच्छेद ३ मधील नकार असे म्हणतो की, मानवी स्वभावाच्या पतित अवस्थेचा कोणताही नकार, किंवा मानवी वंशाच्या नैसर्गिक चांगुलपणाचा, अथवा त्याच्या देवत्वाचा कोणताही दावा, आम्ही नाकारतो.

## तारणाचे सामर्थ्य

लिगोनियरच्या “स्टेट ऑफ थिओलॉजी” या सर्वेक्षणाला उत्तर देणाऱ्या स्वतःला सुवार्तावादी म्हणवून घेणाऱ्यांपैकी ५५ टक्के लोकांनी या कथनाबरोबर आपली सहमती दर्शविली की, प्रत्येकजण थोडेफार पाप करीत असला, तरी बहुतेक लोक स्वभावतः चांगले असतात. हा दृष्टिकोन मूळ पापाच्या वास्तवाचा आणि तारणाऱ्याविषयीच्या आपल्या गरजेचा नकार करतो, आणि तो भयावह आहे. जो कोणी यावर विश्वास ठेवतो, तो वाळूच्या पायावर उभा आहे, आणि देवाच्या न्यायासनासमोर टिकू न शकण्याच्या गंभीर अशा संकटात पडलेला आहे. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की आपला जन्मच पापात झाला आणि आपण देवाच्या न्यायी दंडाज्ञेच्या खाली आहोत (इफिस. २:१-३). आपण स्वतःमध्ये चांगले नाही, आणि आपण स्वतःचे तारण करू शकत नाही; आपल्याला तारणाऱ्याची गरज आहे. आपल्या पापामुळेच आपल्याला सुवार्तेची गरज आहे.

## प्रकरण ३

# येशू एकमेव तारणारा

अमेरिकन जनतेकडून पुष्टीकरण ४ ला जितका विरोध आहे तेवढा विरोध इतर कोणत्याही पुष्टीकरणाला असेल, असे वाटत नाही. कोणीतरी असाही आक्षेप घेईल की पुष्टीकरण ४ तर सरळसरळ अमेरिकन वृत्तीविरुद्धच आहे. कोणत्याही एका धर्माच्या अनन्यत्वाचा दावा हा बहुपंथवाद आणि सापेक्षवाद यांच्या मुळावरच प्रहार करतो. जोपर्यंत तुम्ही प्रामाणिक आहात, तोपर्यंत तुम्ही नेमके काय मानता, याने काही फरक पडत नाही, आणि शेवटी सर्व मार्ग शेवटी स्वर्गाकडेच जातात, या विचारांचा आपल्यावर अक्षरशः मारा झाला आहे. देव इतका संकुचित आहे काय, की त्याने केवळ एका मार्गाशीच निष्ठा राखण्याची अट घातली आहे? परंतु, अर्थातच, आपल्या या घोषणापत्राचे निर्माते पवित्र शास्त्राच्या स्पष्ट शिक्षणाशी विश्वासू राहिले आहेत.

पुष्टीकरण ४ असे म्हणते:

> आम्ही पुष्टी करतो की येशू ख्रिस्त हाच तारणाचा एकमेव मार्ग आहे, आणि देव व मनुष्य यांच्यातील तोच एकमेव मध्यस्थ आहे (योहान. १४:६; १ तीमथ्याला पहिले पत्र २:५).
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> येशू ख्रिस्त आणि त्याच्या सुवार्तेशिवाय इतर कोणत्याही मार्गाने कोणाही मनुष्याचे तारण होते, हे आम्ही नाकारतो. येशू ख्रिस्तावर वैयक्तिक विश्वास ठेवल्यावाचून इतर धर्मांतील प्रामाणिक उपासकांचे तारण होईल, अशी कोणतीही आशा पवित्र शास्त्र देत नाही.

येशूने आपल्या शिष्यांना म्हटले, “मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही” (योहान. १४:६). प्रेषित पौल लिहितो की देव आणि मानव यांच्यामध्ये ख्रिस्त हाच एकमेव मध्यस्थ आहे: “कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांच्यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. त्याने सर्वांसाठी मुक्तीचे मोल म्हणून स्वतःला दिले ह्याची साक्ष यथाकाळी द्यायची आहे.” (१ तीमथ्य २:५-६).

मध्यस्थ म्हणजे असा व्यक्ती जो दोन पक्षांमध्ये उभा राहतो, कारण सामान्यतः हे दोन्ही पक्ष एकमेकांपासून दुरावलेले असतात, किंवा त्यांच्यामध्ये कुठलातरी वाद निर्माण झालेला असतो. पवित्र शास्त्राच्या इतिहासात, विशेषतः जुन्या करारात, अनेकांनी मध्यस्थाची भूमिका पार पाडली. उदाहरणार्थ, मोशे हा जुन्या कराराचा मध्यस्थ होता. देवाशी संवाद साधताना त्याने इस्राएल लोकांचे प्रतिनिधित्व केले, आणि लोकांशी बोलताना तो देवाचा प्रवक्ता म्हणूनही भूमिका पार पाडत असे. जुन्या

करारातील संदेष्ट्यांचे कार्य देखील मध्यस्थीचेच होते; ते लोकांसाठी देवाचे प्रवक्ते होते. ते लोक आणि देव यांच्या मध्ये उभे राहत. देव त्यांच्याशी बोलत असे, किंवा स्वतःला त्यांच्यावर प्रकट करीत असे. मग हे संदेष्टे, मध्यस्थ म्हणून, लोकांना सांगायचे, “प्रभू परमेश्वर असे म्हणतो.” इस्राएलचे याजक, तसेच जुन्या करारातील अहरोनी याजकवर्ग, यांची भूमिका देखील मध्यस्थीचीच होती; कारण ते लोकांच्या वतीने देवाबरोबर बोलत असत. ते लोकांच्या वतीने विनवणी करणारे होते. इस्राएलाचा राजा देखील एका अर्थाने मध्यस्थच होता, कारण तो स्वतःच्या अंगभूत सामर्थ्याने राज्य करीत नव्हता; उलट, तो लोकांकडे देवाचा प्रतिनिधी म्हणून उभा होता. म्हणूनच देवाने राजाला जुन्या कराराच्या नियमाप्रमाणे नीतिमत्वाने राज्य करण्याविषयी उत्तरदायी धरले.

येशू ख्रिस्त हा देव आणि मानव यांच्यात एकमेव मध्यस्थ आहे, असे जेव्हा पौल म्हणतो, तेव्हा तो या इतर मध्यस्थांच्या पदाचा नकार करीत नाही. उलट, मध्यस्थीच्या कार्याच्या दृष्टीने ख्रिस्ताच्या मध्यस्थपदाचे जे अनन्यत्व आहे, त्यावरच तो लक्ष केंद्रित करीत आहे. मध्यस्थ म्हणून ख्रिस्ताची भूमिका सर्वथा अद्वितीय आहे. आणि हे अनन्यत्व केवळ त्याच्या मध्यस्थीच्या कार्यातच आढळते असे नाही, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वातही ते तितक्याच ठळकपणे प्रकट होते. ख्रिस्त, आणि केवळ ख्रिस्तच, देव-मनुष्य आहे. तो देहधारी देव आहे, आपल्याबरोबर असलेला देव आहे. मग देव आणि मानवजात यांच्यामध्ये समेट आणि तारण घडवून आणण्यासाठी देव काय करतो? देवपुत्र मानवस्वभाव धारण करतो आणि देव व त्याचे लोक यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी त्या दरीत उभा राहतो. मध्यस्थीच्या या कार्यात, विशेषतः प्रायश्चिताच्या कार्यात, अंतिमतः जो समेट घडवून आणण्यासाठी जे काही आवश्यक आहे, ते करण्याची पात्रता केवळ ख्रिस्ताकडे, आणि ख्रिस्ताकडेच, आहे.

अॅन्सेल्म ऑफ कँटरबरी यांनी आपल्या *क्यूर डेउस होमो (Cur Deus homo)* या ग्रंथात, म्हणजे “देव-मनुष्य का?” या प्रश्नाचे विवेचन करून, आपल्या तारणासाठी आपला मध्यस्थ हा देव आणि मानव असे दोन्ही तत्त्वात असणे का आवश्यक होते, हे स्पष्ट करून सांगितले. तर मग ख्रिस्ती विश्वास जगातील इतर सर्व धर्मांपेक्षा अनन्य आणि वेगळा ठरवणारी गोष्ट नेमकी कोणती? याचे उत्तर सोपे आहे: तो ख्रिस्त आहे. इतर कोणत्याही धर्मात दैवी-मानवी, म्हणजे देव आणि मानव असे दोन्ही तत्त्व असलेला मध्यस्थ नाही. देव आणि मनुष्य यांच्यात विद्यमान दरी भरून काढू शकेल असे प्रायश्चित्त या जगातील दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाही. जगातील दुसरा कोणताही नेता, किंवा कोणताही धार्मिक पुढारी, मृतांतून पुन्हा उठून आला नाही. कन्फ्यूशियसकडे ज्ञान होते, पण तो मरण पावला आणि मृतच राहिला. मुहम्मद मृत आहे. बुद्ध मृत आहे. आणि असेच इतरही. परंतु देव आणि मनुष्य यांचा समेट घडवून आणण्याची सामर्थ्यपूर्ण पात्रता केवळ ख्रिस्तातच होती. दुसरे कोणीही पापविरहित नव्हते. आम्ही पुष्टी करतो की ख्रिस्त हाच तारणाचा एकमेव मार्ग आहे, कारण समेट घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेले मध्यस्थीचे कार्य पार पाडण्यासाठी जी पात्रता लागते, ती केवळ त्याच्या व्यक्तित्वात केवळ त्याच्याकडेच आहे.

काही वेळा लोक विचारतात, “देव इतका संकुचित मनाचा का आहे, की त्याने केवळ एकच तारणारा दिला?” परंतु त्याऐवजी लोकांनी असा प्रश्न विचारला पाहिजे: “मुळात देवाने आपल्याला कोणताही तारणारा का द्यावा? त्याने आपल्या सर्वांना दोषी ठरवून, आपल्या कृत्यांप्रमाणे योग्य तो दंड देऊन, आपला न्याय का करू नये? आपल्या कृपेच्या अथांग खोलीत आणि तिच्या समृद्ध वैभवात देव इतके कष्ट का घेतो, की तो आपल्याला असा मध्यस्थ द्यावा जो आपल्या जागी उभा राहील, जो न्याय आपल्या वाट्याचा आहे तो न्याय स्वत:वर घेईल, आणि जो आपल्याला अत्यंत निकडीने

आवश्यक असलेले नीतिमत्व बहाल करील?" लोकांनी, आणि विशेषतः ख्रिस्ताच्या अनन्यत्वाविषयी हलगर्जी वृत्ती बाळगणाऱ्या ख्रिस्ती लोकांनी, फार सावध राहिले पाहिजे. देव आपल्या पुत्राविषयी ईर्ष्यावान आहे. येशू हा त्याचा एकुलता एक पुत्र आहे. नव्या करारात देवाची वाणी तीन वेळा ऐकू आली, आणि त्यांपैकी दोन प्रसंगी स्वर्गातून त्याच्या पुत्राच्या ओळखीविषयी घोषणा केली जाते. "हा माझा 'पुत्र', मला 'परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे." (पहा मत्तय. ३:१७; १७:५; तुलना करा योहान. १२:२८). देवाने ख्रिस्ताला सनातन काळापासून ज्या स्थानावर नियुक्त केले आहे, ते स्थान लोक दुसऱ्या कोणाला देऊ शकत नाहीत; कारण गौरव, सन्मान, अधिराज्य आणि सामर्थ्य प्राप्त करण्यास केवळ तोच योग्य आहे. देव सर्वत्र सर्व मनुष्यांना ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याची आणि त्याचा सन्मान करण्याची आज्ञा देतो. देव ख्रिस्ताच्या जागी  कोणताही पर्याय स्वीकारणार नाही.

लक्षात घ्या की, जेव्हा पौल म्हणतो की केवळ एकच मध्यस्थ आहे, तेव्हा त्याआधी तो देवही एकच आहे, असे प्रतिपादन करतो. हीच अद्वितीयता संपूर्ण जुन्या करारात घोषित केली गेली होती, जिथे देवाने मूर्तिपूजेचा तीव्र निषेध केला होता. अगदी पहिली आज्ञाच अनन्यतेची आज्ञा होती: "माझ्यासमोर तुला इतर कोणतेही दुसरे देव नसावेत" (निर्गम २०:३). परक्या दैवतांच्या उपासनेवर देवाने दंडाज्ञा आणली. खोट्या धर्माने तो प्रसन्न झाला नाही; उलट, त्यात त्याने स्वतःच्या गौरवाविरुद्ध उभे ठाकलेले पद्धतशीर बंड पाहिले. पौल हे सर्व धागे एकत्र गुंफतो. देव एकच आहे, देवाला एकच पुत्र आहे आणि देव व मनुष्यजाती यांच्यामध्ये मध्यस्थही एकच आहे. बहुपंथवादात बुडालेल्या लोकांना हे स्वीकारणे कठीण जाते, परंतु या मुद्द्यावर त्यांना ख्रिस्ताशी आणि त्याच्या प्रेषितांशीच वाद घालावा लागेल. येशू ख्रिस्तावर वैयक्तिक विश्वास ठेवल्यावाचून इतर धर्मांतील प्रामाणिक उपासकांचे तारण होईल, अशी कोणतीही आशा पवित्र शास्त्र देत नाही.

काही लोकांची श्रद्धा अशी आहे की, इतर जागतिक धर्मांचे अनुयायी ख्रिस्ताद्वारे तारण पावू शकतात. त्यांचा युक्तिवाद असा असतो की, ते जरी आपली उपासना दुसऱ्या कोणाकडे किंवा कशाकडे अर्पण करीत असले, तरी प्रत्यक्षात त्या अज्ञानावस्थेत ते ख्रिस्ताचीच उपासना करीत असतात. जो कोणी मनापासून उपासक आहे, किंवा मनापासून धार्मिक आहे, त्याच्यावर देव ख्रिस्ताच्या कार्याचे लाभ लागू करील, असे ते म्हणतात. परंतु कलम ४ मधील नकार असे स्पष्ट करतो की, केवळ ख्रिस्त आवश्यक आहे एवढेच नव्हे, तर ख्रिस्तावरील वैयक्तिक विश्वासही तितकाच आवश्यक आहे. मार्स हिलवर ग्रीकांशी बोलताना पौल म्हणाला, "अज्ञानाच्या काळांकडे देवाने डोळेझाक केली, परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा अशी तो माणसांना आज्ञा करतो. त्याने असा एक दिवस नेमला आहे की, ज्या दिवशी तो आपण नेमलेल्या मनुष्याच्या द्वारे जगाचा न्यायनिवाडा नीतिमत्त्वाने करणार आहे; त्याने त्याला मेलेल्यांतून उठवून ह्याविषयीचे प्रमाण सर्वांस पटवले आहे." (प्रेषितांची कृत्ये १७:३०-३१). सर्व लोकांवर ख्रिस्ताची उपासना करणे आणि त्याच्यावर विश्वास ठेवणे, ही सार्वत्रिक अट घालण्यात आलेली आहे.

आता आपण कलम ५ कडे वळू या. पुष्टीकरण ५ असे म्हणते:

> आम्ही पुष्टी करतो की मंडळीला देवाने आज्ञा दिली आहे, आणि म्हणून प्रत्येक जिवंत मनुष्याला सुवार्तेची घोषणा करण्याची दैवीय अशी बंधनकारक जबाबदारी तिच्यावर आहे (लूक. २४:४७; मत्तय. २८:१८-१९).
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> आम्ही हे नाकारतो की, कोणत्याही विशिष्ट वर्गातील किंवा गटातील व्यक्तींकडे, त्यांची वांशिक किंवा सांस्कृतिक ओळख

काहीही असली तरी, सुवार्ता गाजवताना दुर्लक्ष केले जावे किंवा त्यांना वगळले जावे (१ करिंथ. ९:१९-२२). देवाने प्रत्येक वंशातील, भाषेतील आणि राष्ट्रातील लोकांपासून मिळून बन-लेल्या एका वैश्विक मंडळीचा संकल्प केला आहे (प्रकटी. ७:९).

कलम ५ मंडळीच्या कार्यधर्माची (प्रेषिताईची मिशनची) पुष्टी करतो, आणि हा कार्यधर्म मंडळीच्या प्रभूनेच ठरवलेला आहे. तो अशी आज्ञा देतो की मंडळीने सुवार्ता प्रसारामध्ये गुंतलेले असावे. मंडळीसाठी सुवार्ता प्रसार हा कधीही पर्यायी विषय नसतो. जर मंडळीला तिचा प्रभू आणि मंडळीचे मस्तक ख्रिस्त याच्याशी आज्ञाधारक राहायचे असेल, तर मिशन हे तिच्यासाठी कधीही पर्यायी काम ठरू शकत नाही. प्रत्येक जिवंत मनुष्याला सुवार्ता घोषित करण्याची आज्ञा त्याने मंडळीला दिली आहे.

ऐतिहासिक ख्रिस्ती धर्मातील एक मोठी शोकांतिका ही आहे की, ही आज्ञा पाळण्याबाबत मंडळी फार अनुत्सुक आणि उदासीन राहिली आहे. आज जगात असे लाखो लोक आहेत ज्यांनी येशू ख्रिस्ताविषयी कधीही ऐकलेले नाही. आपण या महान आज्ञेची पूर्तता केलेली नाही. मंडळी म्हणून जे करणे आपले बंधनकारक कर्तव्य होते, ते आपण केलेले नाही.

कलम ५ मधील नकार असे म्हणतो: “आम्ही हे नाकारतो की, कोणत्याही विशिष्ट वर्गातील किंवा गटातील व्यक्तींकडे, त्यांची वांशिक किंवा सांस्कृतिक ओळख काहीही असली तरी, सुवार्ता गाजवताना दुर्लक्ष केले जावे किंवा त्यांना वगळले जावे.” विविध प्रकारच्या मंडळींचा कल अनेकदा असा असतो की त्या वंश, जातीयता, वर्ग, सामाजिक-आर्थिक स्थिती, सांस्कृतिक पार्श्वभूमी, इत्यादी बाबतीत एका ठरावीक चौकटीत बसणाऱ्या लोकांवरच लक्ष केंद्रित करतात. आपण एका विशिष्ट दिशेनेच वळतो, आणि आपल्यासारख्याच लोकांपर्यंत पोहोचण्यावर आपले लक्ष

केंद्रित करतो. परंतु कलम ५ मधील नकार असे स्पष्टपणे सांगतो की आपण संकुचित मनाचे असू नये. आपण प्रत्येक कल्पनीय पार्श्वभूमीतून आलेल्या लोकांना, प्रत्येक वांशिक गटातील लोकांना, आणि प्रत्येक धार्मिक गटातील लोकांना सुवार्ता सांगितली पाहिजे. काही वेळा आपण इतर जागतिक धर्मांमध्ये गुंतलेल्या लोकांना सुवार्ता सांगत नाही, कारण कुठेतरी आपल्याला असे वाटते की मंडळीच्या पोहोचकार्यापासून त्यांना वगळले जावे. परंतु तसे नाही. देवाच्या लोकांसाठी देवाची आज्ञा हीच आहे की प्रत्येक भाषा, प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक वंश, आणि कोणताही भेद न करता प्रत्येक जिवंत मनुष्य याला सुवार्ता घोषित केली जावी. हे एक थोर बंधन आहे, आणि ते पूर्ण करण्यामध्ये आपण कसूर केली आहे.

## प्रकरण ४

# येशू : देव - मनुष्य

ख्रिस्ताचे परमेश्वरत्त्व हा सुवार्तेचा एक आवश्यक मुद्दा आहे. नवीन करारात आपल्याला आढळणारे सुवार्तेचे सर्व सारगर्भित आशय हे येशू ख्रिस्ताचे व्यक्तित्व आणि त्याचे कार्य यांवर केंद्रित आहेत. आणि जरी आपण ख्रिस्ताचे व्यक्तित्व आणि त्याचे कार्य यांमध्ये भेद करीत असलो, तरी त्यांची ताटातूट करण्याचे धाडस आपण करू नये. त्याच्या व्यक्तित्वाचे महत्त्वच त्याच्या कार्याला वैधता आणि परिणामकारकपणा देते; आणि त्याच्या कार्यामध्ये व त्याद्वारे तो कोण आहे, याची आपल्याला अधिक सखोल समज होते, जेणेकरून तो कोण आहे आणि तो काय करतो, म्हणजेच त्याने आपल्यासाठी काय साध्य केले आहे, यांमध्ये एक घनिष्ठ संबंध आहे. कलम ६ नेमका याच मुद्द्यावर लक्ष केंद्रित करतो. पुष्टीकरण ६ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की येशू ख्रिस्त हा दैवी शब्द आहे, किंवा लोगोस आहे (योहान. १:१); तो त्रैक्यातील दुसरी व्यक्ती असून पिता आणि पवित्र आत्मा यांच्यासह सहसार्वकालिक व सहस्वरूपी आहे (इब्री. १:३). यावर विश्वास ठेवणे हे सुवार्तेवरील विश्वासाचे पायाभूत तत्त्व आहे.
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> येशू ख्रिस्ताचे पूर्ण देवत्व कमी करणारा किंवा नाकारणारा कोणताही दृष्टिकोन हा सुवार्तेवरील विश्वास ठरू शकतो, किंवा त्याद्वारे तारण साध्य होऊ शकते, हे आम्ही नाकारतो.

आपण लक्षात घेतो की येशूविषयी सर्वप्रथम जे प्रतिपादन करण्यात येते, ते म्हणजे तो दैवी शब्द आहे. हा योहान. १ चा स्पष्ट संदर्भ आहे, जिथे ख्रिस्ताची ओळख सार्वकालिक *'लोगोस'*, किंवा शब्द, अशी करून देण्यात आली आहे: "प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता" (योहान. १:१). पुढे आपण असे वाचतो: "आणि शब्द देही झाला आणि त्याने आमच्यामध्ये वस्ती केली" (वचन १४). हा मुद्दा आपण ज्याला *"लोगोस ख्रिस्तशास्त्र"* असे म्हणतो, त्या संकल्पनेचा संदर्भ आहे.

दैवी शब्द, किंवा सनातन *लोगोस*, याविषयी योहानाने आपल्या शुभ-वर्तमानात जे प्रतिपादन केले आहे, त्या संकल्पनेला मंडळीच्या इतिहासाच्या पहिल्या तीन शतकांत ख्रिस्ती ईश्वरशास्त्रात फार मोठे महत्त्व प्राप्त झाले. प्रारंभीच्या मंडळीतील जे लोक ग्रीक तत्त्वज्ञानाच्या परंपरांशी परिचित होते, त्यांना अभिजात ग्रीक तत्त्वज्ञानातील *लोगोस* या संज्ञेचा परिपूर्ण आशय ठाऊक होता. *लोगोस* ही संज्ञा सर्व गोष्टींना एकत्र बांधून एका सुसंघटित विश्वरचनेत एकवटणाऱ्या अतींद्रिय सुसंगती आणि सुव्यवस्थेच्या तत्त्वाचा निर्देश करीत असे. ग्रीक बुद्धीजीविंच्या दृष्टीने लोगोस हे एक अमूर्त तत्त्व

होते; त्याचा विचार व्यक्ती म्हणून मुळीच केला जात नव्हता. योहानाने ही संज्ञा ग्रीक तत्त्वज्ञानपर संस्कृतीतून घेतली खरी, परंतु तिला जशीच्या तशी ठेवले नाही. उलट, त्या संज्ञेत त्याने एक व्यक्ती असलेल्या देवाची हिब्रू संकल्पना ओतली.

आम्ही ख्रिस्ताच्या सर्वकालिकेतेची पुष्टी करतो, आणि येशूला केवळ एखादी निर्माण केलेली सत्ता ठरविण्याचा प्रत्येक प्रयत्न नाकारतो. पुष्टीकरण ६ मध्ये याची पुढे अधिकच दृढ पुष्टी दिसून येते, जिथे ख्रिस्ताचे वर्णन पिता आणि पवित्र आत्मा यांच्यासह सहसार्वकालिक आणि सहतत्त्व असे केले आहे. यामध्ये थोडक्यात त्रैक्याच्या सिद्धांताची व्याख्या सूचित होते, आणि त्याच वेळी प्रारंभीच्या शतकांतील महान वैश्विक परिषदांकडे, विशेषतः नायसिया परिषदेकडे आणि चाल्सेडॉन परिषदेकडे, आपले लक्ष पुन्हा वळविले जाते. नायसिया परिषद, जिच्यामुळे आपल्याला नायसिन विश्वास-अंगीकार प्राप्त झाला, ती चौथ्या शतकाच्या प्रारंभी मंडळीसमोर उभ्या राहिलेल्या एका संकटामुळे भरविण्यात आली होती. हे संकट एरियस नावाच्या व्यक्तीच्या शिक्षणामुळे निर्माण झाले होते. एरियसने, आपल्या सहकाऱ्यांसह, त्रैक्याचा आणि ख्रिस्ताच्या देवत्वाचा नकार केला. त्यांचा युक्तिवाद असा होता की ख्रिस्त ही देवाने निर्माण केलेली पहिली सत्ता होती, आणि त्यानंतर ख्रिस्ताने, किंवा लोगोसने, जगाची निर्मिती केली. परंतु जरी लोगोस जगाचा निर्माणकर्ता होता, तरी तो स्वतः एक निर्माण केलेली सत्ता होता; म्हणून त्याला काळात प्रारंभ होता, आणि निर्माण केलेली सत्ता असल्यामुळे तो निश्चितच देवापेक्षा कनिष्ठ होता.

एरियसने असा युक्तिवाद केला की हा *लोगोस* काही बाबतीत देवासारखा आहे. त्याने असे म्हटले की लोगोस हा देवाशी *होमोइउसिऑस* आहे, म्हणजे “स्वरूपा सारखा *(of like substance)*.” एरियसने हे मान्य केले की *लोगोस* आपल्या अस्तित्वाच्या दृष्टीने पित्यासारखा आहे; परंतु तो

पित्याच्या “त्याच तत्त्वाचा *(same essence)*” नाही, असे त्याने प्रतिपादन केले. म्हणजेच, तो दैवी अस्तित्वात सहभागी नाही. तो देव नाही. मंडळीतील सनातनी पक्षाने, म्हणजे त्रैक्यावर विश्वास ठेवणाऱ्यांनी, चौथ्या शतकात एरियनवादाचा निषेध केला. त्यांनी *होमोऊसिऑस* या शब्दाच्या वापरावर आग्रह धरला; याचा अर्थ “त्याच तत्वाचा” असा होतो. चौथ्या शतकापासून त्रैक्याविषयीचा सनातनी दृष्टिकोन असा राहिला आहे की देवत्वातील तीन व्यक्ती तत्वामध्ये एक आहेत, जरी व्यक्तित्वाच्या दृष्टीने त्या तीन आहेत. म्हणूनच, पुष्टीकरण ६ जेव्हा दैवी शब्द हा पिता आणि पवित्र आत्मा यांच्याबरोबर सहसार्वकालिक आणि सह-तात्त्विक आहे, असे म्हणते, तेव्हा अभिप्रेत आशय हाच आहे. येशू ख्रिस्ताच्या पूर्ण देवत्वाचा विश्वास-अंगीकार करणे हे सुवार्तेवरील विश्वासाचे पायाभूत आणि अत्यावश्यक तत्त्व आहे. एरियन लोकांनी केल्याप्रमाणे ख्रिस्ताचे देवत्व नाकारत असताना, एकाच वेळी त्याच्याकडे तारणकर्ता या दृष्टीने पाहणे कोणालाही शक्य नाही.

नायसिया परिषद आणि चाल्सेडॉन परिषद यांनंतर एरियनवाद लयाला गेला नाही. “द चर्च ऑफ जीझस ख्राइस्ट ऑफ लॅटर-डे सेंट्स” म्हणजे मॉर्मन्स, तसेच “यहोवाचे साक्षीदार,” हे ख्रिस्ताच्या देवत्वाचा नकार देण्यात एरियसच्याच पावलावर पाऊल ठेवत चालत आहेत. जरी हे धर्म येशूला अत्युच्च स्थान देतात, तरी पित्यासमवेत त्याची सहसार्वकालिकता किंवा सहतत्त्वता नाकारून ते एरियन भूमिकेचेच अनुसरण करतात. उदाहरणार्थ, मॉर्मन्स ख्रिस्ताच्या पूर्वअस्तित्वाच्या एका मताचा स्वीकार करतात, म्हणजे जगाच्या प्रारंभापूर्वी तो अस्तित्वात होता, असे ते मानतात. परंतु ते त्याच्या सार्वकालिकत्वाचा नकार करतात. याच ठिकाणी एरियनवादाशी त्यांचा संबंध स्पष्ट दिसतो: म्हणजे असे की, देवाने प्रथम ख्रिस्ताची निर्मिती केली, आणि त्यानंतर ख्रिस्ताने जगाची निर्मिती केली. अशा रीतीने ख्रिस्त जगाच्या आधी अस्तित्वात होता, पण तो सर्वकाळ अस्तित्वात नव्हता. तो अद्याप एक

निर्मित सत्ताच राहतो, सर्वांत उच्च निर्मित सत्ता, तरीही अखेरीस एक निर्मित सत्ताच. असा तो आहे.

एरियनवादामुळे केवळ मंडळीच्या ईश्वरशास्त्रातच नव्हे तर मंडळीच्या उपासनेतही समस्या निर्माण झाली. ख्रिस्ती धर्माचा उगम ऐतिहासिक यहूदी धर्मातून झाला आहे, आणि नवा करार जुन्या कराराचा नकार करीत नाही. जुना करार कोणत्याही निर्माण केलेल्या सत्तेची उपासना करण्यास स्पष्ट मनाई करतो. एखादी सत्ता कितीही उच्च असो, तिची उपासना करणे, हे मूर्तिपूजेचे मूळ स्वरूप होय. म्हणूनच नवा करार, विशेषतः कलस्सैकरांस पत्र आणि इब्री लोकांस पत्र यांसारख्या पुस्तकांत, येशू हा एखादा सर्वोच्च देवदूत आहे या कल्पनेचे खंडन करण्यासाठी इतका आग्रह धरतो. पवित्र शास्त्र स्पष्टपणे सांगते की ख्रिस्त देवदूतमात्रांपेक्षा श्रेष्ठ आहे, आणि खरोखरच पिता आणि पवित्र आत्मा यांच्याप्रमाणेच त्याच दैवी तत्वाचा आहे.

जशी ख्रिस्ताच्या देवत्वाची स्पष्ट पुष्टी बायबल-सम्मत सुवार्तेचा अविभाज्य घटक आहे, तशीच ख्रिस्ताच्या मानवत्वाची स्पष्ट पुष्टीही तितकीच अविभाज्य आहे. हे आपण पुष्टीकरण ७ मध्ये पाहतो:

> आम्ही हे मान्य करतो की, येशू ख्रिस्त हा देहधारी देव आहे (योहान. १:१४). तो दावीदाचा कुमारीपोटी जन्मलेला वंशज होता (रोम. १:३); त्याच्याकडे वास्तविक मानवी स्वरूप होते; तो देवाच्या नियमाच्या अधीन होता (गलतीकरांस पत्र ४:५); आणि पाप वगळता तो सर्व बाबतीत आपल्यासारखाच होता (इब्री. २:१७; ७:२६-२८). आम्ही मान्य करतो की ख्रिस्ताच्या खऱ्या मानवत्वावरील विश्वास हा सुवार्तेवरील विश्वासासाठी आवश्यक आहे.

> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> जो कोणी ख्रिस्ताचे मानवत्व, त्याचे देहधारण, किंवा त्याची पापविरहितता नाकारतो, अथवा ही सत्ये सुवार्तेसाठी आवश्यक नाहीत असे मानतो, त्याचे तारण होईल, हे आम्ही नाकारतो (१ योहान. ४:२-३).

जर आपण पाचव्या शतकाकडे वळून चाल्सेडॉन परिषदेकडे पाहिले, तर तेथे मंडळी अशी कबुली देताना दिसते की ख्रिस्त हा पूर्ण मनुष्य आणि पूर्ण देव आहे, आणि त्याच्यामध्ये दोन भिन्न स्वभाव आहेत: मानव स्वभाव आणि दैवी स्वभाव. चौथ्या शतकात मंडळीने ख्रिस्ताच्या दैवी स्वभावाची पुष्टी करणे जसे महत्त्वाचे मानले, तसेच ख्रिस्ताच्या मानवत्वाची घोषणा करणे देखील महत्त्वाचे आहे. आपल्या मानवप्रतिनिधीच्या नात्याने ख्रिस्त त्याच्या मनुष्यत्वातच नवा आदाम झाला. त्याने स्वतःला नियमाशास्त्राच्या अधीन करून, परिपूर्ण नीतिमत्वाचे जीवन जगून आणि आपल्या पापांचे प्रायश्चित्त म्हणून वधस्तंभावर स्वतःचे अर्पण करून तो आपला मानव प्रतिनिधी बनला. त्याच्या मुक्ती कार्यातील एक निर्णायक बाब म्हणजे त्याने आपल्या मनुष्यत्वात परिपूर्ण पापविरहित जीवन साध्य केले. आपला तारणारा म्हणून पात्र ठरण्यासाठी येशूला निष्पाप असणे आवश्यक होते. येशूला परिपूर्ण आज्ञाधारकतेचे जीवन जगणे आवश्यक होते. जर त्याने पाप केले असते, तर आपल्यासाठी व आपल्या पापांसाठी प्रायश्चित्त करणे तर दूर, तो अगदी स्वतःकरिताही प्रायश्चित्त करण्यास अपात्र ठरला असता. अशा रीतीने ख्रिस्ताचा पापविरहितपणा आपल्या मुक्तीविषयीच्या बायबल-सम्मत संकल्पनेशी किती निकटतेने जोडलेला आहे, हे आपण पाहतो.

येथे हे मान्य करण्यात आले आहे की येशू हा देहधारी देव आहे. आपल्याला ते वचन आठवते: “शब्द देहधारी झाला आणि त्याने आमच्यामध्ये

वस्ती केली” (योहान. १:१४). तो इम्मानुएल आहे, म्हणजे आमच्याबरोबर असलेला देव. तो कुमारीच्या पोटी जन्मलेला दावीदाचा वंशज आहे. होय, ख्रिस्त ज्या रीतीने जगात आला, ती रीती चमत्कारिक होती. परंतु त्याच्या मानवी स्वभावाच्या दृष्टीने तो दावीदाच्या वंशावळीतील आहे.

नवा करार येशू हा दावीदाचा पुत्र आहे, आणि त्याच वेळी दावीदाचाच प्रभू आहे, या गोष्टीच्या महत्त्वाकडे आपले लक्ष वेधतो. आणि स्तोत्रसंहिता ११०:१ असे म्हणते: “परमेश्वर माझ्या प्रभूला म्हणाला, ‘मी तुझे वैरी तुझे पादासन करीपर्यंत तू माझ्या उजवीकडे बस.’” दावीदाच्या मुळातून आणि वंशातून आलेला हा पुरुष, एकाच वेळी दावीदाचा प्रभूही होता. बायबलच्या श्रेणींमध्ये त्याला दावीदाचा थोर पुत्र म्हटले जाते. नव्या करारात ख्रिस्त दावीदाचा वंशज असणे अत्यंत महत्त्वाचे ठरते, कारण जुन्या करारातील मशीहाविषयक भविष्यवाण्यांत असे सांगितले होते की मशीहा हा दावीदासारखा राजा असेल, आणि तो यहूदाच्या वंशातून आलेला असला पाहिजे. याकोबाने आपल्या पुत्रांना दिलेल्या पितृआशीर्वादांच्या काळापासूनच यहूदाच्या वंशाला राज्याचे वचन देण्यात आले होते (उत्पत्ति ४९:१०). नवा करार काळजीपूर्वक अशी नोंद करतो की, आपल्या मानवी वंशपरंपरेच्या दृष्टीने, येशू यहूदाच्या वंशातील होता; आणि म्हणूनच तो यहूदाचा सिंह, राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू होण्यास पात्र ठरला, आणि अशा प्रकारे मशीहाविषयीच्या जुन्या करारातील भविष्यवाण्या त्याच्यामध्ये पूर्ण झाल्या.

कलम ७ असे म्हणतो की, जो कोणी ख्रिस्ताचे मानवत्व, त्याचे देह-धारण, किंवा त्याची पापविरहितता नाकारतो, अथवा ही सत्ये सुवार्तेसाठी आवश्यक नाहीत असे मानतो, त्याचे तारण होईल, हे आम्ही नाकारतो. हा अत्यंत ठाम नकार आहे. येशूच्या मानवत्वाच्या पुष्टीशी संबंधित तारणाचा संपूर्ण प्रश्नच तो ऐरणीवर आणतो. या घोषणापत्राच्या निर्मात्यांच्या दृष्टीसमोर

मंडळीला अगदी प्रारंभकाळीच ज्या पाखंडी मताला तोंड द्यावे लागले, आणि ज्याचा उल्लेख नव्या करारातच आढळतो, ते म्हणजे डोसेटिझम हे पाखंड. ग्रीक तत्त्वज्ञानाच्या परंपरेने, तसेच भौतिक जगाविषयीच्या नकारात्मक दृष्टीकोनाने प्रभावित झालेल्या डोसेटिस्टांनी येशूला खरे मानवी शरीर होते, हे नाकारले. दैवी सत्ता कधीही मानवी देहाशी खऱ्या अर्थाने संयुक्त होऊ शकते, ही गोष्ट त्यांना अकल्पनीय वाटत होती; कारण त्यांच्या मते भौतिक असलेले सर्व काही मुळातच अपूर्ण आहे. ग्रीक बुद्धीजीविंच्या दृष्टीने खरी अडचण पुनरुत्थान नव्हे, तर देहधारण हीच होती.

आपल्या पत्रांमध्ये, योहान ख्रिस्तविरोधी आत्म्याच्या प्रश्नाला हाताळत असताना अत्यंत ठाम भूमिका घेतो. योहानाच्या आणि नव्या करारातील इतर लेखकांच्या दृष्टीने, जो कोणी देवाची खरी देहधारणा आणि येशूचे खरे मानवत्व नाकारत होता, तो ख्रिस्तविरोधीच होता. नवा करार येशूच्या मानवी स्वभावाच्या वास्तवावर इतका जोर देतो, म्हणून या घोषणापत्राचे निर्माते ख्रिस्ताचे देवत्व आणि ख्रिस्ताचे मानवत्व या दोन्हींची पुष्टी करतात. आपल्याला आठवते की कलम ५ मध्ये ख्रिस्त हा देव आणि मनुष्य यांच्यातील एकमेव मध्यस्थ आहे, अशी पुष्टी करण्यात आली होती; आणि त्याचे कारण हेच की दैवी स्वभाव आणि मानवी स्वभाव हे दोन्ही धारण करणारा एकमेव व्यक्ती तोच आहे.

ख्रिस्ती धर्माच्या इतिहासाकडे पाहिले, तर एकूण चार शतकांमध्ये ख्रिस्ताच्या देवत्वावर वारंवार हल्ले झाल्याचे दिसते. चौथ्या शतकात एरियनवादाचा वाद उद्भवला, आणि पाचव्या शतकात इ. स. ४५१ मध्ये चाल्सेडॉन परिषद भरविण्यात आली. त्यानंतर एकोणिसाव्या शतकातील उदारमतवादी ईश्वरशास्त्राचा उदय झाला; त्याने जवळजवळ सर्व अलौकिक सत्यांचा, विशेषतः ख्रिस्ताच्या देवत्वाचा, नकार केला. हा प्रवाह विसाव्या शतकातही पुढे चालू राहिला. आपल्या काळातील मुख्य प्रवाहातील पंथांमध्ये

एकोणिसाव्या शतकातील उदारमत वादाच्या प्रभावामुळे, ख्रिस्ताच्या पूर्ण देवत्वाचा विश्वास-अंगीकार हा मंडळीसमोर उभा राहिलेल्या प्रमुख विवादांपैकी एक ठरला आहे. म्हणून आपण याची जाणीव ठेवली पाहिजे की, मंडळीच्या इतिहासातील अशा एका युगात आपण जगत आहोत, ज्यात ख्रिस्ताच्या देवत्वावर हल्ले होत आहेत. ख्रिस्ताला केवळ मनुष्यपदावर आणू पाहणाऱ्यांसमोर ख्रिस्ताच्या देवत्वाची पुष्टी करण्याच्या आपल्या उत्कटतेत, त्याच्या मानवत्वाचे वास्तव अंधुक किंवा धूसर होणार नाही, याची आपण काळजी घेतली पाहिजे. त्याचे देवत्व आणि त्याचे मानवत्व, या दोन्ही गोष्टी आपण तितक्याच ठामपणे टिकवून धरल्या पाहिजेत.

## प्रकरण ५

# परिपूर्ण यज्ञार्पण

वधस्तंभाचा संदेश हा नव्या करारातील शुभवर्तमानाच्या केंद्रस्थानी आहे. आपल्या मृत्यूद्वारे ख्रिस्ताने असे कार्य साध्य केले की ज्यामुळे देव आणि ख्रिस्तावर आपला विश्वास ठेवणारे सर्व यांच्यामध्ये समेट घडून आला. म्हणूनच प्रेषित पौल असे म्हणतो की, ख्रिस्त म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला (१ करिंथ. २:२). कलम ८ नेमका याच विषयावर लक्ष केंद्रित करतो. पुष्टीकरण ८ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, ख्रिस्ताचे प्रायश्चित्त, ज्याद्वारे त्याने आपल्या आज्ञाधारकतेत एक परिपूर्ण यज्ञार्पण केले, आणि आमच्या पापांची खंडणी भरून व देवाच्या सनातन योजनेनुसार

आमच्या वतीने दैवी न्यायाची तृप्ती करून पित्याचा क्रोध शांत केला, हे सुवार्तेचे एक आवश्यक तत्त्व आहे.

त्यास अनुसरून नकार असा आहे:

प्रायश्चित्ताचा असा कोणताही दृष्टिकोन जो ख्रिस्ताच्या 'प्रतिनिधिक अर्पणाद्वारे' दैवी न्यायाच्या *(Substitutionary)* समाधानाचा नकार करतो, जे विश्वासणाऱ्यांच्या वतीने ख्रिस्ताने पूर्ण केले आहे, तो सुवार्तेच्या शिक्षणाशी सुसंगत आहे हे आम्ही नाकारतो.

प्रायश्चित्त म्हणजे पापासाठी खंडणीस्वरूपात भरलेली किंमत. ती अशी किंमत नाही की जी आपण प्रत्येकाने वैयक्तिकरीत्या भरली आहे, कारण देवाच्या न्यायाच्या मागण्या पूर्ण करू शकेल असे कोणतेही यज्ञार्पण देवाला अर्पण करण्यास आपण समर्थ नाही. देवाचा स्वभावच प्रायश्चित्त आवश्यक ठरवितो, कारण तो पूर्णपणे न्यायी आहे. तो इतका न्यायी आहे की तो पापाकडे कानाडोळा करू शकत नाही, किंवा आपल्या स्वतःच्या सचोटीशी आणि नीतिमत्वाशी असलेली आपली बांधिलकी सोडून देऊ शकत नाही. पूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे सुवार्ता ही चांगली बातमी आहे, याचे कारण असे की ती त्या सर्वांत गंभीर पेचाचे उत्तर देते, ज्याला प्रत्येक मनुष्याला कधीतरी सामोरे जावे लागते: आपण पापी असल्यामुळे न्यायी किंवा नीतिमान नाही, आणि देव मात्र अपरिवर्तनीय रीतीने व सार्वकालिकरीत्या न्यायी आणि नीतिमान राहतो. मग प्रश्न असा उभा राहतो की, एक अन्यायी मनुष्य न्यायी आणि पवित्र देवाच्या न्यायासमोर टिकून राहील अशी कुठली आशा तो करू शकतो का? आणि कशी करू शकतो?

या समस्येचा उपाय देवाच्या त्या सनातन योजनेत आढळतो, ज्याद्वारे त्याने आपल्या लोकांसाठी तारणाचा मार्ग असा सिद्ध केला की, त्यांचे पाप

झाकले जावे आणि देवाच्या स्वतःच्या न्यायाचे समाधान व्हावे. देव आपल्या धार्मिकतेशी तडजोड करणार नाही. सुवार्तेमध्ये, देव स्वतःला न्यायी आणि अभक्तांना नीतिमान ठरवणारा *(Justifier)* अशा दोन्ही रूपांत प्रकट करतो (रोम. ३:२५-२६). येथे निर्णायक कार्य म्हणजे ख्रिस्ताचे वधस्तंभावरील कार्य आहे, ज्याद्वारे त्याने आपल्या लोकांसाठी प्रायश्चित्त अर्पण केले. ख्रिस्ताने आज्ञाधारकतेने अर्पण केलेले हे प्रायश्चित्त एक परिपूर्ण यज्ञ आहे, जो आपल्या पापांची खंडणी भरून आणि दैवी  न्यायाची तृप्ती करून पित्याचा क्रोध शांत करतो.

प्रायश्चित्ताच्या संदर्भात दोन शब्द विशेषत्वाने आपल्या समोर येतात: 'एक्स्पिएशन' *(Expiation* - पाप दूर करणे, किंवा *'पापक्षालन')* आणि 'प्रोपिशिएशन' *(Propitiation - क्रोध शांत करणे)*.. एक्स्पिएशनचा संबंध आमचे पाप आमच्यापासून दूर करण्याशी आहे. जुन्या करारात प्रायश्चित्ताच्या दिवशी एकापेक्षा अधिक पशूंचा बळी दिला जात असे (लेवीय १६). खरे तर, लोकांसाठी पर्यायी प्रायश्चित्तयज्ञ अर्पण करण्यापूर्वी मुख्य याजकाला स्वतःच्या शुद्धीकरणासाठी अनेक पशूंची अर्पणे करावी लागत असत. त्यानंतर याजक एका बकऱ्याच्या डोक्यावर, म्हणजे पापवाहक *(scape-goat)* बकऱ्याच्या डोक्यावर, आपले हात ठेवत असे; आणि मग त्या बकऱ्याला छावणीपासून दूर, देवाच्या सान्निध्यापासून दूर, अरण्यात पाठवून दिला जात असे. हे देवाच्या उपस्थितीतून लोकांचे पाप काढून टाकण्याचे प्रतीक होते, ज्याला आपण पापाची क्षमा *(Remission)* म्हणतो, ज्याचा अर्थ ते दूर निघून जाणे असा होतो.

एक्स्पिएशन, म्हणजे पाप दूर करणे, किंवा 'पापक्षालन' करण्याची ही संकल्पना व्यक्त करण्यासाठी पवित्र शास्त्र पुढीलप्रमाणे भाषा वापरते: "पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे, तितके त्याने आमचे अपराध आमच्यापासून दूर केले आहेत." (स्तोत्रसंहिता १०३:१२). अशा प्रकारे

आपल्या पापांचे निराकरण पूर्ण होते कारण देव कायदेशीररित्या आमचा दोष आणि पाप आमच्या खात्यातून काढून ते ख्रिस्ताकडे हस्तांतरित करतो, जो आमचा पाप-वाहक आहे. नव्या करारातील प्रेषितांचा वधस्तंभाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समजून घेण्यासाठी यशया ५३ हा अत्यंत महत्त्वाचा शास्त्रभाग आहे, कारण तो आपल्याला परमेश्वराच्या त्या सेवकाविषयी सांगतो, जो आपल्या लोकांचे अधर्म वाहून घेतो. त्याला ठेचावे आणि त्याच्यावर आपली पापे टाकून त्याला ताडण द्यावे, असे परमेश्वराला बरे वाटले. हाच 'पापक्षालन' (एक्स्पिएशन) या शब्दाचा अर्थ आहे: आमची पापे आमच्या खात्यातून ख्रिस्ताच्या खात्यात गणण्यात आली. वधस्तंभावर, जेव्हा ख्रिस्ताने आमच्या जागी स्वतःला परिपूर्ण यज्ञ म्हणून अर्पण केले, तेव्हा आमच्यावर जे येणे बाकी होते ते त्याने स्वतःवर घेतले.

जुन्या करारात देवाचे नियमशास्त्र मोडणे म्हणजे त्याच्या शापाखाली येणे असे होते. त्याचप्रमाणे, जेव्हा आपण देवाविरुद्ध पाप करतो, तेव्हा आपण त्याच्या शापाखाली, म्हणजे दुष्टतेवर त्याच्या प्रकट होणाऱ्या न्यायास पात्र ठरतो. जर आपण स्वतः या न्यायाचा सामना केला असता, तर आपण देवाच्या क्रोधाच्या पूर्ण मापदंडासमोर उघडे पडलो असतो. परंतु गलतीकरांस पत्रात पौल आपल्याला सांगतो की ख्रिस्त आपल्याबद्दल शाप झाला आणि त्याने आपल्याला नियमशास्त्राच्या शापापासून खंडणी भरून सोडवले (गलती. ३:१३). त्याने हे आमचा *'प्रतिनिधिक अर्पण' (Substitute)* म्हणून केले. ज्या शापास आम्हीं पात्र होतो तो येशूने आमची जागा घेऊन वाहून घेतला. याचा अर्थ असा की, नकारात जसे प्रतिपादन केले आहे, त्याप्रमाणे ख्रिस्ताने प्रतिनिधिक प्रायश्चित्त केले. ही खंडणी प्रत्यक्ष दोषी पक्षाने नव्हे, तर त्याच्या ऐवजी उभ्या राहिलेल्या दुसऱ्या पक्षाने भरली. कायदेशीर दृष्टीने पाहिले, तर आपण सर्वांनी देवाविरुद्ध पाप केले आहे आणि त्याच्या परिपूर्णतेविषयी एक ऋण, म्हणजे नैतिक ऋण, जे आम्हाला देणे आहे. आपण असे ऋणी आहोत की जे आपले ऋण स्वतः फेडू शकत नाहीत.

ज्याला आपण *आर्थिक* ऋण म्हणतो आणि ज्याला *नैतिक* ऋण म्हणतो, या दोहोंमध्ये फरक आहे. आर्थिक ऋण म्हणजे आपण एखाद्याचे पैसे देणे लागतो, त्या प्रकारचे ऋण. प्रभूच्या प्रार्थनेत जेव्हा आपण म्हणतो, “जसे आम्ही आपल्या ऋण्यांस ऋण सोडले आहे, तशी तू आमची ऋणे आम्हांस सोड” (मत्तय. ६:१२), तेव्हा आपण आर्थिक ऋणाविषयी बोलत नसतो, आपण नैतिक ऋणाविषयी बोलत असतो. याचे माझे आवडते उदाहरण असे आहे: एक लहान मुलगा आईस्क्रीमच्या दुकानाच्या काउंटरपाशी येतो आणि चॉकलेट आईस्क्रीमचे दोन गोळे मागतो. वाढपी त्याला कोन देऊन म्हणते, “शंभर रूपये होतील,” तेव्हा त्या मुलाच्या चेहऱ्यावर निराशेचे भाव येतात. तो खिशात हात घालून फक्त पन्नास रूपये बाहेर काढतो आणि म्हणतो, “पण माझ्या मम्मीने मला फक्त पन्नास रूपये दिले होते.” त्याच्याकडे आपले देणे फेडण्याइतके पैसे नसतात. हे पाहून मी वाढपीकडे जातो आणि तिला पन्नास रूपयाची नोट देतो. आता प्रश्न असा आहे: पर्यायाने दिलेली ती रक्कम स्वीकारणे वाढपीवर बंधनकारक आहे काय? होय. मी त्या मुलाच्या वतीने कायदेशीर चलन देतो, आणि आता वाढपीने ती रक्कम स्वीकारलीच पाहिजे, कारण ऋण फेडले गेले आहे. ऋण कोणी फेडले, याने काही फरक पडत नाही, ते त्या व्यक्तीच्या नावाने फेडले गेले, एवढेच महत्त्वाचे आहे.

परंतु कल्पना करा की परिस्थिती वेगळी असती. समजा, मी दुकानात उभा आहे आणि वाढपी स्वयंपाकघरात आहे. तो लहान मुलगा दुकानात धावत येतो, काउंटरच्या मागे जातो, स्वतः दोन गोळे आईस्क्रीम काढून कोनात भरतो, आणि दाराबाहेर पळू लागतो. तेव्हा वाढपी त्याला मानेजवळ धरून थांबवते आणि म्हणते, “अरे चिमुकल्या, थांब जरा. तुला काय करीत आहेस असे वाटते?” मग ती पोलिसांना बोलावते, कारण त्या मुलाने आईस्क्रीम चोरले आहे. हे सर्व पाहिल्यानंतर मी म्हणतो, “माझ्याकडे शंभर रूपये आहेत. मी ते देतो, आणि हा सगळा प्रकार इथेच मिटवू या.” आता वाढपीवर ती रक्कम स्वीकारणे बंधनकारक आहे काय? नाही. कारण

येथे केवळ पैशाचे ऋण नाही, तर नैतिक ऋणही आहे. नैतिक ऋणाच्या परिणामांची किंवा दंडाची भरपाई करण्यास एखादी पर्यायी व्यक्ती पुढे आली, तरी ज्याच्याविरुद्ध अपराध झाला आहे, त्याच्याजवळ तो पर्यायी भरणा स्वीकारायचा की नाही, यांत निवड करणे हा त्याचा अधिकार असतो.

ख्रिस्ताच्या प्रायश्चित्तामध्ये, पित्याने त्याच्या पुत्राने दिलेला हा यज्ञ स्वीकारला आणि त्याचा न्याय तृप्त किंवा शांत *(Propitiated)* झाला. *'एक्स्पिएशन'चा* संबंध आपल्यापासून आपले पाप दूर करण्याशी आहे, तर *'प्रोपिशिएन'चा* संबंध देवाशी असलेल्या आपल्या नात्याशी आहे. प्रायश्चित्तामध्ये, ख्रिस्त देवाच्या मागण्या देवाला समाधान होईल अशा प्रकारे पूर्ण करतो, आणि त्यामुळे देवाला मुक्तीचे लाभ त्या सर्वांपर्यंत पोहोचविता येतात, ज्यांचे प्रतिनिधित्व प्रोपिशिएशन करणारा, म्हणजे येशू, करतो.

मंडळीच्या इतिहासात प्रायश्चित्ताविषयीचे अनेक सिद्धांत असे झाले आहेत की, त्यांनी प्रायश्चित्ताच्या समाधानकारक आणि प्रतिनिधिक स्वरू-पाचा नकार केला. काहींनी प्रायश्चित्ताला केवळ मानवी आत्मत्यागाच्या एखाद्या शौर्यपूर्ण कृतीचे उदाहरण ठरविले आहे, किंवा देव पाप आणि नीतिमत्व यांबद्दल गंभीर आहे हे जगाला दाखविण्यासाठी त्याने दिलेला एखादा बोधपाठ मानले आहे. कलम ८ मधील नकार अशा पाखंडी आणि लबाड दृष्टिकोनांचा नकार करतो आणि प्रायश्चित्ताच्या प्रतिनिधिक तसेच समाधानकारक स्वरूपाची पुष्टी करतो.

प्रायश्चित्ताविषयीचे विवेचन केल्यानंतर आपले घोषणापत्र आपल्या तारणाच्या केंद्रस्थानी असलेल्या आणखी एका महत्त्वाच्या सत्याकडे लक्ष वेधते: 'दुहेरी अदलाबदल' *(Double Imputation)*. पुष्टीकरण ९ असे म्हणते:

आम्ही हे मान्य करतो की, ख्रिस्ताच्या तारक कार्यामध्ये आमच्या वतीने त्याचे जीवन आणि त्याचा मृत्यू या दोन्हींचा समावेश होता (गलती. ३:१३). आम्ही घोषित करतो की ख्रिस्ताच्या परिपूर्ण आज्ञाधारकतेवर विश्वास ठेवणे, ज्याद्वारे त्याने आमच्या वतीने देवाच्या नियम शास्त्राच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या, हे सुवार्तेसाठी आवश्यक आहे.

त्यास अनुसरून नकार असा आहे:

आमच्या तारणाचे कार्य केवळ किंवा अनन्यपणे ख्रिस्ताच्या मृत्यूद्वारे, त्याच्या परिपूर्ण धार्मिकतेच्या जीवनाचा संदर्भ न घेता साध्य झाले आहे, हे आम्ही नाकारतो.

एकीकडे आपला दोष आणि आपले पाप आपल्या ऐवजी ख्रिस्ताच्या नावावर मोजले जाते, किंवा त्याच्याकडे हस्तांतरित केले जाते. परंतु त्याव्यतिरिक्त आपल्या तारणाची पूर्णता तेव्हाच साध्य होते, जेव्हा येशूने आपल्या परिपूर्ण आज्ञाधारकतेच्या जीवनाद्वारे जे नीतिमत्व प्राप्त केले आणि जी योग्यता संपादन केली, ती देव आपल्या खात्यात हस्तांतरित करतो. म्हणून सुवार्ता ही केवळ ख्रिस्ताच्या मृत्यूचा संदेश नाही; ती ख्रिस्ताच्या जीवनाचाही संदेश आहे. आपल्या तारणासाठी ख्रिस्ताचे जीवन आणि ख्रिस्ताचा मृत्यू या दोन्ही गोष्टी अपरिहार्य आहेत. तारण हे ख्रिस्त गुड फ्रायडेला पृथ्वीवर आला, मरण पावला आणि स्वर्गात परत गेला म्हणून साध्य झाले, असे नाही. उलट, तो स्त्रीच्या पोटी जन्मला, आणि आपल्या जीवनाच्या प्रारंभापासून मृत्यूपर्यंत नियम शास्त्राच्या प्रत्येक आज्ञेला आज्ञांकित राहिला. तो देवाच्या करारातील लोकांचा नवा प्रतिनिधी, शेवटचा आदाम, आहे. ज्याप्रमाणे पहिल्या आदामाच्या (ज्याने मानवजातीचे प्रतिनिधित्व केले) आज्ञाभंगामुळे जगात मृत्यू आणि सर्व प्रकारचे विनाशकारी परिणाम आले, त्याचप्रमाणे

नवीन करार ‘शेवटच्या आदामा’बद्दल सांगतो, ज्याच्या आज्ञाधारकतेमुळे आपण नीतिमान ठरू शकतो आणि देवाबरोबर समेट करू शकतो (१ करिंथ. १५:२१–२२, ४५).

ख्रिस्ताच्या मृत्यूमध्ये पापावरील नकारात्मक न्याय तृप्त होऊन पूर्णत्वास जातो; परंतु त्याच्या जीवनात योग्यता आणि नीतिमत्व यांची सकारात्मक संपादन प्रक्रिया पूर्ण होते. पाहा, आपल्याला या दोन्हींची आवश्यकता आहे. आपला दोष दूर करील अशा कशाची तरी आपल्याला गरज आहे, आणि प्रायश्चित्त नेमके तेच करते. पण ख्रिस्ताने केवळ तेवढेच केले असते, तर आपण फक्त ‘शून्य’ स्तरावर पोहोचलो असतो. त्याने आपल्याला निर्दोषत्व दिले असते, पण नीतिमत्व दिले नसते. नीतिमत्व ही साध्य करून प्राप्त करावी लागणारी गोष्ट आहे. आणि ते आपण स्वतःच्या बळावर साध्य करू शकत नाही. मुद्दा हा आहे : सुवार्ता घोषित करते की ख्रिस्त आपल्या करिता मरण पावला, आणि आपल्या करिताच जगलाही. तो *‘आरोपणाद्वारे’ (Imputation)* आमचा दोष स्वतःवर घेतो. त्याचप्रमाणे, आरोपणाद्वारे तो आम्हाला आपली योग्यता देखील बहाल करतो.

ख्रिस्ताच्या परिपूर्ण आज्ञाधारकतेवर विश्वास ठेवणे, ज्याद्वारे त्याने आमच्यासाठी देवाच्या नियमशास्त्राच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या, हे तारणासाठी आवश्यक आहे. जेव्हा आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवतो, तेव्हा आपण केवळ त्याच्या व्यक्तीवरच नाही तर त्याच्या कार्यावर देखील विश्वास ठेवतो, जे त्याने आमच्या वतीने साध्य केले आहे. सुवार्तेवर विश्वास ठेवणे म्हणजे देवाच्या न्यायाच्या मागण्या पूर्ण करण्याइतके नीतिमान आपण कधीही जगू शकू, या आशेचा त्याग करणे आणि त्याऐवजी ख्रिस्ताने त्याच्या जीवनात तसेच त्याच्या मरणात आपल्यासाठी जे काही केले, त्यावर पूर्णपणे विसंबून राहणे व भरवसा ठेवणे होय.

## परिपूर्ण यज्ञार्पण

आपण येशू ख्रिस्तावरील विश्वासाने नीतिमान ठरतो, असे जरी सुवार्तेचे स्पष्ट शब्द घोषित करीत असले, तरी त्या प्रतिपादनामागे एक असे गृहीतक दडलेले आहे जे अव्यक्त राहते, आणि ते असे की देवासमोर नीतिमान ठरविले जाणे हे कर्मांनीच, आणि केवळ कर्मांनीच, घडते. हे कसे शक्य आहे? आपण तर “केवळ विश्वासाने नीतिमान ठरविले जाणे” या सिद्धांताचा अतिशय ठाम बचाव करतो, नाही काय? मग नीतिमान ठरविले जाणे हे केवळ कर्मांनी कसे असू शकते? याचे कारण असे की आपले नीतिमान ठरविले जाणे हे येशू ख्रिस्ताच्या कर्मांद्वारे घडते. आपण विश्वासाने नीतिमान ठरतो, असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा हाच अर्थ अभिप्रेत असतो. कारण आपला विश्वास आणि भरवसा त्या कर्मांवर असतो, जी आपल्याऐवजी दुसऱ्याने केली आहेत. नीतिमत्व आणि देवाच्या अभिवचनांचे आशीर्वाद हे येशूच्या कर्मांनीच साध्य केली जातात; आणि देवाने मानवाशी केलेला मूळ करार त्याच्या चांगल्या कर्मांद्वारेच पूर्णत्वास गेला. जिथे आदाम आपल्या कर्मांमध्ये अपयशी ठरला, तिथे ख्रिस्त आपल्या कर्मांमध्ये विजयी झाला; आणि आपण जेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवतो, तेव्हा त्याच्याच चांगल्या कर्मांद्वारे आपली मुक्ती सिद्धीस जाते. अंतिम विश्लेषणात असे, आपला न्याय कर्मांनीच केला जाणार आहे, आणि देवासमोर आपण दोन मार्गांपैकी एका मार्गाने उभे राहणार आहोत. एकतर आपण आपल्या कर्मांच्या आधारावर देवाच्या न्यायासमोर उभे राहू, किंवा ख्रिस्ताच्या कार्याच्या आधारावर उभे राहू. जर आपण आपल्या कर्मांच्या आधारावर उभे राहिलो, तर ती कुवार्ता ठरेल, याची मी तुम्हांला खात्री देतो. पण जर आपण ख्रिस्ताच्या कर्मांच्या आधारावर उभे राहिलो, तर आपण सुवार्तेच्या चांगल्या बातमीच्या पायावर उभे राहू.

## प्रकरण ६

# पुनरुत्थान आणि नीतिमान ठरणे

नव्या करारात, जेव्हा सुरुवातीच्या मंडळीने ख्रिस्ताचा संदेश घोषित केला, तेव्हा त्यामध्ये येशूच्या जीवनाचा सारांश होता, ज्यात वधस्तंभ आणि प्रायश्चित्तासह पुनरुत्थानाचाही समावेश होता. *“तो उठला आहे”* हा वाक्यांश नवीन कराराचा संदेश आणि संपूर्ण ऐतिहासिक ख्रिस्ती धर्म समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, जसे की “येशू ख्रिस्ताची सुवार्ता” या घोषणापत्रातील कलम १० मध्येही हेच प्रतिबिंबित झालेले दिसते. पुष्टीकरण १० असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, ख्रिस्ताचे मृतांतून झालेले सदेह पुनरुत्थान हे बायबल-सम्मत सुवार्तेसाठी आवश्यक आहे (१ करिंथ. १५:१४).

त्यास अनुसरून नकार असा आहे:

ख्रिस्ताच्या सदेह पुनरुत्थानाची ऐतिहासिक सत्यता नाकारणाऱ्या कोणत्याही तथाकथित सुवार्तेची वैधता आम्ही नाकारतो.

येशूच्या पुनरुत्थानात आपण सर्वप्रथम जी गोष्ट पाहतो, ती म्हणजे ख्रिस्त स्वतः नीतिमान ठरला *(Vindicated)*. तो स्वतः निष्पाप होता. मृत्यूचा त्याच्यावर कोणताही अधिकार नव्हता कारण मृत्यू हा पापासाठी देवाने दिलेला दंड आहे, आणि जो पूर्णपणे निष्पाप आहे, त्याला पापासाठी अखंड असा कायमस्वरूपी दंड देणे हे देवाच्या न्यायाशी सुसंगत ठरणार नाही. आपल्याला माहीत आहे की ख्रिस्ताने स्वेच्छेने आपले पाप स्वतःवर घेतले, आणि वधस्तंभावर त्याने जे दुःख सोसले ते स्वतः त्याच्यात काही दोष होता म्हणून नव्हे, तर आमच्यात असलेल्या दोषासाठी सोसले. तरीही, पुनरुत्थानाद्वारे देव आपल्या पुत्राचे निर्दोषत्व आणि नीतिमत्व जाहीर करतो. म्हणूनच पवित्र शास्त्र असे म्हणते की त्याला मरणाच्या स्वाधीन राहणे अशक्य होते (प्रेषित. २:२४). संशयवादी म्हणतात की आपण पुनरुत्थानावर विश्वास ठेवू शकत नाही कारण कोणाचेही मेलेल्यांतून परत येणे अशक्य आहे. नवीन करार हे ‘अशक्य’ पद दुसऱ्या बाजूला ठेवतो; तो निष्पाप असल्यामुळे त्याचे मेलेल्यांतून परत *न* येणे हेच मुळी अशक्य होते.

पुनरुत्थान सुवार्तेसाठी इतके महत्त्वाचे असण्याचे दुसरे कारण असे की, नवीन करार असे घोषित करतो की ख्रिस्ताने आमच्या पापांसाठी प्रायश्चित्त केले आणि तो आम्हाला “नीतिमान ठरवण्यासाठी” उठविला गेला. देवासमोर आम्हाला जे नीतिमान असे ठरविले जाते, त्याचा पाया ख्रिस्ताच्या कार्यावर बांधलेला आहे. आता कल्पना करा की तो परिपूर्ण नीतिमत्वाचे जीवन जगला, मरण पावला आणि मृतच राहिला. मग त्याने दिलेला यज्ञ पित्याने स्वीकारला आहे यावर विश्वास ठेवण्यासाठी आमच्याकडे कोणतेही

कारण उरले नसते. परंतु, मार्स हिलवरील आपल्या भाषणात पौल सांगतो त्याप्रमाणे, पिता पुनरुत्थानाद्वारे पुत्राला नीतिमान ठरवतो आणि त्याच्या समेट घडवणाऱ्या कार्याची सत्यता सिद्ध करतो (प्रेषित. १७:२२-३१). आपल्या पुत्राला मेलेल्यांतून उठवून देव ही साक्ष देतो की तो त्याच्या पुत्राच्या कार्याविषयी संतुष्ट झाला आहे.

हा एक असा मुद्दा आहे ज्याकडे आपण दुर्लक्ष करता कामा नये. सहसा, जेव्हा ख्रिस्ती लोक ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा विचार करतात, तेव्हा पुनरुत्थानापासून मिळणारा मुख्य फायदा म्हणजे ही आशा की आपणही मृत्यूवर विजय मिळवू. नक्कीच, नवीन करार आपल्याला दाखवतो की ख्रिस्त केवळ स्वत:साठी उठवला गेला नाही, तर जो कोणी पुनरुत्थानात सहभागी होईल त्यांच्यासाठी तो 'प्रथमफळ' म्हणून उठला आहे. हे आपल्याला दर्शवते की देवाने ख्रिस्ताचा आशीर्वाद त्या सर्वांना देण्याचे वचन दिले आहे ज्यांचे तो प्रतिनिधित्व करतो (१ करिंथ. १५:२३). येशूच्या पुनरुत्थानाद्वारे सार्वकालिक जीवनाची आशा खरोखरच आपल्याकरिता दृढ आणि सुनिश्चित झाली आहे. परंतु त्या अद्भुत लाभाचा, म्हणजे आपण मरणावर विजय मिळवू या सत्याचा, विचार करताना, पुनरुत्थानाचा नीतिमान ठरविले जाण्याशी असलेला संबंध आपण विसरता कामा नये. आपण मृत्यूवर विजय मिळवू याचे कारण हेच आहे की ख्रिस्ताने मरणाचे सामर्थ्य त्याच्या प्रायश्चित्ताद्वारे आणि त्याच्या परिपूर्ण आज्ञांकित जीवनाद्वारे पराभूत केले आहे. या दृष्टीने पाहिले, तर पुनरुत्थान हे आमच्या नीतिमान ठरविले जाण्यापासून अविभाज्य आहे; आणि म्हणूनच ते सुवार्तेसाठी एक आवश्यक तत्त्व आहे.

प्रेषित पौलाला अशा लोकांशी सामना करावा लागला, ज्यांना पुनरुत्थानावाचून ख्रिस्ती धर्म उभारायचा होता. १ करिंथ. १५ मध्ये पौल पुनरुत्थानाच्या खऱ्या ऐतिहासिक स्वरूपाचा आपला सर्वात समर्थ बचाव

सादर करतो, जेथे तो अशांना संबोधित करतो जे पुनरुत्थानाशिवाय ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा प्रयत्न करत होते. पौल म्हणाला की, जर पुनरुत्थान नाही, तर ख्रिस्तही उठविला गेला नाही, आणि जर ख्रिस्त उठविला गेला नाही, तर मग काय? त्याचे परिणाम काय आहेत? ख्रिस्त उठविला गेला नाही हे गृहीतक धरून तो त्याला त्याच्या तर्कसंगत आणि निरर्थक निष्कर्षापर्यंत नेतो. जर ख्रिस्त अजूनही मृत असता, तर कोणी त्याला काही महत्त्व का दिले असते? जसे पौल लिहितो, जर ख्रिस्त उठविला गेला नाही, तर आपण अजूनही आपल्या पापांत आहोत. तुम्ही पाहा, आपण नीतिमान ठरविले गेलो आहोत यावर विश्वास ठेवण्यास आपल्याकडे कोणतेही कारण नाही. आपण देवाचे खोटे साक्षीदार आहोत. आपण जगाला केवळ ख्रिस्त मृतांमधून उठविला गेला एवढेच सांगत नाही, तर देवानेच त्याला मृतांमधून उठविले हे सांगत आहोत. जर हे सत्य नसेल, तर आमची घोषणा व्यर्थ आहे आणि तुमचा विश्वासही व्यर्थ आहे. आणि आपण सर्व माणसांत अत्यंत दयनीय आहोत. जे मरण पावले आहेत त्यांचा नाश झाला आहे, आणि आपल्याला कबरेपलीकडे कोणतीही आशा नाही.

पौल असे म्हणतो की, पुनरुत्थानाच्या केंद्रीय सत्याकडे दुर्लक्ष करून ख्रिस्ती धर्माला केवळ एका नीतिशास्त्रीय व्यवस्थेत *(ethical system)* बसवण्याचा प्रयत्न करणे हा मूर्खपणा आहे. ज्या शतकांमध्ये ख्रिस्ताचे परमेश्वरत्व नाकारले गेले (चौथे, पाचवे, एकोणिसावे आणि विसावे शतक), त्या काळात ऐतिहासिक ख्रिस्ती धर्माची फेररचना करून त्यातून पुनरुत्थान वगळण्याचे मोठे प्रयत्न झाले. मी अनेक वर्षे अशा एका सेवकाच्या हाता-खाली होतो ज्यांचा ख्रिस्ताच्या खऱ्या ऐतिहासिक पुनरुत्थानावर विश्वासच नव्हता. ते त्याला एक प्रतीकात्मक महत्त्व द्यायचे आणि म्हणायचे की नव्या करारातील पुनरुत्थानाचा संदेश हा एवढाच आहे की आपण धैर्याने नवीन दिवसाच्या पहाटेचा सामना करावा. हे मला नव्या करारापेक्षा फ्रेडरिक

नित्शेच्या विचारांशी अधिक सुसंगत वाटले, म्हणून मी त्यांना म्हणालो: "जर ख्रिस्त मृतच आहे, तर मी उद्या सकाळी झोपून राहणार आहे. जर ती खोटी आशा असेल तर मी माझ्या आयुष्यातील पुढची पाच मिनिटे ख्रिस्ती म्हणून घालवणार नाही." खरे पाहता, जर पुनरुत्थान सत्य नसते, तर मी त्या लोकांमध्ये गणला गेलो असतो जे सर्वात दयापात्र आहेत कारण मी एका जिवंत प्रभूऐवजी एका मृत स्वामीची सेवा करण्यासाठी माझे जीवन समर्पित केलेले असते.

विसाव्या शतकात नव्या कराराचा असा अर्थ लावण्याचा प्रयत्न झाला की पुनरुत्थान म्हणजे शिष्यांना आलेला एक आंतरिक अनुभव होता, जिथे त्यांना अचानक येशू कोण होता आणि तो काय करत होता, याची जाणीव झाली. पुनरुत्थान दर्शवणाऱ्या नव्या करारातील सर्व वृत्तांत केवळ शिष्यांना झालेला बोध दर्शवणारे दृष्टांत आहेत; त्यांना येशू खरोखर कोण आहे हे समजले, इतकेच. मेलेल्यांतून परत आलेल्या व्यक्तीला त्यांनी प्रत्यक्षात आपल्या डोळ्यांनी पाहिले असा कोणताही वास्तविक इंद्रियगोचर अनुभव त्यांना आला नव्हता.

आमच्या घोषणापत्रात म्हटल्याप्रमाणे, जर तुम्ही ख्रिस्ताच्या खऱ्या, सदेह, ऐतिहासिक पुनरुत्थानाचा नकार केला, तर तुम्ही सुवार्तेच्या मूळ गाभ्याचाच नकार केला आहे, आणि तुमचा जो काही विश्वास असेल तो नव्या करारातील सुवार्तेवरचा विश्वास नाही, जी आपल्याला कळविण्यात आली होती. पुन्हा एकदा, घोषणापत्र असे म्हणते की ख्रिस्ताच्या सदेह पुनरुत्थानाची ऐतिहासिक सत्यता नाकारणाऱ्या कोणत्याही तथाकथित सुवार्तेची वैधता आम्ही नाकारतो.

या नकारात वापरलेले तीन निकष लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. एक, पुनरुत्थान *ऐतिहासिक* आहे. दोन, ते वास्तविक आहे. आणि तीन, ते *सदेह* आहे. हे पुष्टीकरण असे सांगते की सुवार्तेच्या केंद्रस्थानी हाच दावा करण्यात

आला आहे की नाझरेथचा येशू खरोखरच मेलेल्यांतून परत आला आणि तो ज्या शरीरात मरण पावला होता त्याच शरीरात परत आला. ते नवीन शरीर नव्हते; ते बदललेले शरीर होते. ते गौरवी शरीर होते, परंतु जे शरीर थडग्यात ठेवले गेले होते आणि जे शरीर थडग्यातून बाहेर आले, त्यामध्ये सातत्य होते. ते भौतिक पुनरुत्थान होते. ते स्थान आणि वेळेत *(space and time)* घडलेले वास्तविक पुनरुत्थान होते.

आता आपण कलम ११ कडे वळू या, जो नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांतावर केंद्रित आहे. पुष्टीकरण ११ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, केवळ ख्रिस्तावर, केवळ विश्वासाद्वारे, नीतिमान ठरविले जाणे हा बायबल-सम्मत सिद्धांत सुवार्तेसाठी आवश्यक तत्त्व आहे (रोम. ३:२८; ४:५; गलती. २:१६).
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> कोणताही मनुष्य बायबल-सम्मत सुवार्तेवर विश्वास ठेवू शकतो आणि त्याच वेळी केवळ ख्रिस्तावर, केवळ विश्वासाद्वारे, नीतिमान ठरविले जाणे या प्रेषितीय शिक्षणाचा नकार करू शकतो, हे आम्ही नाकारतो. तसेच एकापेक्षा अधिक खरी सुवार्ता आहे, हाही दावा आम्ही नाकारतो (गलती. १:६-९).

ख्रिस्ताचे व्यक्तित्व आणि त्याचे कार्य हे सुवार्तेचे केंद्रस्थान आहेत. म्हणूनच या घोषणापत्राचा मोठा भाग ख्रिस्त, त्याचे देहधारण, त्याचे परमेश्वरत्त्व, त्याचे प्रायश्चित्त, आणि त्याचे पुनरुत्थान यांविषयी मंडळीने ऐतिहासिकरीत्या मान्य केलेल्या सिद्धांतांची पुन:पुष्टी करतो. परंतु शुभ-वर्तमान ही केवळ येशू कोण आहे आणि त्याने इतिहासात काय केले, एवढ्यापुरतेच मर्यादित नाही, तर येशूने जे साध्य केले त्यातून आपल्याला

कोणते लाभ प्राप्त होतात, आणि ते लाभ आपण कशा रीतीने प्राप्त करतो, हेदेखील तिच्या आशयात अंतर्भूत आहे. म्हणजेच, सुवार्ता ही आपण ख्रिस्ताबरोबर कशाप्रकारे एकात्म झाले आहोत आणि तो आपले तारण कसे घडवून आणतो, तो आपला तारणारा कसा आहे, या गोष्टींचा संदेश आहे.

रोम. १ मध्ये प्रेषित पौल देवाच्या सुवार्तेच्या प्रकटीकरणाची घोषणा करतो. त्यानंतर तो काही अध्यायांमध्ये त्या सुवार्तेचा आशय उलगडत नेतो. तो आपल्याला नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताच्या मध्यवर्ती महत्त्वापर्यंत घेऊन येतो, कारण नीतिमान ठरविले जाणे हे ख्रिस्ताने आपल्याकरिता साध्य केलेल्या कार्याचे फळ आहे. त्याच्या व्यक्तित्वाद्वारे आणि त्याच्या कार्याद्वारेच आपण देवाच्या दृष्टीने नीतिमान ठरविले जाऊ शकतो. आपण नियमशास्त्राच्या कर्मांनी नव्हे, तर विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जातो, ही विचारधारा सुवार्तेचा अविभाज्य घटक आहे.

प्रोटेस्टंट धर्मसुधारणेच्या काळापासून मंडळीने या विश्वासाचा अंगीकार केला आहे की आमचे नीतिमान ठरविले जाणे हे केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवल्याने, आणि केवळ विश्वासाद्वारे होते. खरे तर, सोला फिडे हा शब्द, जो नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताचा लॅटिन संक्षेप आहे, त्याचा सरळ अर्थ हाच की आपण केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जातो. केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे म्हणजे केवळ ख्रिस्तावर आपला भरवसा ठेवून नीतिमान ठरविले जाणे होय. धर्मसुधारकांनी असे शिकविले की विश्वास हे आपल्या नीतिमान ठरविले जाण्याचे एकमेव माध्यम आहे. विश्वास हे ते माध्यम आहे, ज्याद्वारे आपण ख्रिस्ताच्या कार्याचे लाभ प्राप्त करतो; ख्रिस्ताने आपल्याकरिता जे काही केले, ते विश्वासाद्वारेच आपल्या वाट्याला येते.

कलम ११ असे सांगते की, कोणताही मनुष्य बायबल-सम्मत सुवार्तेवर विश्वास ठेवू शकतो आणि त्याच वेळी केवळ ख्रिस्तावर, केवळ विश्वासाद्वारे,

नीतिमान ठरविले जाणे या प्रेषितीय शिक्षणाचा नकार करू शकतो, हे आम्ही नाकारतो. हे ख्रिस्ती जगताच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या विवादाकडे निर्देश करते, जो सोळाव्या शतकात उफाळून आला आणि ज्यामुळे प्रोटेस्टंट धर्मसुधारणा घडून आली. सोळाव्या शतकातील हा वाद सुवार्तेवरच केंद्रित होता. सोला फिडे, म्हणजे केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे, या सिद्धांतावर ज्यांचा विश्वास होता, ते बायबल-सम्मत आणि प्रेषितीय सुवार्तेसाठीच संघर्ष करीत होते. प्रोटेस्टंट आणि रोमन कॅथोलिक मंडळी यांच्यामधील वाद हा मुळात सुवार्ता नेमकी काय आहे, याविषयीच होता. रोमन कॅथोलिक मंडळीने सोला फिडे, म्हणजे केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे, याचा नकार केला आणि त्याचा निषेधही केला.

गलतीकरांस पत्रात यहुदी मतवाद्यांच्या पाखंडाला संबोधित करताना पौल असे लिहितो की, नव्या करारात मांडलेल्या सुवार्तेवाचून अन्य कोणत्याही सुवार्तेचा आपण स्वीकार करू नये (गलती. १:६-९). सुवार्ता एकच आहे, आणि ती एकमेव सुवार्ता आपल्याला सांगते की आपण केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जातो. या नकाराचा आशय असा आहे की जर कोणी म्हणत असेल की तो सुवार्तेवर विश्वास ठेवतो, पण त्याच वेळी केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे या सत्याचा नकार करतो, तर तो ज्या गोष्टीवर विश्वास ठेवतो, ती बायबल-सम्मत सुवार्ता नाही. ती दुसरी काही गोष्ट असू शकेल; पण ती नव्या करारातील सुवार्ता नाही, आणि त्यामुळे तिला एक कुवार्ताच म्हटले गेले पाहिजे.

ही पुष्टीकरणे बायबल-सम्मत सुवार्तेसाठी, खऱ्या सुवार्तेसाठी, अनिवार्य आहेत, आणि त्यांच्यावाचून सुवार्तेचा मूळ गाभाच आपल्या हातात राहत नाही. सोळाव्या शतकात जसे झाले, तसेच आपल्या काळातही नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताविषयी गंभीर वाद उद्भवले आहेत. त्या वादांचा मोठा भाग नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताच्या मूलभूत अर्थाविषयी

असलेल्या आपल्या अज्ञानातून निर्माण झाला आहे. ही अत्यंत धोकादायक स्थिती आहे; कारण नवा करार केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे या सत्याला सुवार्तेशी अविभाज्य रीतीने जोडतो. आपल्याला नीतिमान ठरविले जाणे समजत नसेल, तर सुवार्ता खऱ्या अर्थाने समजत नाही. आणि जर आपण सुवार्ता गाजवणार असू, तर आपण केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जातो, हाच संदेश आपण गाजवला पाहिजे.

प्रकरण ७

# नीतिमान गणले जाणे

“द गॉस्पेल ऑफ जीझस क्राइस्ट: ॲन इव्हॅन्जेलिकल सेलिब्रेशन” (मराठीत “येशू ख्रिस्ताची सुवार्ता: एक इव्हॅन्जेलिकल उत्सव”) या घोषणापत्रातील पुष्टीकरणाच्या सर्व कलमांपैकी, कलम १२ ही सुवार्तेविषयीच्या ऐतिहासिक इव्हॅन्जेलिकल ईश्वरशास्त्राचा आणि रोमन कॅथोलिक चर्चने पारंपरिकपणे मांडलेल्या सिद्धांतामधील फरक अत्यंत थोडक्यात आणि स्पष्टपणे मांडते. पुष्टीकरण १२ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, ‘नीतिमान गणले जाणे’ हा सिद्धांत, म्हणजे आमची पापे ख्रिस्ताच्या खात्यावर आणि त्याचे नीतिमत्व आमच्या खात्यावर गणले जाते हा सिद्धांत, ज्याद्वारे आमची पापे पूर्णपणे क्षमा केली जातात आणि आम्हाला पूर्णपणे स्वीकारले

> जाते, हा बायबल-सम्मत सुवार्तेसाठी आवश्यक घटक आहे (२ करिंथ. ५:१९-२१).
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> ख्रिस्ताचे नीतिमत्व हे आमच्यात तात्त्विकदृष्ट्या अंगी उतरविले जाते त्यामुळे, किंवा आमच्या अंगी असलेल्या कोणत्याही नीतिमत्वाद्वारे आम्ही नीतिमान ठरविले जातो, हे आम्ही नाकारतो.

मार्टिन लूथर यांच्या कार्यापासून 'धर्मसुधारणा' *(Reformation)* सुरू झाली, परंतु ट्रेंट परिषदेत, जिथे रोमन कॅथोलिक चर्चने प्रोटेस्टंट दृष्टिकोनावर शापाची घोषणा केली, त्याआधी दोन्ही पक्षांना एकत्र आणण्याचा एक प्रयत्न झाला होता. धर्मसुधारणावादी गटाचे प्रतिनिधी मंडळ आणि रोमन कॅथोलिक मंडळीचे प्रतिनिधी मंडळ जर्मनीतील रेगेन्सबर्ग येथे एकत्र भेटले. त्यांनी या दोन्ही पक्षांमध्ये तडजोड आणि समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आणि काही काळासाठी तरी हा प्रयत्न यशस्वी होईल असे वाटत होते, परंतु शेवटी तो निष्फळ ठरला.

ज्या बिंदूवर या दोन्ही बाजूंना एकमत साधता आले नाही, तो मुद्दा नीतिमान ठरविले जाण्याच्या अंतिम आधाराशी संबंधित होता. देव एखाद्या मनुष्याला आपल्या दृष्टीने नीतिमान घोषित करतो, त्याचा आधार नेमका कोणता? हा वाद दोन शब्दांभोवती फिरत होता. पहिला शब्द होता *'नीतिमान गणले जाणे'*, आणि तो इव्हॅन्जेलिकल लोकांचा मान्यताप्राप्त शब्द होता. रोमन कॅथोलिक मंडळीने मात्र *नीतिमत्व तत्त्व स्वरूपात ओतले जाणे*, म्हणजे *नीतिमत्व हे आमच्यात तत्त्व स्वरूपात अंगी उतरविले जाते* या शब्दांवर आग्रह धरला. या दोन विरोधी सिद्धांतातील फरक लक्षात घेण्यापूर्वी, एक गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे : दोन्ही पक्ष मान्य करीत होते की काही ना काही अर्थाने आपण ख्रिस्ताच्या नीतिमत्वाद्वारे नीतिमान

ठरविले जातो. पण निर्णायक प्रश्न असा उभा राहिला की, नेमक्या कोणत्या अर्थाने आपण ख्रिस्ताच्या नीतिमत्वाद्वारे नीतिमान ठरविले जातो? ख्रिस्ताचे नीतिमत्व आपल्या नीतिमान ठरविले जाण्यासाठी कोणत्या प्रकारे, किंवा कोणत्या रीतीने, उपयोगी पडते? हा फरक समजून घेण्यासाठी, आपण प्रथम रोमन कॅथोलिक दृष्टिकोनाकडे थोडक्यात पाहू या.

रोमन कॅथोलिक मंडळीच्या मते, नीतिमान ठरविले जाण्याचा प्रारंभ बाप्तिस्म्यापासून होतो. त्यांच्या शिकवणीनुसार, बाप्तिस्मा हे ते साधन आहे, ज्याद्वारे नीतिमान ठरविले जाणे ही प्रक्रिया सुरुवातीस घडते. रोमन कॅथोलिक मंडळीचा असा विश्वास आहे की बाप्तिस्म्याच्या वेळी ख्रिस्ताचे नीतिमत्व हे तत्त्व स्वरूपात आमच्या आत्म्यात ओतले जाते. या “ओतले जाणे” याचा अर्थ असा की नीतिमान ठरविणारी कृपा, म्हणजे ख्रिस्ताच्या नीतिमत्वाची कृपा, विश्वास ठेवणाऱ्याच्या आत्म्यात ओतली जाते. त्यानंतर ज्याला ही कृपा प्राप्त झाली आहे, त्याने त्या कृपेला सहकार्य केले पाहिजे आणि तिला संमती दिली पाहिजे. ट्रेंट परिषदेच्या मते, जेव्हा खरे नीतिमत्व विश्वास ठेवणाऱ्यामध्ये तत्त्व स्वरूपात उतरविली जाते, आणि ते नीतिमत्व त्या व्यक्तीमध्ये प्रत्यक्ष वास करीत असते, तेव्हाच देव त्या व्यक्तीला आपल्या दृष्टीने नीतिमान घोषित करतो.

जेव्हा एखादी व्यक्ती नीतिमान ठरविण्याची कृपा प्राप्त करते, आणि तिला सहकार्य करून तिची संमती देते, तेव्हा ती व्यक्ती तारणाच्या स्थितीत प्रवेश करते. आणि जोपर्यंत किंवा जोवर ती एखादे प्राणघातक पाप करीत नाही, तोवर ती त्या स्थितीत राहते. एखाद्या पापाला *प्राणघातक* असे यासाठी म्हटले जाते की ते आत्म्यातील ही अंतर्भूत, तत्त्व स्वरूपात ओतलेली कृपा नष्ट करते. एकदा ही कृपा नष्ट झाली की, त्या व्यक्तीला पुन्हा नीतिमान ठरविले जावे लागते; आणि हे पुनः-नीतिमान ठरविले जाणे दुसऱ्या एका विधिसंस्काराद्वारे *(sacrament)* येते, म्हणजे प्रायश्चित्ताद्वारे

*(Penance)*. रोमन कॅथोलिक चर्च प्रायश्चित्ताच्या विधीला त्या लोकांसाठी नीतिमान ठरण्याचा 'दुसरा आधार' *(second plank)* म्हणून परिभाषित करते ज्यांच्या आत्म्याचे तारू फुटले आहे. तारण हरवते आणि ते पुनर्स्थापित करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे कृपेचे नवीन सिंचन, जे आता प्रायश्चित्ताच्या विधिद्वारे मिळते. सुरुवातीला लूथर यांच्याशी जो वाद निर्माण झाला, तो प्रायश्चित्ताच्या विधिसंस्काराशी निगडित प्रश्नांमुळे, विशेषतः क्षमापत्रांच्या *(indulgences)* समस्येमुळे, निर्माण झाला होता.

रोमन कॅथोलिक चर्चच्या विरोधात, धर्मसुधारकांनी असे शिकवले की आपण नीतिमान ठरविले जातो ते आम्हांमध्ये नीतिमत्त्व तत्त्व स्वरूपात ओतल्या जाते म्हणून नव्हे, तर नीतिमत्त्व हे आमच्या खात्यात गणले जाते म्हणून आपण नीतिमान ठरविले जातो. नीतिमान गणले जाण्याचा संबंध देवाच्या त्या न्यायवैधानिक घोषणेशी, किंवा निर्णयाशी, आहे, ज्याद्वारे तो एका व्यक्तीची नोंद दुसऱ्याच्या खात्यावर गणतो किंवा जमा करतो. नीतिमान ठरविले जाण्याच्या बाबतीत *'नीतिमान गणले जाणे'* हा दुतर्फा मार्ग आहे; तो दोन्ही दिशांनी प्रवाहित होतो. प्रथम, ख्रिस्त वधस्तंभावर आपल्या पापांचा दंड स्वतःवर घेतो. प्रायश्चित्तामध्ये ख्रिस्त पापवाहक ठरतो. देव जेव्हा आपला दोष आपल्याकडून त्याच्याकडे हस्तांतरित करतो, तेव्हा तो पापवाहक बनतो. ख्रिस्त जुन्या करारातील प्रायश्चित्तदिनी होणाऱ्या विधीची पूर्तता करतो. त्या दिवशी मुख्य याजक प्रतीकात्मक रीतीने पापवाहक बकऱ्याच्या डोक्यावर आपले हात ठेवत असे. हे लोकांच्या पापांचे त्या बकऱ्याकडे हस्तांतरण, म्हणजेच 'पाप गणले जाणे', दर्शवीत असे. पाप आणि दोष त्या बकऱ्याकडे हस्तांतरित झाल्यावर त्याला अरण्यात, बाहेरील अंधारात, हाकलून दिले जात असे. 'गणले जाणे' ह्या संकल्पनेचे मूळ जुन्या करारातील यज्ञप्रणालीत आहे; आणि वधस्तंभावर देवाच्या न्यायवैधानिक घोषणेद्वारे आमची पापे ख्रिस्ताकडे हस्तांतरित केली जातात.

परंतु ही आपल्या नीतिमान ठरविले जाण्याच्या वृत्तांताची केवळ अर्धीच बाजू आहे. ख्रिस्ताने आमच्या अपराधांची किंमत चुकविल्यानंतर आपण कदाचित निर्दोषत्वाच्या स्थितीत येऊ; परंतु आमच्या ठायी कोणतेही नीतिमत्व, किंवा कोणतीही विशिष्ट योग्यता नसते. आणि देव, नीतिमान ठरविण्याच्या कृतीत, आमच्यामध्ये त्याचे नियमशास्त्र पूर्ण झालेले पाहतो. जसे आम्ही म्हटले आहे, ख्रिस्त केवळ आपल्या लोकांसाठी मरण पावला नाही, तर जे जीवन तो जगला, ते देखील आमच्यासाठीच होते. आपली मुक्ती केवळ ख्रिस्ताच्या मृत्यूनेच साध्य झाली नाही, जरी ती गोष्ट आपल्या तारणासाठी अत्यंत आवश्यक आणि निर्णायक होती. पुन्हा एकदा सांगायचे, तर येशू फक्त गुड फ्रायडेला स्वर्गातून खाली आला, वधस्तंभावर गेला, आणि मग पुन्हा स्वर्गात परतला, असे नाही. त्याचा जन्म बालक म्हणून झाला, आणि जन्माच्या क्षणापासून तो देवाच्या संपूर्ण नियम शास्त्राच्या अधीन होता. त्याचे संपूर्ण जीवन देवाचे नियमशास्त्र प्रत्येक बाबतीत पूर्ण करण्यासाठी खर्च झाले, जेणेकरून त्याच्या परिपूर्ण नीतिमत्वाद्वारे त्याने देवाचा आशीर्वाद संपादन केला. पुन्हा एकदा सांगायचे तर, आम्हाला नीतिमान ठरविले जाण्यात दुहेरे 'गणले जाणे' आहे. एका बाजूला, आमचे पाप हे ख्रिस्ताकडे गणले जाते, आणि दुसऱ्या बाजूला, त्याचे नीतिमत्व आमच्याकडे गणले जाते.

रोमन कॅथोलिक चर्चसाठी, नीतिमान ठरविले जाण्याचे साधन प्रथम बाप्तिस्मा, आणि नंतर प्रायश्चित्त हा विधिसंस्कार, असे आहे. धर्म-सुधारकांसाठी मात्र नीतिमान ठरविले जाण्याचे माध्यम विश्वास आहे. तेच ते माध्यम आहे, ज्याद्वारे आपण ख्रिस्ताला धरून ठेवतो, आणि ज्याद्वारे ख्रिस्ताची योग्यता विश्वास ठेवणाऱ्याच्या वाट्याला येते; परिणामी, जे जे ख्रिस्तावर भरवसा ठेवतात, त्यांच्या खात्यावर ख्रिस्ताचे नीतिमत्व गणले जाते, किंवा हस्तांतरित केले जाते. रोमन कॅथोलिक चर्चने गणले जाण्याची

ही संकल्पना नाकारली, आणि असे म्हटले की त्यात त्यांनी ज्याला "कायदेशीर कल्पितरचना" म्हटले, तशा गोष्टीचा समावेश होतो. म्हणजे, जर देवाने अशी कायदेशीर घोषणा केली की तो एका व्यक्तीचे नीतिमत्व दुसऱ्याकडे हस्तांतरित करील, तर ती गोष्ट काल्पनिक ठरेल. त्यामुळे देवावर खोटारडेपणाचा आरोप लागतो, कारण ती गोष्ट सत्याला धरून नसेल. रोमचा प्रश्न हा होता: जो प्रत्यक्षात नीतिमान नाही, अशा मनुष्याला न्यायी आणि पवित्र देव नीतिमान कसा गणू शकतो? जो स्वतःच्या ठायी नीतिमान नाही, त्याला तो नीतिमान कसा घोषित करू शकतो? रोमच्या दृष्टीने, यामुळे देवाच्या सचोटीवर सावली पडत होती, आणि त्याच्या स्वतःच्या नीतिमत्वाशी तडजोड होत असल्याचे सूचित होत होते.

धर्मसुधारकांनी याला उत्तर देताना असे म्हटले की ही क्रिया एक 'कायदेशीर क्रिया' किंवा न्यायवैधानिक क्रिया आहे, हे खरे, पण तिच्यामध्ये काल्पनिक असे काहीही नाही. प्रथम, विश्वासाने आपल्याकरिता गणण्यात येणारे नीतिमत्व हे 'वास्तविक नीतिमत्व' आहे. ते ख्रिस्ताचे नीतिमत्व आहे, आणि त्याच्या नीतिमत्वात काल्पनिक असे काहीच नाही. दुसरे म्हणजे, देव जेव्हा एका व्यक्तीच्या खात्यातून दुसऱ्याच्या खात्यात काही हस्तांतरित करतो, तेव्हा ते खरे हस्तांतरण असते. ज्यांच्याकडे वास्तविक विश्वास आहे अशा लोकांवर वास्तविक नीतिमत्त्वाची ती 'वास्तविक गणनाच असते. मी असेही म्हणेन की, जर आपण मुळातच गणनेच्या या सत्याला विरोध करणार असू, तर आपल्याला केवळ ख्रिस्ताचे नीतिमत्व आपल्या खात्यावर हस्तांतरित होणेच नाकारावे लागणार नाही, तर वधस्तंभाचाही नकार करावा लागेल; कारण वधस्तंभावर ख्रिस्त स्पष्टपणे आमचा प्रतिनिधिक अर्पण म्हणून आमच्या जागी मरत आहे. देव आमच्यावर येणारा त्याचा क्रोध त्याच्यावर ओतत आहे कारण, 'गणले जाणे' या क्रियेद्वारे देवाने आपला दोष ख्रिस्ताकडे हस्तांतरित केला आहे.

केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे हे सुवार्तेसाठी अनिवार्य तत्त्व आहे. *सोला फिडे* शिवाय सुवार्ता नाहीच. आणि 'गणले जाणे' ही संकल्पना केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांतासाठी सर्वथा अनिवार्य आहे. म्हणून, जर 'नीतिमान गणले जाणे' नसेल, तर *सोला फिडे* नाही; आणि जर *सोला फिडे* नाही, तर सुवार्ताही नाही. गणले जाण्याच्या या सिद्धांताशिवाय सुवार्ता टिकून राहत नाही, कारण सुवार्ता ही येशूचे नीतिमत्त्व आमच्या खात्यात गणले जाण्याच्या या पायावरच उभी आहे, अन्यथा सुवार्ता नाहीच.

आपल्या दैनंदिन जीवनासाठी आणि व्यावहारिक जगण्यासाठी या सिद्धांतांचे महत्त्व नेमके काय, असा प्रश्न आपल्याला अनेकदा पडतो. परंतु पवित्र आणि न्यायी देवाबरोबर आपण तारणदायी नात्यात कशा रीतीने उभे राहू शकतो, हे जाणून घेण्यापेक्षा आपल्या जीवनाशी अधिक निकटतेने संबंधित दुसरी कोणतीही गोष्ट नाही. जर आमची मुक्ती कोणत्याही प्रमाणात आमच्या स्वतःच्या नीतिमत्वावर अवलंबून असती, तर आम्हाला तारणाची कोणतीही आशा उरली नसती, कारण देव आपल्या सृष्टीकडून जो निकष मागतो, तो पूर्ण करू शकेल असे एकमेव नीतिमत्व म्हणजे ख्रिस्ताने संपादन केलेले नीतिमत्व होय. सुवार्तेमध्ये आपण जे सत्य ऐकतो, ते हेच, आणि आपण ज्याला धरून राहतो, तेही सत्य हेच आहे.

## प्रकरण ८

# ख्रिस्ताचे नीतिमत्त्व

कलम १२ ने आपल्याला हे दाखवून दिले की आमचे नीतिमान ठरविले जाण्याचा आधार ख्रिस्ताचे नीतिमत्व आमचे नीतिमत्व म्हणून गणले जाणे, हा आहे, आणि ते आपल्या ठायी अंतर्भूत असलेल्या कोणत्याही नीतिमत्वात सापडत नाही. वरवर पाहता असे वाटू शकते की कलम १३ हा केवळ कलम १२ मधील पुष्टीची पुनरुक्ती करीत आहे. परंतु नीतिमान गणले जाण्याचा प्रश्न आणि आम्हाला नीतिमान ठरविले जाण्यातील ख्रिस्ताची भूमिका हे सुवार्तेच्या आपल्या आकलनासाठी इतके मध्यवर्ती आहेत की, आपण पाहत आलेल्या या घोषणापत्राच्या निर्मात्यांना कलम १३ मध्ये आणखी अधिक स्पष्टपणे बोलणे आवश्यक वाटले. पुष्टीकरण १३ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, ख्रिस्ताच्या ज्या नीतिमत्वाद्वारे आम्ही नीतिमान ठरविले जातो, ते नीतिमत्व खऱ्या अर्थाने त्याचे स्वतःचे

आहे, आणि ते त्याने आमच्याशिवाय, त्याच्या स्वतःच्या परिपूर्ण आज्ञांकितपणा आणि त्याद्वारेच, साध्य केले. हे नीतिमत्व आमच्या नीतिमान ठरविले जाण्याचा एकमेव आधार म्हणून देवाच्या न्यायवैधानिक, म्हणजे कायदेशीर, घोषणेद्वारे आमच्या नावावर गणले जाते.

त्यास अनुसरून नकार असा आहे:

आमच्या अस्तित्वाच्या कोणत्याही टप्प्यावर आम्ही केलेली कोणतीही कर्मे ख्रिस्ताच्या योग्यतेमध्ये *(Merit)* भर घालतात किंवा आमच्यासाठी अशी कोणतीही योग्यता मिळवतात जी आमच्या नीतिमान ठरण्याच्या आधारात कोणत्याही प्रकारे हातभार लावते, हे आम्ही नाकारतो (गलती. २:१६; इफिस. २:८-९; तीताला पत्र ३:५).

जेव्हा आपण *ख्रिस्ताच्या नीतिमत्वाविषयी* बोलतो, तेव्हा आपण त्या नीतिमत्वाचा विचार करीत असतो, जे ख्रिस्ताने त्याच्या स्वतःच्या परिपूर्ण आज्ञांकितपणा आणि त्याद्वारेच साध्य केले. ऐतिहासिकदृष्ट्या, ईश्वर-शास्त्रज्ञांनी ख्रिस्ताच्या आज्ञांकितपणाचे दोन स्वरूप मांडले आहेत. एकाला दुःख सहनाद्वारे ख्रिस्ताची 'निष्क्रिय आज्ञाधारकता' *(Passive obedience)* असे म्हणतात, आणि दुसऱ्याला त्याची 'आज्ञापालनाद्वारे आज्ञाधारकता' *(Active obedience)* म्हणतात. हे शब्द या घोषणापत्रात स्पष्टपणे आलेले नसले, तरी या प्रतिपादनामध्ये ते अप्रत्यक्षपणे उपस्थित आहेत, आणि त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी तयार करतात.

ख्रिस्ताची 'दुःख सहनाद्वारे आज्ञाधारकता' म्हणजे त्याने आपल्या जीवनप्रवासभर देवाचे नियम शास्त्र ज्या दंडांची मागणी करीत होते, ती सोसली; आणि त्या सोशीकतेचा परमोच्च बिंदू त्याच्या वधस्तंभावरील

मृत्यूमध्ये प्रकट झाला. आपल्या वतीने देवाचा न्याय स्वतःवर घेण्याच्या देवाच्या पाचारणाला त्याने स्वतःला अधीन केले. ख्रिस्ताची सक्रिय आज्ञाधारकता म्हणजे त्याने आपल्या संपूर्ण आयुष्यात देवाचे नियमशास्त्र पाळले आणि त्याच्या सर्व मागण्या सिद्धपणे पूर्ण केल्या. देवाचे नियमशास्त्र ज्या प्रत्येक बाबतीत आणि ज्या प्रत्येक अंशाने आज्ञाधारकतेची मागणी करीत होते, त्या सर्व बाबतीत त्याने परिपूर्ण आज्ञाधारकता प्रदर्शित केली.

ज्या नीतिमत्वाद्वारे आपण नीतिमान ठरविले जातो, त्याविषयी बोलताना लूथर यांनी दोन अत्यंत उपयुक्त संज्ञा वापरल्या. पहिली म्हणजे *‘जस्टिटिया एलिनियम’ (Justitia alienum)*, ज्याचा अर्थ ‘परके’ किंवा ‘बाहेरचे’ नीतिमत्व असा होतो. *‘जस्टिटिया एलिनियम’* हे अशा नीतिमत्वाचा संदर्भ देते जी दुसऱ्याने साध्य केली आहे. ती दुसऱ्या कोणाचे तरी नीतिमत्व आहे, आपले स्वतःचे नव्हे. ज्या नीतिमत्वाद्वारे आपण नीतिमान ठरविले गेलो आहोत, ते ख्रिस्ताचे नीतिमत्व आहे, आणि ते खऱ्या अर्थाने त्याचे स्वतःचे आहे. ते आपले स्वतःचे नाही. ते आम्हाला तेव्हाच प्राप्त होते जेव्हा ते आमच्या खात्यात गणले जाते.

लूथर यांनी वापरलेली दुसरी संज्ञा *एक्स्ट्रा नोस् (extra nos),* ही होती, ज्याचा अर्थ “आमच्या बाहेर” किंवा “आमच्यापासून पृथक्” असा होतो. पुन्हा एकदा सांगायचे तर, आमच्या नीतिमान ठरविले जाण्याचा आधारभूत असलेले नीतिमत्व हे आमच्या ठायी सापडणारे नीतिमत्व नाही; तर ते ख्रिस्ताने आमच्याकरिता संपादन केलेले नीतिमत्व आहे. हे नीतिमत्व आमच्या नीतिमान ठरविले जाण्याचा एकमेव आधार म्हणून देवाच्या कायदेशीर घोषणेद्वारे आमचे नीतिमत्व म्हणून गणले जाते.

कलम १३ हे नाकारते की, आमच्या अस्तित्वाच्या कोणत्याही टप्प्यावर आम्ही केलेली कोणतीही कर्मे ख्रिस्ताच्या योग्यतेत भर घालू शकतात, किंवा आमच्या नीतिमान ठरविले जाण्याच्या आधाराला कोणत्याही प्रकारे हातभार

लावणारी काही योग्यता आमच्याकरिता संपादन करू शकतात. या कथनाची पृष्ठभूमी रोमन कॅथोलिक योग्यतेची संकल्पना आहे. ही योग्यता रोमच्या प्रायश्चित्त या विधिसंस्काराच्या आचरणात प्रतिबिंबित होते; आणि जसे आपण पाहिले आहे, प्राणघातक पाप केलेल्यांना पुन्हा नीतिमान ठरविले जाण्याच्या स्थितीत परत आणण्यासाठी तो विधिसंस्कार आवश्यक मानला जातो. कबुलीजबाब, मनस्तापाची कृती, याजकाकडून क्षमेची घोषणा, आणि समाधानकारक कर्मे करणे, अशा विविध घटकांतून गेल्यानंतरच ते पुन्हा नीतिमान ठरविले जाण्याच्या स्थितीत पुनर्स्थापित होतात. परंतु आम्हाला नीतिमान ठरविले जाण्यासाठी महत्त्वाची ठरणारी योग्यता केवळ ख्रिस्ताचीच आहे; आणि ती योग्यता परिपूर्ण असल्यामुळे तिच्यात भर घालणे किंवा तिला कमी करणे अशक्य आहे. परिपूर्णतेत भर घालता येत नाही. येशूने आपल्या परिपूर्ण आज्ञाधारकतेत जे आधीच संपादन करून ठेवले आहे, त्याशिवाय देवाच्या नीतिमत्वाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आपण स्वतःकडून कोणताही योग्यतेचा हातभार लावू शकत नाही.

आता आपण अशा एका मुद्द्याकडे येतो, जो किचकट तर आहेच, पण सहज गोंधळ निर्माण करणारा देखील आहे. आपले घोषणापत्र *नीतिमान ठरविले जाणे* आणि *पवित्रीकरण* यांमध्ये स्पष्ट भेद करतो. पुष्टीकरण १४ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, जरी सर्व विश्वास ठेवणाऱ्यांमध्ये पवित्र आत्मा वस्ती करीत असतो, आणि ते पवित्र केले जाण्याच्या तसेच ख्रिस्ताच्या प्रतिरूपाशी अनुरूप बनविले जाण्याच्या प्रक्रियेत असतात, तरी नीतिमान ठरविले जाण्याचे हे परिणाम त्याचा आधार नाहीत. आपण अजूनही पापी असतानाच, देव केवळ त्याच्या कृपेने, आणि केवळ विश्वासाद्वारे, केवळ ख्रिस्तामुळे,

आम्हाला नीतिमान घोषित करतो, आमची पापे क्षमा करतो, आणि आम्हाला त्याची मुले म्हणून दत्तक घेतो (रोम. ४:५).

त्यास अनुसरून नकार असा आहे:

देवाने विश्वासणाऱ्यांना ख्रिस्तामध्ये नीतिमान घोषित करण्या-पूर्वी, त्यांनी देवाच्या जीवन परिवर्तन करणाऱ्या कृपेला दिलेल्या सहकार्यामुळे त्यांच्या अंगी स्वतःचे नीतिमत्व असणे आवश्यक आहे, हे आम्ही नाकारतो. आपण पापी असतानाच नीतिमान ठरविले जातो.

आपण पापी असतानाच देवाच्या दृष्टीने नीतिमान घोषित केले जातो. किंवा, लूथर यांनी म्हटल्याप्रमाणे, आपण *सिमुल यूस्टुस एत पेक्कातोर* आहोत, म्हणजे *एकाच वेळी नीतिमान आणि पापी.* त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, जेव्हा एखादी व्यक्ती ख्रिस्तावर विश्वास ठेवते, तेव्हा देव ख्रिस्ताचे नीतिमत्व त्या व्यक्तीच्या खात्यात गणले गेल्यामुळे तिला नीतिमान घोषित करतो. परंतु आमचे नीतिमान ठरविले जाणे तत्क्षणी आमच्या पापमय स्वभावाचा नाश करीत नाही; आपण नीतिमान ठरविले जातो, तरीही पाप करीत राहतो. तथापि, जो कोणी नीतिमान ठरविला जातो, त्याच्यामध्ये देव पवित्र आत्म्याद्वारे वस्ती करतो; आणि नीतिमान ठरविले जाण्याच्या क्षणापासून आत्मा विश्वास ठेवणाऱ्याच्या आत्म्यात आणि जीवनात पवित्रीकरणाचे कार्य प्रारंभ करतो. म्हणून, देवाने आम्हाला नीतिमान घोषित करण्यासाठी आपण स्वतः नीतिमान होईपर्यंत थांबावे लागत नाही; तरीही, *तरीही आपण नीतिमान होत असतो.* ख्रिस्ताच्या प्रतिरूपाशी अनुरूप बनण्याची आणि ख्रिस्ताच्या पूर्णतेत वाढत जाण्याची ही प्रक्रिया तेव्हा सुरू होते जेव्हा आपण आत्म्याने नवा जन्म पावतो आणि नीतिमान ठरविले गेलेले असतो.

हे ओळखणे महत्त्वाचे आहे की ख्रिस्ती लोकांनी सत्कर्मांविषयी काळजी करू नये, असे आपले घोषणापत्र अजिबात नाकारत नाही. प्रेषित याकोब असे लिहितो: "माझ्या बंधूंनो, माझ्या ठायी विश्वास आहे, असे कोणी म्हणत असून तो क्रिया करत नाही तर त्यापासून काय लाभ? तो विश्वास त्याला तारण्यास समर्थ आहे काय?" (याकोबाचे पत्र २:१४). मुद्दा हा आहे की आपली चांगली कर्मे आपल्या नीतिमान ठरविले जाण्यातून उगम पावतात, ती आपल्या नीतिमान ठरविले जाण्याचे कारण किंवा आधार नाहीत. आपल्या नीतिमान ठरविले जाण्यात हातभार लावणारी एकमेव चांगली कर्मे म्हणजे येशूची चांगली कर्मे. आपली चांगली कर्मे नीतिमान ठरविले गेल्यानंतर, त्या नीतिमान ठरविले जाण्याचा परिणाम म्हणून प्रकट होतात. पुन्हा एकदा, घोषणापत्र असे पुष्टी करते की सर्व विश्वास ठेवणाऱ्यांमध्ये पवित्र आत्मा वस्ती करतो आणि ते ख्रिस्ताच्या प्रतिरूपाशी अनुरूप होत जाण्याच्या प्रक्रियेत आहेत. आपण ख्रिस्तासारखे होत जाण्यात वाढले पाहिजे.

महत्त्वाची गोष्ट अशी की, कलम १४ नाकारते की, "देवाने विश्वासणाऱ्यांना ख्रिस्तामध्ये नीतिमान घोषित करण्यापूर्वी, त्यांनी देवाच्या जीवन-परिवर्तन करणाऱ्या कृपेला दिलेल्या सहकार्यामुळे त्यांच्या अंगी स्वतःचे नीतिमत्व असणे आवश्यक आहे." येथील महत्त्वाचा शब्द म्हणजे "पूर्वी." रोम आणि इव्हॅन्जेलिकल हे दोन्हीही एकमत होतात की नीतिमान ठरविले जाण्यामध्ये कायदेशीर घोषणा अंतर्भूत असते. जेव्हा देव एखादी व्यक्ती त्याच्या दृष्टीने नीतिमान आहे, असा कायदेशीर निर्णय जाहीर करतो, तेव्हा नीतिमान ठरविले जाणे घडून येते. या बाबतीत दोन्ही बाजूंचे एकमत आहे. वाद हा आहे की देव अशी घोषणा *कधी* आणि *कशाच्या आधारावर* करतो. धर्मसुधारकांनी आग्रह धरला की, आमच्यात स्वतःचे नीतिमत्व येण्यापूर्वीच देव ती घोषणा करतो. ज्या क्षणी आपण विश्वास ठेवतो, अगदी आपण

पापी असतानाच, तो ती घोषणा करतो. हे शुभवर्तमानाचे उत्तम अंग आहे. आपण येशूचा स्वीकार करतो त्या क्षणी आपल्या पापांची क्षमा होऊ शकते, आपल्याला देवाच्या कुटुंबात दत्तक घेतले जाऊ शकते आणि आपल्या निर्माणकर्त्याद्वारे आपल्याला नीतिमान घोषित केले जाऊ शकते, कारण त्या क्षणी तो जो काही आहे आणि त्याने जे काही साध्य केले आहे ते सर्व आपले होते.

नवा करार आपल्याला सांगतो "भीत व कापत आपले तारण साधून घ्या;" (फिलिप्पै. २:१२). काही वेळा ही भाषा वाचताना आपण गोंधळून जातो, कारण नीतिमान ठरविले जाणे आणि तारण हे शब्द अनेकदा एकमेकांच्या जागी वापरले जातात. एका अर्थाने हे खरे आहे की आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवतो त्या क्षणी आपण तारणात प्रवेश करतो. परंतु जोवर आपण स्वर्गातील गौरवात प्रवेश करीत नाही, तोवर आपले अंतिम आणि परिपूर्ण तारण घडून येत नाही. म्हणून तारणाच्या प्रक्रियेतील एक भाग पवित्रीकरण आहे. परंतु नीतिमान ठरविले जाणे प्रथम येते. आपण आपले नीतिमान ठरविले जाणे साध्य करण्यासाठी कार्य करीत नाही. उलट, आपल्या पवित्रीकरणात त्या नीतिमान ठरविले जाण्याची फळे प्रकट व्हावीत, यासाठी आपण काम करीत आहोत.

## प्रकरण ९

# जीवन बदलणारी सुवार्ता

ज्या क्षणी आपण खऱ्या विश्वासाने ख्रिस्ताला कवटाळतो, त्याच क्षणी देव ख्रिस्ताधर्म चे नीतिमत्व आमच्या खात्यात गणून आम्हाला नीतिमान घोषित करतो. मात्र, नीतिमान ठरविले गेल्यावरही आपण पाप करतच राहतो. ज्या आयुष्यभर चालणाऱ्या प्रक्रियेद्वारे आपल्याला पवित्र केले जाते आणि ख्रिस्ताच्या प्रतिरूपाशी सुसंगत असे घडविले जाते, आणि जिची सुरुवात आपल्या नीतिमान ठरविले जाण्याच्या क्षणापासूनच होते, तिला *'पवित्रीकरण' (Sanctification)* असे म्हणतात. कलम १५ नीतिमान ठरविले जाणे आणि पवित्रीकरण यांत विद्यमान संबंधावर प्रकाश टाकते. पुष्टीकरण १५ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, तारणदायी विश्वासाचा परिणाम पवित्रीकरणात होतो, आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे अंशा

> अंशाने ख्रिस्ताच्या प्रतिरूपाशी सुसंगत होण्याद्वारे जीवनात जे परिवर्तन घडत जाते, त्यालाच पवित्रीकरण म्हणतात. पवित्रीकरण म्हणजे निरंतर पश्चात्ताप करणे, पापापासून वळणे, आणि येशू ख्रिस्ताला आपला प्रभू व स्वामी मानून, कृतज्ञ अशा भरवशाने त्याच्यावर अवलंबून राहत त्याची सेवा करीत जगणे होय (गलती. ५:२२-२५; रोम. ८:४, १३-१४).
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> आम्ही असा कोणताही दृष्टिकोन नाकारतो, जो नीतिमान ठरविले जाण्याला ख्रिस्ताशी असलेल्या आमच्या पवित्रीकरण करणाऱ्या ऐक्यापासून, व तसेच प्रार्थना, पश्चात्ताप, वधस्तंभ उचलणे व आत्म्यातील जीवनाद्वारे त्याच्या प्रतिरूपाशी अंशा अंशाने वाढत जाणाऱ्या आमच्या सुसंगततेपासून वेगळे करतो.

प्रकरण ८ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, मार्टिन लूथर यांनी असे म्हटले होते की नीतिमान ठरलेला पापी हा एकाच वेळी *'नीतिमान आणि पापी' (Simul justus et peccator)* असे दोन्ही असतो. ख्रिस्ताचे नीतिमत्व त्याच्या खात्यावर गणले गेल्यामुळे तो आता नीतिमान आहे; परंतु स्वतःच्या ठायी तो पापीच राहतो. आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवतो त्या क्षणी आपण तत्क्षणी पापापासून पूर्णपणे मुक्त होत नाही. लूथर यांनी असे म्हटले की, देव एखाद्या व्यक्तीला नीतिमान घोषित करतो, तेव्हा ते जणू काही तो रुग्णाला बरे करणारे औषध देत आहे, याप्रमाणे असते. परंतु ते बरे होणे कालक्रमाने घडत जाते. म्हणजेच, आपल्या पाप करण्याच्या वृत्तीवरील उपाय आपल्या पवित्रीकरणात आढळतो, आणि पवित्रीकरण ही अशी एक आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे की जी आपण मरेपर्यंत, आणि बायबल ज्याला *गौरवीकरण* म्हणते त्या स्थितीत प्रवेश करेपर्यंत, पूर्ण होत नाही.

गौरवीकरण हा पवित्रीकरणाच्या प्रदीर्घ प्रक्रियेचा शेवट आहे.

आपण पाहत असलेले हे घोषणापत्र पवित्रीकरणाकडे नीतिमान ठरविले जाण्याचा आवश्यक परिणाम, किंवा फळ, म्हणून पाहते. हा केवळ एक संभाव्य परिणाम नसून निश्चित परिणाम आहे. आणि हे महत्त्वाचे आहे, काहींचा असा विश्वास आहे की एखादी व्यक्ती नीतिमान ठरवली जाऊ शकते, पण तिच्यात पवित्रीकरणाची प्रक्रिया कधीच सुरू होत नाही. त्यांच्या दृष्टीने, अशी माणसे आयुष्यभर ज्याला 'दैहिक ख्रिस्ती' *(Carnal Christian)* म्हणतात तशीच राहू शकतात. माझ्या मते हा विश्वास त्या समस्येतून निर्माण होतो, जी आपण अनेकदा पाहतो: लोक एखाद्या सुवार्ताप्रसाराच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून ख्रिस्तावरील विश्वासाची कबुली देतात; परंतु त्यांच्या जीवनात त्यानंतर कोणताही बाह्य, दृश्यमान बदल दिसून येत नाही. काहींना आशावादी राहायचे असते आणि त्या विश्वासकबुलीवर भरोसा ठेवायचा असतो, म्हणून त्यांना वाटते की ती माणसे खरोखर ख्रिस्ती आहेत, पण त्यांच्या पवित्रीकरणाला अजून प्रारंभ झालेला नाही. परंतु ऐतिहासिक, बायबल-सम्मत ख्रिस्ती धर्म पुन्हा एकदा असेच सांगतो की, एखादी व्यक्ती नीतिमान ठरवली गेली की तिचे पवित्रीकरण सुरू होतेच.

खचितच, जो नीतिमान ठरविला गेला आहे, त्याने एक अत्यंत महत्त्वपूर्ण बदल अनुभवलेला आहे. हा बदल म्हणजे देवाच्या शापाखाली असलेल्या मनुष्यापासून देवाच्या दृष्टीने नीतिमान असलेल्या मनुष्यापर्यंतचा बदल. खऱ्या विश्वासावाचून कोणताही मनुष्य नीतिमान ठरविला जाऊ शकत नाही. परंतु नवा जन्म आणि विश्वास यांचा परस्परसंबंध नेमका कोणत्या क्रमाने येतो, याविषयी ख्रिस्ती लोकांमध्ये मतभेद आहेत. नवा जन्म म्हणजे पवित्र आत्म्याचे ते कार्य, ज्याद्वारे एखादा मनुष्य आध्यात्मिक मृत्यूच्या अवस्थेतून जिवंत केला जातो आणि आध्यात्मिक जीवनाच्या अवस्थेत रूपांतरित होतो. काहींचा असा विश्वास आहे की व्यक्तीला प्रथम विश्वास प्राप्त होतो; आणि

मग त्या विश्वासाचा तात्काळ परिणाम म्हणून ती केवळ नीतिमानच ठरत नाही, तर नव्या जन्मातही प्रवेश करते. याचा अर्थ असा की नीतिमान ठरविले जाण्याशी संबंधित दोन महत्त्वपूर्ण बदल घडतात: ज्या क्षणी व्यक्ती विश्वास ठेवते, त्या क्षणी ती अविश्वासू राहत नाही, तर विश्वासू बनते, आणि ती आत्मिक मरणावस्थेत न  राहता, तिचा नव्याने जन्म होतो.

धर्मसुधारित विश्वास या दोन घटकांचा, म्हणजे विश्वास आणि नवा जन्म, यांचा क्रम योग्य स्वरूपात मांडतो. आम्ही असे म्हणतो की नवा जन्म हा विश्वासापूर्वी येतो. *'पूर्वी'* असे म्हणताना आपला अर्थ कालक्रमानुसार नसतो; म्हणजे असा नव्हे की एखादा मनुष्य नव्या जन्मात आला आणि पंधरा वर्षांनी त्याला विश्वास प्राप्त झाला, किंवा एखादा नव्या जन्मात आला आणि पाच मिनिटांनी त्याला विश्वास प्राप्त झाला. आपण येथे एकाच वेळी घडणाऱ्या क्रियांचा विचार करीत आहोत. परंतु तार्किक क्रमाने पाहिले, तर आपण असे म्हणतो की नवा जन्म हा विश्वासाच्या आधी येतो, या अर्थाने की विश्वासाच्या अस्तित्वासाठी नवा जन्म ही एक अनिवार्य अट, एक पूर्वावश्यक गोष्ट, आहे. धर्मसुधारित ईश्वरशास्त्र असे शिकवते की एखाद्या व्यक्तीच्या जीवनात खरा विश्वास प्रकट होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे हा की देवाने प्रथम पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे त्याच्या आत्म्यात कृपेचे कार्य केले पाहिजे, आणि त्या कार्याद्वारे तो आध्यात्मिक मृत्यूतून आध्यात्मिक जीवनाकडे चेतविला जातो, आणि म्हणून त्याचा नव्याने जन्म  होतो. येशूने निकोदेमाला म्हटल्याप्रमाणे, "नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही" (योहान. ३:३).

ज्या व्यक्तीच्या ठायी खरा विश्वास असतो, ती व्यक्ती नव्याने जन्म पावलेली देखील असते. आणि म्हणूनच पवित्रीकरण हे नीतिमान ठरविले जाण्यापासून अनिवार्यपणे पुढे येते. कारण जर विश्वास उपस्थित असेल आणि त्या व्यक्तीचा नवा जन्म झाला असेल, तर याचा अर्थ असा की

पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे तिच्या अंतर्यामध्ये बदल झाला आहे, आणि पवित्रीकरणाची प्रक्रिया, म्हणजे ख्रिस्ताच्या प्रतिरूपाशी अंशा अंशाने सुसंगत होत जाण्याची प्रक्रिया, खचितच सुरू झालेली आहे.

पवित्रीकरणामध्ये निरंतर पश्चात्तापाचा समावेश असतो. काही ख्रिस्ती लोक असे समजतात की ख्रिस्ती जीवनाच्या प्रारंभीच ख्रिस्ती मनुष्याला पश्चात्तापासाठी पाचारण केले जाते. सुवार्तेला आपण जो आरंभीचा प्रतिसाद देतो, म्हणजे जेव्हा आपण देवासमोर आपल्या पापांची कबुली देतो आणि अंतःकरण व मन यांचे परिवर्तन अनुभवतो, त्यालाच आपण पश्चात्ताप म्हणतो. परंतु येथे आपले घोषणापत्र हे मान्य करते की पश्चात्ताप ही आयुष्यभर चालणारी क्रिया आहे. ख्रिस्ती जीवन हे पश्चात्तापी वृत्तीचे जीवन आहे, कारण जोपर्यंत आपल्या जीवनात पाप कायम राहते, तोपर्यंत त्या पापाची कबुली देण्याची आणि त्यापासून वळण्याची गरजही कायम राहते. म्हणून वधस्तंभाच्या पायथ्याशी आपण जो सुरुवातीचा पश्चात्ताप करतो, तो ‘एकदाच आणि कायमचा’ पश्चात्ताप नसतो. आपल्याला पश्चात्तापाचे जीवन जगण्यासाठी, दररोज त्याच्याकडे आपल्या पापांची कबुली देण्यासाठी आणि जसे आपण पवित्रीकरणात वाढतो, तसे अधिकाधिक पापमय सवयींपासून आणि कर्मांपासून वळण्यासाठी पाचारण केले गेले आहे. लक्षात घ्या, आपले जीवन हे पापापासून वळून, येशू ख्रिस्ताला आपला प्रभू आणि स्वामी मानून, कृतज्ञ भरवशाने त्याच्यावर अवलंबून राहत त्याची सेवा करण्याचे जीवन आहे.

एकदा का आपले तारण झाले आणि आपण ख्रिस्ताशी तारणदायी नात्यात बंदिस्त झालो, म्हणजे नीतिमत्वाचा आपला शोध संपतो, असे नाही. उलट, तो तेव्हाच खऱ्या अर्थाने सुरू होतो. अनेकदा आपल्याला असे वाटते की देवाचा आपला शोध तो आपल्याला सापडला की संपून जातो, परंतु प्रत्यक्षात शास्त्र आपल्याला सांगते की कोणताही माणूस त्याच्या नैसर्गिक

स्थितीत देवाचा शोध घेत नाही. जोपर्यंत देवाने आपल्याला शोधलेले नसते, तोपर्यंत आपण खरोखर देवाचा शोध घेण्यास सुरुवात करत नाही. देवाचा आणि त्याच्या राज्याचा आमचा शोध हा आजीवन उपक्रम आहे आणि त्याची सुरुवात आमच्या नीतिमान ठरण्यापासून होते. आपण अजून रस्त्याच्या शेवटपर्यंत पोहोचलेलो नाही. आपण अजून आपले ध्येय गाठलेले नाही. देवाने आपल्याला नीतिमान घोषित केले आहे, या स्थैर्यदायी स्थितीत आपण आहोत खरे, मात्र त्याच्या प्रतिरूपाशी अनुरूप होत जाण्याच्या प्रक्रियेत आपण अजूनही आहोत. आणि ही अनुरूपता निरंतर प्रार्थना, पश्चात्ताप, वधस्तंभ उचलणे, आणि पवित्र आत्म्याच्या उपस्थिती व सामर्थ्य यांच्या प्रकाशात संपूर्ण जीवन जगणे, यांद्वारे घडत जाते.

## प्रकरण १०

# तारणदायी विश्वास

“द गॉस्पेल ऑफ जीझस क्राइस्ट: ॲन इव्हॅन्जेलिकल सेलिब्रेशन” या घोषणापत्रातील कलम १६ तारणदायी विश्वासाच्या तीन घटकांवर प्रकाश टाकते. पुष्टीकरण १६ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, तारणदायी विश्वासात सुवार्तेच्या मजकुराची बौद्धिक संमती *(Mental assent)*, स्वतःचे पाप आणि गरज यांची कबुली, आणि ख्रिस्त व त्याच्या कार्यावर वैयक्तिक भरवसा व त्याच्यावर अवलंबून राहणे, यांचा समावेश आहे.
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> तारणदायी विश्वासात केवळ सुवार्तेचा बौद्धिक स्वीकार समाविष्ट

असतो आणि केवळ विश्वासाच्या बाह्य कबुलीने *(Profession)* नीतिमान ठरणे साध्य होते, हे आम्ही नाकारतो. आम्ही पुढे हे देखील नाकारतो की, तारणदायी विश्वासाचा कोणताही घटक हे एखादे पुण्यकर्म *(Meritorious work)* आहे किंवा ते आमच्यासाठी तारण मिळवून देते.

कलम १६ ज्या पहिल्या गोष्टीची पुष्टी करते ती म्हणजे सुवार्तेच्या मजकुराला मिळालेली 'बौद्धिक संमती'. लूथर यांनी नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताचे सार संक्षिप्तपणे मांडले, तेव्हा "केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे" याचा नेमका अर्थ काय, याविषयी बराच गोंधळ निर्माण झाला. केवळ "मी सुवार्तेच्या सत्याची पुष्टी करतो" असे म्हणणे, तुम्हाला स्वर्गात नेण्यास पुरेसे आहे काय? अशा गोंधळामुळेच सोळाव्या शतकातील धर्मसुधारकांना खऱ्या तारणदायी विश्वासाच्या घटकांकडे अत्यंत बारकाईने पाहणे आवश्यक वाटले.

धर्मसुधारकांनी ठरवले की तारणदायी विश्वासात तीन घटक असतात: नोटिशिया *(Notitia)*, असेन्सस *(Assensus)*, आणि फिडुशिया *(Fiducia)*.

**१. नोटिशिया** *(Notitia)*: याचा अर्थ सुवार्तेची माहिती, किंवा तिचा आशय. केवळ कसल्याही गोष्टीवर विश्वास ठेवल्याने लोक तारण पावतात, असे आपण मानत नाही. नवा करार जेव्हा विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाण्याविषयी बोलतो, तेव्हा त्याचा अर्थ विशिष्ट सत्यांवरील विश्वास, आणि विशेषतः एका विशिष्ट व्यक्तीवरील विश्वास, असा असतो. आपल्याला ख्रिस्तावर विश्वास ठेवावा लागतो. जेव्हा सुवार्ता घोषित केली जाते, तेव्हा येशू कोण आहे आणि त्याने काय केले, याविषयी विशिष्ट माहिती त्यात असते: तो वधस्तंभावर मरण पावला, तो मेलेल्यांतून उठला, आणि बरेच काही. हे सर्व तारण-

दायी विश्वासाच्या *नोटिशियाचा* भाग आहे.

**२. असेन्सस** *(Assensus)*: ही बौद्धिक किंवा मानसिक संमती आहे. जर मी विचारले, "येशू मेलेल्यांतून उठला, यावर तुमचा विश्वास आहे काय?" तर माझा प्रश्न असा असतो की सुवार्तेच्या आशयाची, म्हणजे *नोटिशियाची,* सत्यता तुम्ही आपल्या बुद्धीने मान्य करता काय? सुवार्ता काय शिकवते, हे केवळ जाणून घेणे पुरेसे नाही; तारणदायी विश्वासासाठी त्या शिकवणी सत्य आहेत, यावरही आपल्याला विश्वास ठेवावा लागतो. म्हणजेच, जो येशू मरण पावला, कबरेत पुरला गेला, तो खरोखरच आणि इतिहासात प्रत्यक्षपणे मेलेल्यांतून उठला, आणि इतरही जे काही त्याच्याविषयी सांगितले जाते, ते सत्य आहे, यावर आपल्याला विश्वास ठेवावा लागतो. जर कोणी मनुष्य येशू हा तारणारा आहे, यावर विश्वास ठेवत नसेल, किंवा त्या सत्याची त्याला खातरीच पटली नसेल, किंवा येशू अजूनही मृत आहे, असेच तो मानत असेल, किंवा त्याचे वधस्तंभावरील मरण हे प्रायश्चित्त होते, यावर त्याचा विश्वास नसेल, तर त्या व्यक्तीकडे बायबल आणि धर्मसुधारक ज्याला तारणदायी विश्वास म्हणतात, तो नाही. तारण पावण्यासाठी एखाद्याने येशूविषयी आणि त्याच्या कार्याविषयी जी जी वक्तव्ये केली जातात, ती सर्व सत्य आहेत, याला आपल्या बुद्धीने प्रत्यक्ष सहमत व्हावे लागते.

**३. फिडुशिया** *(Fiducia)*: तारणदायी विश्वासामध्ये एका तिसऱ्या घटकाचाही समावेश होतो. याकोबाने उपरोधाने असे लिहिले: "एकच देव आहे, असा विश्वास तू धरतोस काय? ते बरे करतोस; भुतेही तसाच विश्वास धरतात व थरथर कापतात" (याकोबाचे पत्र २:१९). याकोब असे म्हणत आहे की देव आहे, या प्रतिपादनाला मान्यता देणे पुरेसे नाही. सैतानालाही देव आहे, हे ठाऊक आहे. त्याचप्रमाणे, जर तुमची केवळ अशी बौद्धिक खात्री असेल की येशू जो दावा करत

होता तोच तो होता, आणि त्याने वधस्तंभावर प्रायश्चित्तकारक मरण पत्करले, व तो कबरेतून पुन्हा उठला, तर ते तुम्हाला केवळ 'दुष्ट आत्म्याच्या' श्रेणीत बसवते, कारण दुरात्म्यांनाही ते सत्य माहीत होते. बौद्धिक संमतीशिवाय तुम्ही नीतिमान ठरू शकत नसलात तरी, केवळ तिची उपस्थिती नीतिमान ठरण्याची खात्री देत नाही. आपल्याला *'फिडुशिया'* किंवा वैयक्तिक भरवसा आणि विसंबून राहण्याची गरज आहे. पवित्र शास्त्र जेव्हा ख्रिस्ताचा स्वीकार करणे, किंवा विश्वासाने ख्रिस्ताला कवटाळणे, किंवा ख्रिस्ताकडे येणे, यांविषयी बोलते, तेव्हा त्याचा अर्थ केवळ तो तारणारा आहे, असे मानणे एवढाच नसतो, तर त्याला आपला तारणारा मानून त्याच्यावर भरवसा ठेवणे, हा त्याचा अर्थ असतो. आपल्या मुक्तीसाठी आपण त्याच्या कार्यावर आणि त्याच्या नीतिमत्वावर अवलंबून राहिले पाहिजे. हाच तो भरवसा, म्हणजे *'फिडुशिया'* आहे.

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की, जर आपण आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवला आणि आपल्या मुखाने कबूल केले की ख्रिस्त प्रभू आहे, तर आपले तारण होईल (रोम. १०:९). तसेच, अनेक ठिकाणी पवित्र शास्त्र देवाच्या लोकांना विश्वासाची बाह्य कबुली देण्यास पाचारण करते. एखाद्या मंडळीत सामील होण्यासाठी सहसा काही ना काही प्रकारच्या सार्वजनिक विश्वास अंगीकाराची अपेक्षा असते. दुर्दैवाने, आपल्या आजच्या संस्कृतीत ख्रिस्ती धर्म हा केवळ वैयक्तिक आणि खाजगी स्वरूपाचा धर्म आहे, अशी एक समजूत प्रचलित आहे. लोक ख्रिस्तावरील आपल्या विश्वासाची सार्वजनिक साक्ष देण्यास कचरताना असे म्हणतात की हा मुळात वैयक्तिक आणि खाजगी विषय आहे. नक्कीच, ख्रिस्ती धर्म वैयक्तिक आहे. विश्वासामुळे मनुष्याचा ख्रिस्ताशी जो संबंध जुळतो, त्याहून अधिक वैयक्तिक अशी दुसरी कोणती गोष्ट असू शकेल, असे मला वाटत नाही. परंतु *ख्रिस्ती धर्म*

खाजगी नाही. आपला विश्वास कितीही वैयक्तिक असो, देवाचे अनुयायी म्हणून आपण ख्रिस्ताचे सेवक आहोत, हे सार्वजनिकपणे जाहीर करण्यास आपण नेहमीच बांधील आहोत. येशूकडून आपल्याला याविषयी गंभीर इशारेही मिळतात की, जर आपण लोकांसमोर त्याची लाज बाळगली, तर तो पित्यापुढे आपली लाज बाळगेल (मत्तय. १०:३३). आपण मनुष्यांसमोर ख्रिस्त हा आपला मुक्तिदाता आहे, याची कबुली द्यावयास तयार नसलो, तर तोही पित्यापुढे आपली कबुली देणार नाही. म्हणून ख्रिस्तावरील विश्वासाचा सार्वजनिकपणे अंगीकार करणे, ही ख्रिस्ती मनुष्यासाठी ऐच्छिक गोष्ट नाही.

येशूने अशा लोकांनाही गंभीर इशारे दिले आहेत, जे त्याच्यावरील विश्वासाची अशी कबुली देतात की जी प्रामाणिक किंवा अस्सल नसते. आपला प्रभू असे म्हणतो: “लोक [तोंड घेऊन माझ्याकडे येतात व] ओठांनी माझा सन्मान करतात, परंतु त्यांचे अंतःकरण माझ्यापासून दूर आहे” (मत्तय. १५:८).

येशूने दिलेला कदाचित सर्वात भीतीदायक संदेश डोंगरवरील प्रवचनाच्या शेवटी येतो. त्याने म्हटले की, शेवटच्या दिवशी पुष्कळ लोक येऊन म्हणतील, “प्रभुजी, प्रभुजी, आम्ही तुझ्या नावाने हे केले नाही काय? आणि तुझ्या नावाने ते केले नाही काय?” वगैरे. पण तो म्हणेल, “तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, ‘मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा” (पहा मत्तय. ७:२१-२३). प्रभू आपल्याला अशा धोक्याबद्दल सावध करतो जिथे लोक ख्रिस्तावरील विश्वासाची तोंडी साक्ष देतात, पण प्रत्यक्षात त्यांच्याकडे अस्सल विश्वास नसतो. दुसऱ्या शब्दांत, आपण विश्वासाच्या ‘कबुलीने’ *(Profession)* नव्हे, तर विश्वासाच्या ‘प्राप्तीने’ *(Possession)* नीतिमान ठरतो. आपण तो प्राप्त न करताही त्याची कबुली देऊ शकतो. या कलमातील नकाराचा आशय नेमका हाच आहे की, नीतिमान ठरविले जाणे हे केवळ विश्वासाच्या

बाह्य कबुलीने प्राप्त होत नाही.

हे आता व्यावहारिक दृष्टीने पाहू या. अमेरिकेत, विशेषतः मोठ्या प्रमाणावर केल्या जाणाऱ्या सुवार्ताप्रचाराच्या पद्धतींमध्ये, सुवार्ता प्रचार झाल्यानंतर ख्रिस्ताचा स्वीकार करण्यासाठी एक पाचारण वारंवार करण्यात येते; कधी कधी त्याला ऑल्टर कॉल असेही म्हणतात. या मागे असा एक समज असतो की, जर एखाद्याने ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारण्याची प्रार्थना केली, तर तो तारण पावेल. परंतु लोकांना भावनिकदृष्ट्या इतके हेलावून टाकणे शक्य असते की, ते विश्वासाची बाह्य कबुली द्यावयास प्रवृत्त होतात. परंतु, केवळ एखादी प्रार्थना म्हणून दाखविल्याने आपण देवासमोर नीतिमान ठरतो असे पवित्र शास्त्र कुठेही शिकवत नाही. फक्त हात वर केल्याने आपण नीतिमान ठरत नाही. वेदीकडे चालत गेल्यानेही आपण नीतिमान ठरत नाही. आपण विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जातो. या गोष्टी विश्वासाच्या कबुलीची बाह्य चिन्हे असू शकतात, परंतु खरी श्रद्धा अंतरी नसतानाही ती दिली जाऊ शकतात. म्हणून, आपण फक्त सभेच्या दरीवर पुढे चालत गेलो, किंवा हात वर केला, किंवा एखादी प्रार्थना केली, म्हणून आपण ख्रिस्ताच्या कळपात सुरक्षित आहोत, असे गृहीत धरता कामा नये. खऱ्या अर्थाने आवश्यक गोष्ट म्हणजे विश्वास.

शेवटी हा नकार असे म्हणतो: "तारणदायी विश्वासाचा कोणताही घटक हे एखादे पुण्यकर्म आहे किंवा ते आमच्यासाठी तारण मिळवून देते, हे आम्ही नाकारतो." येथे काहीसा गोंधळ निर्माण होऊ शकतो; कारण येशूने एकदा असे म्हटले होते : "देवाचे काम हेच आहे की, ज्याला त्याने पाठवले त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा" (योहान. ६:२९). काही लोकांनी याचा असा अर्थ असा लावला आहे की, आपल्याला नीतिमान ठरविणारे एकमेव चांगले कर्म म्हणजे विश्वासाचे कर्म होय. त्यांच्या म्हणण्यानुसार, अस्सल विश्वासाशी एखाद्या प्रकारची योग्यता जोडलेली असते; परंतु,

त्यामुळे विश्वास व कर्मे यांतील भेदच कोसळून जातो. परंतु, जेव्हा आपण लोकांशी ईश्वरशास्त्रीय चर्चा करीत विचारतो, “विश्वास हे पुण्यकर्म आहे, असे तुम्ही मानता काय?” तेव्हा स्वतःला ख्रिस्ती म्हणविणारे बहुतेक लोक एवढे तरी जाणतात की त्यांनी उत्तर द्यावे: “अजिबात नाही. माझा भरवसा येशूच्या पुण्यकर्मांवर आहे.” तरीसुद्धा, आपल्या अंतःकरणात आपण सहज अशी कल्पना लपवून बसू शकतो की आपल्या विश्वासात काही अंतर्निहित योग्यता आहे, आणि देव आपल्या विश्वासप्रयोगाकडे एखाद्या सद्गुणाप्रमाणे पाहून त्याचे बक्षीस देतो.

तुम्ही ख्रिस्ती आहात आणि दुसरा कोणी नाही, याचा विचार करा. याचे कारण असे आहे काय की तुम्ही तुमच्या शेजाऱ्याने न केलेले काही नीतिमान कार्य केले आहे? बहुतेक लोक उघडपणे असे म्हणणार नाहीत की, “मी माझ्या शेजाऱ्यापेक्षा अधिक चांगला आहे, म्हणून मी ख्रिस्ती आहे.” मात्र, कधी कधी हीच कल्पना अलगद आपल्या मनात शिरते, आणि तारणदायी विश्वासाकडे येण्यात आपल्या ठायी काही पुण्य किंवा सद्गुण आहे, असे क्षणभर जरी आपण मानले, तरी ती आपल्या स्वतःविरुद्धची एक घातक फसवणूक ठरते. ऑगस्टस टोपलेडी यांनी ‘युगानुयुगांच्या खडका’ *(Rock of Ages)* या गीतामध्ये अचूक लिहिले आहे: “काहीही मी माझ्या हातात आणत नाही; केवळ तुझ्या वधस्तंभाला मी बिलगून राहतो.” विश्वास हे ते पात्र *(receptacle)* आहे ज्याद्वारे आपण दुसऱ्या कोणाची (ख्रिस्ताची) योग्यता प्राप्त करतो, ते असे काही नाही जे आपल्याला स्वतःच्या गुणवत्तेमुळे देवाच्या तारणदायी  कृपेवर दावा करण्यास पात्र ठरवते.

तारणदायी विश्वासाच्या घटकांकडे पाहताना ही गोष्ट समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे की आपले तारण प्रभूकडून येते; ते देवाच्या कृपेवर आणि ख्रिस्ताच्या कार्यावर आधारलेले आहे. देवाच्या नीतिमत्वाच्या मागण्या पूर्ण करणारी गोष्ट आपली कर्मे नाहीत. त्या केवळ ख्रिस्ताच्या कार्यानेच पूर्ण

होतात. विश्वास एवढेच करतो की दुसऱ्या कोणीतरी आपल्या वतीने संपादन केलेली योग्यता तो ग्रहण करतो. आपण या गोष्टीविरुद्ध जागरूक राहिले पाहिजे की, आपण कशातरी प्रकारे देवाच्या आशीर्वादास पात्र आहोत, किंवा आपण त्याची कृपादृष्टी कमाविली आहे, अशी कल्पना आपल्या मनात किंवा अंतःकरणात शिरू नये.

आपण विश्वासाने, म्हणजे ‘खऱ्या विश्वासाच्या प्राप्तीने’ नीतिमान ठरविले जातो, केवळ त्याच्या कबुलीने नाही. आणि ख्रिस्ती म्हणून आपण ख्रिस्ताची लाज धरता कामा नये. आपण आपला त्याच्यावरील विश्वास लोकांना कळवलाच पाहिजे.

## प्रकरण ११

# ख्रिस्त आणि धर्मसिद्धांत

सुवार्तेच्या मजकुराविषयीच्या एखाद्या ईश्वरशास्त्रीय परीक्षेत आपण १०० पैकी १०० गुण मिळवू शकतो, आणि तरीही आपल्या ठायी खरा तारणदायी विश्वास नसणे, हे शक्य आहे. सुवार्तेचे ज्ञान, अगदी त्या ज्ञानाचा बौद्धिक स्वीकारही, आपले तारण करीत नाही. आपले तारण, अर्थातच, ख्रिस्त करतो. पुष्टीकरण १७ असे म्हणते:

> आम्ही हे मान्य करतो की, जरी खरा सिद्धांत आध्यात्मिक आरोग्य आणि कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, तरी सिद्धांतामुळे आपले तारण होत नाही. ख्रिस्ताद्वारे आपले तारण कशा रीतीने होऊ शकते, हे सांगण्यासाठी सिद्धांत आवश्यक आहे; परंतु तारणारा ख्रिस्तच आहे.

त्यास अनुसरून नकार असा आहे:

सुवार्तेचे सिद्धांत कोणतीही हानी न होता नाकारले जाऊ शकतात, हे आम्ही नाकारतो. सुवार्तेचा नकार आध्यात्मिक विनाश घडवून आणतो आणि आपल्याला देवाच्या न्यायासमोर उभे करतो.

आपल्याला ठाऊक आहे की आपल्या आत्म्यांचा तारक ख्रिस्त आहे. याचा अर्थ असा नव्हे की ख्रिस्ताविषयीचे आणि सुवार्तेविषयीचे सिद्धांत महत्त्वहीन आहेत. सिद्धांत आपल्याला तारत नाही, मात्र आध्यात्मिक आरोग्य आणि कल्याण यांसाठी तो अत्यंत आवश्यक आहे. मार्टिन लूथर यांनी असे भाष्य केले होते की, त्यांच्या समकालीन इरास्मस यांनी "पोपच्या पोटावर (भ्रष्टाचारावर) हल्ला केला, पण मी त्याच्या सिद्धांतावर हल्ला केला." आजच्या काळात एखाद्याच्या सिद्धांतावर हल्ला होण्यापेक्षा त्याच्या पोटावर हल्ला होणे अधिक निंदनीय मानले जाईल, कारण आपण अशा युगात जगत आहोत, जिथे लोकांच्या दृष्टीत सिद्धांताची फारशी पर्वा उरलेली दिसत नाही. दुसऱ्या एका प्रसंगी लूथर यांना आव्हान देण्यात आले, कारण त्यांच्या काही अनुयायांनी अत्यंत निंद्य वर्तन प्रदर्शित केले होते. त्यांनी मान्य केले की धर्मसुधारणेच्या चळवळीत अनेक लोक भ्रष्ट होते आणि सुवार्तेसाठी कलंक ठरत होते; पण अशीच वस्तुस्थिती विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक गटात दिसून येते, हेही त्यांनी निदर्शनास आणले. त्यांनी एवढे नमूद केले की त्यांच्या ठायी जे होते, ते योग्य सिद्धांत होते. याचा अर्थ असा नव्हता की योग्य सिद्धांतामुळे भ्रष्ट आचरणासाठी सबब मिळते. एखाद्या मनुष्याकडे अचूक सिद्धांत असूनही तो भ्रष्ट जीवन जगू शकतो, परंतु जो देवाच्या सत्याकडे (सिद्धांताकडे) दुर्लक्ष करतो, त्याचे जीवन देवाला प्रिय असू शकत नाही, कारण सिद्धांत म्हणजे दुसरे काहीही नसून शास्त्रानुसार दिलेले देवाचे सत्य आहे.

आपल्याला अनेकदा असे वाटते की सिद्धांत म्हणजे काही अमूर्त प्रतिपादनांची यादी होय, जी ग्रंथालयांच्या धूळखात पडलेल्या खोल्यांमध्ये किंवा वर्गांमध्ये कोंडलेल्या अवस्थेत राहते, आणि जिने आपल्या दैनंदिन व्यवहार्य जीवनावर फारसा काही परिणाम घडत नाही. पण असे म्हणणे म्हणजे जणू पवित्र शास्त्राचा आपल्या जीवनावर काहीच परिणाम होत नाही, असे म्हणण्यासारखेच आहे. आपण ऑर्थोडॉक्सी आणि ऑर्थोप्राक्सी, म्हणजे योग्य सिद्धांत आणि योग्य आचरण, यांमध्ये भेद करू शकतो; परंतु त्यांची फारकत करून चालणार नाही. कारण खरे जीवन हे देवाने पवित्र शास्त्रात आपल्याला प्रकट केलेल्या सत्याच्या खऱ्या आकलनातूनच उमलले पाहिजे. आणि सुवार्तेचे आकलन करण्याच्या बाबतीत तर हे विशेषत्वाने खरे आहे.

ख्रिस्ती म्हणून सुवार्ता *अचूक* रीतीने समजून घेणे आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे; कारण सुवार्ता ही तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे, ती पवित्र शास्त्रात आपल्याला प्रकट केली गेली आहे, आणि तिच्या संदेशामध्ये ख्रिस्ताचे व्यक्तित्व व त्याचे कार्य यांचा समावेश होतो, म्हणजे त्याचे निष्पाप जीवन, त्याचा प्रायश्चित्तकारक मृत्यू, आणि त्याचे पुनरुत्थान. या सर्व गोष्टी पवित्र शास्त्रात आपल्याला प्रकट झालेली सत्ये आहेत, आणि त्या एकत्र येऊन सुवार्तेचा संदेश घडवितात. आपल्या या घोषणापत्रात आपण सातत्याने हेच पाहिले आहे की, सुवार्तेच्या संदेशात समाविष्ट असलेल्या विशिष्ट घटकांवर त्यात विशेष भर देण्यात आला आहे.

समजा, प्रायश्चित्ताविषयीचा तुमचा सिद्धांतच चुकलेला आहे. समजा, तुमचा असा विश्वास आहे की येशू वधस्तंभावर आपल्या जागी देवाचा न्याय संतुष्ट करण्यासाठी मरण पावला नाही, तर केवळ स्वतःला नैतिक आदर्श म्हणून दाखविण्यासाठीच मरण पावला. अशा वेळी, वधस्तंभाविषयीचा आणि प्रायश्चित्ताविषयीचा तुमचा सिद्धांत चुकीचा असल्यामुळे तुम्ही सुवार्ता योग्य प्रकारे समजून घेतलेली नाही. प्रायश्चित्ताविषयीचा तुमचा सिद्धांत

ढासळला, की सुवार्तेविषयीचा तुमचा सिद्धांतही त्याबरोबरच ढासळतो. जर तुम्ही ख्रिस्ताचे पुनरुत्थान नाकारले, तर तुम्ही केवळ त्या एका सिद्धांताचे सत्यच गमावत नाही, तर तुमच्याकडून सुवार्ताच निसटून जाते, कारण पुनरुत्थान हा सुवार्तेचा एक अविभाज्य घटक आहे. आणि जर तुम्ही प्रायश्चित्तावर विश्वास ठेवता, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानावरही विश्वास ठेवता, पण तरी तारण पावण्यासाठी ख्रिस्ताच्या कार्याचे लाभ तुम्हाला काही ना काही रीतीने स्वतः कमवावे लागतील, असे मानता, तर तरीही तुम्ही सुवार्ता अचूक रीतीने समजलेले नाही, कारण ख्रिस्ताचे कार्य तुमच्या जीवनात नेमके कशा रीतीने लागू होते, हाच मुद्दा तुम्ही चुकविला आहे.

काही लोक असे म्हणतात: “मला कोणताही सिद्धांत जाणून घेण्याची गरज नाही. मला फक्त येशू माहीत असला म्हणजे पुरे.” पण प्रश्न असा आहे की, येशू कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्यास ज्या क्षणी कोणी सुरुवात करतो, त्या क्षणी तो सिद्धांताच्या क्षेत्रात प्रवेश करतो. त्या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजे ख्रिस्ताविषयीच्या आपल्या सिद्धांताचे स्पष्टीकरण देणे होय. ज्यांना असे वाटते की ख्रिस्ती लोकांना ईश्वरशास्त्र जाणून घेण्याची गरज नाही, त्यांनी मुद्दाच चुकविला आहे. याचा अर्थ असा नाही की तुम्ही उद्योगाने पेशेवर ईश्वर-शास्त्रज्ञ किंवा मोठे पंडित असले पाहिजे, परंतु इतक्या अर्थाने तरी तुम्ही ईश्वरशास्त्रज्ञ असलेच पाहिजे की देवाविषयी तुम्हांला काही आकलन असावे, ख्रिस्ताविषयी काही समज असावी. सुवार्ता समजून घेण्यासाठी देवाविषयीचा एक सिद्धांत, मनुष्याविषयीचा एक सिद्धांत, आणि ख्रिस्ताविषयीचा एक सिद्धांत तुमच्याठायी असलाच पाहिजे. म्हणून प्रश्न असा नाही की तुमच्याकडे ईश्वरशास्त्र आहे की नाही. खरा प्रश्न हा आहे की तुमच्याजवळ सुदृढ ईश्वरशास्त्र आहे की विपर्यस्त ईश्वरशास्त्र, योग्य सिद्धांत आहे की मिथ्या सिद्धांत.

मंडळीमध्ये आपण ज्या मोठ्या वादांना सामोरे जातो त्यांपैकी एक म्हणजे तारणासाठी नेमके कोणते सिद्धांत आवश्यक आहेत, म्हणजे कोणते सिद्धांत असे आहेत की त्यांचा नकार केला, तर मनुष्य ख्रिस्ती राहू शकत नाही. आज मंडळी अनेक विविध संप्रदायांत विभागली गेली आहे; आणि प्रत्येक संप्रदायाचा या किंवा त्या सिद्धांताविषयी स्वतःचा विशिष्ट दृष्टिकोन आहे. याचा व्यापक अर्थ असा की, त्रुटींचे अनेक मुद्दे मंडळीत शिरले आहेत. देवाच्या सत्याचा कोणताही विपर्यास ही, अर्थातच, गंभीर गोष्ट आहे; पण सर्वच विपर्यास सारख्याच प्रमाणात गंभीर नसतात. म्हणूनच, जे आवश्यक आहे आणि जे आवश्यक नाही, यांमधील भेद आपण ओळखतो.

कोणीतरी मला एकदा विचारले होते, "तुमचा बायबलच्या त्रुटीविरहित-पणावर विश्वास आहे काय?" मी उत्तर दिले, "हो, आहे." तेव्हा त्याने पुढे विचारले, "आणि ते तारणासाठी अत्यावश्यक आहे, असे तुम्हांला वाटते काय?" मी म्हणालो, "नाही. एखाद्या व्यक्तीने तारण पावण्यासाठी बायबल देवाने प्रेरित केले आहे आणि ते त्रुटीविरहित आहे, यावर विश्वास ठेवणे अपरिहार्य आहे, असे मला वाटत नाही." मी एवढे म्हणेन की तारणाच्या गाभ्याशी निगडित बाबींच्या दृष्टीने पाहिले, तर एखाद्याने बायबल हे देवाचे वचन आहे, यावर विश्वास ठेवला नाही तरी तो तारणापासून वंचितच राहील, असे नाही. याचा अर्थ असा होतो काय की पवित्र शास्त्राच्या त्रुटीविरहितपणाला मी गौण मानतो? मुळीच नाही. माझे म्हणणे एवढेच की मंडळीचे, किंवा ख्रिस्ती मनुष्याचे, अस्तित्व आणि त्यांचे कल्याण यामध्ये आपण भेद करू शकतो. पवित्र शास्त्राविषयीचा सुदृढ सिद्धांत हा मंडळीच्या आणि ख्रिस्ती मनुष्याच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे; जरी तारण पावण्यासाठी ज्या सिद्धांतावर विश्वास ठेवणे अपरिहार्य आहे, तो हा सिद्धांत नाही. परंतु ख्रिस्ताचे प्रायश्चित्त ही केवळ ख्रिस्ती मनुष्याच्या, किंवा मंडळीच्या, कल्याणाची बाब आहे काय? नाही; ती त्यापेक्षा कितीतरी

अधिक आहे. ती अशी गोष्ट आहे की जिच्यावर तारण पावण्यासाठी विश्वास ठेवणे आवश्यकच आहे. मंडळीच्या अस्तित्वाचा आणि तिच्या कल्याणाचा हा भेद इतिहासभर उपयुक्त ठरला आहे.

पुन्हा एकदा सांगतो, आपले घोषणापत्र म्हणते, त्याप्रमाणे आपले तारण कशा रीतीने होऊ शकते, हे सांगण्यासाठी सिद्धांत आवश्यक आहे. सुवार्तेविषयी आपण जी काही माहिती सांगतो, ती सर्व सिद्धांताच्या कक्षेत येते. म्हणूनच, जर सिद्धांतच नसेल, तर सुवार्तेची समजही नसते. सिद्धांत नसेल, तर नेमके कशावर विश्वास ठेवायचा, याचीही आपल्याला कल्पना नसेल. भूकंपामुळे त्याचे तुरुंग कोसळल्यानंतर प्रेषित पौलाकडे भीती आणि घाबरलेल्या अवस्थेत ओरडणाऱ्या फिलिप्पैच्या बंदीशाळेचा नायक आपल्याला आठवतो. तो म्हणाला, “माझे तारण व्हावे म्हणून मी काय केले पाहिजे?” (प्रेषितांची कृत्ये १६:३०). तो माहिती मागत होता. तारणासाठी नेमक्या कोणत्या अटी आहेत, हे त्याला जाणून घ्यायचे होते, आणि प्रेषिताने त्याला तारण पावण्यासाठी काय करणे आवश्यक आहे, ते सांगितले.

कलम १७ मधील नकार असे म्हणतो: “सुवार्तेची तत्त्वे हानीशिवाय नाकारली जाऊ शकतात याचा आम्ही नकार करतो. सुवार्तेचा नकार आध्यात्मिक नाश आणतो आणि आपल्याला देवाच्या न्यायाच्या समोर उभे करतो.” घोषणापत्र जेव्हा आध्यात्मिक विनाशाविषयी बोलते, तेव्हा त्याचा निर्देश अंतिम आध्यात्मिक विनाशाकडे असतो. जो कोणी सुवार्तेचा नकार करतो, तो देवाच्या न्यायासमोर उघडा पडतो.

देवाची सुवार्ता ही केवळ अनेक पर्यायांपैकी एक पर्याय नाही. आपण पाहिले आहे की आज अनेक मंडळ्यांमध्ये सभेच्या शेवटी एक तथाकथित आमंत्रण दिले जाते, ज्यात पाप्यांना पुढे येऊन आपले जीवन ख्रिस्ताला समर्पित करण्यास बोलावले जाते. लोकांना उद्धट किंवा मनधरणी करणारे वाटायचे नसते, हे मला समजते; परंतु “आमंत्रण” या शब्दप्रयोगातूनच

काहीतरी चुकीचा अर्थ पोहोचतो. काही विदेशी संस्कृतीत आमंत्रण हे सहसा अशा निमंत्रणपत्रिकेसह येते, ज्यावर *"RSVP"* असे लिहिलेले असते; म्हणजे त्या निमंत्रणाला होकार द्यायचा किंवा नकार द्यायचा, हे तुमच्या इच्छेवर असते, आणि कोणतीही शिक्षा न भोगता तुम्ही ते निमंत्रण नाकारू शकता. पण पौलाने मार्स हिलवर जसे घोषित केले, तसे अज्ञानाचे दिवस आता मागे गेले आहेत, आणि देव आता "सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा अशी तो माणसांना आज्ञा करतो" (प्रेषितांची कृत्ये १७:३०). नव्या करारात सुवार्तेची घोषणा जगापुढे दैवी आज्ञेच्या स्वरूपात येते. देव सर्वत्र सर्व मनुष्यांना ख्रिस्ताचा स्वीकार करण्याची, सुवार्तेला कवटाळण्याची, आज्ञा देतो. सुवार्ता ऐकल्यानंतर तिचा नकार करणे म्हणजे आध्यात्मिक विनाशाला कवटाळणे आणि देवाच्या न्यायासमोर उघडपणे उभे राहणे होय.

सिद्धांताच्या अभ्यासात काही धोके देखील असतात. नव्या करारात आपल्याला सांगितले आहे की ज्ञान फुगविते, परंतु प्रीती उन्नती करते (१ करिंथ. ८:१). जगाला आपण विषयावर प्रभुत्व मिळवले आहे हे दाखवण्यासाठी, आपण ईश्वरशास्त्र किंवा सिद्धांताच्या अभ्यासात केवळ बौद्धिक रसही घेऊ शकतो. इतरांच्या दृष्टीत स्वतःला मोठे करून दाखवण्याची इच्छा आपल्या सिद्धांत-अभ्यासामागे दडलेली असू शकते; आणि त्या अर्थाने तो अभ्यास आपल्याला अभिमानाने फुगवू शकतो. म्हणूनच ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे की सिद्धांताने स्वतःहून कधीही कोणाचे तारण केले नाही, तारणारा केवळ ख्रिस्त आणि ख्रिस्तच आहे. तरीदेखील, सिद्धांताची समज मिळविण्यासाठी आपण मोठ्या आवेशाने आणि परिश्रमपूर्वक प्रयत्न करायला हवेत, कारण तसे करणे म्हणजे देवाने आपल्या वचनात आपल्याला प्रकट केलेल्या गोष्टी समजून घेण्यासाठी आपण मनापासून प्रयत्न करीत आहोत, हाच त्याचा अर्थ होय.

प्रकरण १२

# सुवार्तेची घोषणा

महान आज्ञा ही ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना आणि आपल्या मंडळीला, त्याच्या स्वर्गारोहणापूर्वी, दिलेली आज्ञा आहे. त्याने आपल्या शिष्यांना सर्व जगात जाऊन सर्व लोकांना सुवार्ता सांगण्याची, आणि सर्व वंश, लोक, भाषा, व राष्ट्र यांमधून शिष्य करण्याची आज्ञा दिली (मत्तय. २८:१८-२०; प्रकटीकरण ७:९). पहिल्या शतकापासून मंडळीचे मिशनरी कार्य याच आज्ञेने परिभाषित केले आहे; आणि “द गॉस्पेल ऑफ जीझस ख्राइस्ट: ॲन इव्हॅन्जेलिकल सेलिब्रेशन” या घोषणापत्राच्या शेवटच्या कलमाचा हाच केंद्रबिंदू आहे. पुष्टीकरण १८ असे म्हणते:

> आम्ही मान्य करतो की, येशू ख्रिस्त आपल्या अनुयायांना सर्व जिवंत मनुष्यांना सुवार्ता घोषित करण्याची, प्रत्येक ठिकाणी

### सुवार्ता म्हणजे काय?

> प्रत्येकाला सुवार्ता सांगण्याची आणि मंडळीच्या सहभागामध्ये विश्वास ठेवणाऱ्यांना शिष्य बनविण्याची आज्ञा देतो. ख्रिस्ताविषयीची पूर्ण आणि विश्वासू साक्ष यामध्ये वैयक्तिक साक्ष, भक्तिपूर्ण पवित्र जीवन, आणि आपल्या शेजाऱ्यासाठी दया व परोपकाराची कृत्ये, ज्यावाचून सुवार्तेची घोषणा निष्फळ वाटते, यांचा समावेश होतो.
>
> त्यास अनुसरून नकार असा आहे:
>
> आम्ही नाकारतो की वैयक्तिक साक्ष, भक्तिपूर्ण पवित्र जीवन, आणि आपल्या शेजाऱ्यासाठी दया व परोपकाराची कृत्ये, सुवार्तेच्या घोषणेवाचून, स्वतःमध्येच सुवार्ताप्रसार ठरतात.

माझे एकदा अशा एका मिशनरी स्त्रीबरोबर संभाषण झाले, जी जगाच्या एका अतिदुर्गम भागात सेवाकार्य करत होती. ती ज्या लोकसमूहात कार्यरत होती, त्यांनी यापूर्वी कधीही पाश्चात्त्य जगतातील कोणताही मनुष्य पाहिला नव्हता. त्या मिशनरीने त्या जमातीत अनेक वर्षे परिश्रम केले, आणि जेव्हा शेवटी त्यांना सुवार्तेची समज प्राप्त झाली, तेव्हा गावच्या प्रमुखासह अनेक लोक विश्वास ठेऊन ख्रिस्ताकडे आले. एका प्रसंगी त्या प्रमुखाने मिशनरीला विचारले की येशू पृथ्वीवर किती वर्षांपूर्वी होऊन गेला. दोन हजार वर्षांचा तो प्रदीर्घ कालावधी त्या लोकांच्या भाषेत कसा सांगावा, याचा मार्ग शोधण्याचा त्या मिशनरी-सेविकेने प्रयत्न केला. जोपर्यंत त्यांना मागील पिढ्यांची गणना करण्याची कल्पना सुचली नाही, तोपर्यंत तिला ते कसे सांगावे याचा कोणताही मार्ग सापडला नाही. तेव्हा त्या प्रमुखाने काही काठ्या घेतल्या, आणि प्रत्येक काठी एका पिढीचे प्रतिनिधित्व करील, असे ठरवले. त्याने विचारले, “येशू माझ्या पिढीच्या काळात आला होता काय?” तिने उत्तर दिले, नाही. मग त्याने दुसरी काठी घेतली आणि विचारले, “तो

माझ्या वडिलांच्या काळात आला होता काय?” नाही. मग तिसरी काठी घेत त्याने विचारले, “माझ्या आजोबांच्या काळात?” नाही. आणि तो जमिनीवर एकामागून एक काठ्या ठेवत गेला, तसतसा त्याचा चेहरा अधिकाधिक व्याकुळ होत गेला. जेव्हा अखेर पहिल्या शतकापर्यंत पोहोचणारी काठ्यांची एक लांब रांग जमिनीवर तयार झाली, तेव्हा तो अक्षरशः विव्हळ झाला आणि म्हणाला, “जर येशू इतक्या वर्षांपूर्वी आला होता, तर त्याच्याविषयी आम्हाला इतक्या काळानंतर का ऐकायला मिळत आहे?”

दुर्दैवाने, ख्रिस्ताच्या महान आज्ञेबाबत आपण जितके विश्वासू असायला पाहिजे होते तितके आपण राहिलेलो नाही. आजही या पृथ्वीवर असे अनेक लोक आहेत, ज्यांनी ख्रिस्ताचे नाव कधीच ऐकलेले नाही. महान आज्ञा पूर्ण करण्यासाठी आपल्या पिढीपेक्षा कमी सबब असलेली दुसरी कोणती पिढी असेल, असे म्हणणे कठीण आहे, कारण जग या पूर्वी कधी नव्हते इतके लहान झाले आहे. आपल्याकडे प्रवास करण्याची विलक्षण क्षमता आहे, आधुनिक सोयी आणि वाहतुकीची अनेक साधने आपल्यासाठी उपलब्ध आहेत.

कलम १८ आपल्याला याची आठवण करून देते की ख्रिस्त आपल्या अनुयायांना सर्व जिवंत मनुष्यांपर्यंत सुवार्ता पोहोचविण्याची, सर्वत्र प्रत्येकाला सुवार्ता सांगण्याची, आज्ञा देतो.

आज काही लोक सुवार्ताप्रसाराबद्दल नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्यांना असे वाटते की लोकांनी आपापल्या कामाशी काम ठेवावे, आणि इतर लोक ज्या धर्मात आहेत तो सोडून ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यासाठी त्यांच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करू नये. इतकेच नव्हे, तर अनेक मंडळ्या नकळत असा समज करून बसतात की काही विशिष्ट व्यक्ती किंवा गट सुवार्ताप्रसाराच्या आवाक्याबाहेर आहेत. परिणामी, आपल्यापैकी बरेच जण सुवार्ताप्रसाराच्या कार्यात निष्क्रिय किंवा संकुचित राहतात, आणि

सर्वत्र सर्व लोकांना सुवार्ता घोषित करण्याची आपली आज्ञा पूर्ण करीत नाहीत.

आपण केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरच अपयशी ठरतो असे नाही, तर आपण जिथे राहतो त्या स्थानिक स्तरावरही महान आज्ञा पूर्ण करण्यात अपयशी ठरतो. प्रत्येक ठिकाणी प्रत्येकाला सुवार्ता घोषित करणे आणि मंडळीच्या सहभागामध्ये विश्वासू लोकांचे शिष्यत्व करणे, अशी ही आज्ञा आहे. महान आज्ञेत दिलेला आदेश हा केवळ घोषणा करण्यापुरता मर्यादित नसतो, तर तो शिक्षण देणे किंवा शिष्य बनवणे हा देखील आहे. येशूने सुवार्ता गाजविण्यास आणि *शिष्य करण्यास सांगितले.* शिष्य म्हणजे शिकणारा किंवा विद्यार्थी, आणि त्यामुळे लोकांनी सुवार्तेला प्रतिसाद दिल्यानंतर त्यांना मंडळीच्या आंतरिक जीवनात सखोल सहभागासाठी पाचारण केले जाते, कारण मंडळीचे कार्य केवळ सुवार्तेची घोषणा करणे एवढ्यावरच थांबत नाही, तर जे ख्रिस्ताकडे आले आहेत त्यांना देवविषयक सत्यांच्या सखोल ज्ञानात सुदृढ व स्थिर करणे हेही तिचे कार्य आहे. प्रारंभीच्या मंडळीने सुवार्तेची घोषणा आणि शिष्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणामध्ये स्पष्ट भेद केला होता. जे लोक सुवार्तेवर विश्वास ठेवत असत, त्यांना नंतर मंडळीच्या कळपात सामील केले जात असे, आणि तिथूनच ख्रिस्ताचे विद्यार्थी व अनुयायी म्हणून त्यांचे शिक्षण आणि शिष्यत्व सुरू होत असे.

पुष्टीकरण १८ पुढे असे म्हणते: “ख्रिस्ताविषयीची पूर्ण आणि विश्वासू साक्ष यामध्ये वैयक्तिक साक्ष, भक्तिपूर्ण पवित्र जीवन, आणि आपल्या शेजाऱ्यासाठी दया व परोपकाराची कृत्ये, ज्यावाचून सुवार्तेची घोषणा निष्फळ वाटते, यांचा समावेश होतो.” कलम १८ मधील हा भाग ख्रिस्ताविषयी साक्ष देण्याच्या निरनिराळ्या मार्गांविषयी बोलतो. नवा करार *सुवार्ताप्रसार* आणि *साक्ष देणे* यांमध्ये भेद करतो. आजचे ख्रिस्ती लोक अनेकदा *‘साक्ष देणे’* हा शब्द *‘सुवार्ता सांगणे’* या अर्थानेच वापरतात, जणू

हे दोन्ही शब्द एकमेकांच्या जागी वापरले तरी काही फरक पडत नाही.

ख्रिस्ताची साक्ष देणे म्हणजे निरनिराळ्या मार्गांनी लोकांचे लक्ष त्याच्याकडे वेधणे होय. भक्तिपूर्ण पवित्र जीवन जगण्याद्वारे आपण जो आदर्श प्रस्थापित करू पाहतो, त्यातूनही आपण हे करतो. कृतींनी आणि दयेच्या कर्मांनीही आपण ख्रिस्ताची साक्ष देण्याचा, किंवा त्याची उपस्थिती प्रकट करण्याचा, प्रयत्न करतो: भुकेल्यांना अन्न देऊन, निराधारांना निवारा देऊन, आणि अशाच इतर परोपकारी कार्यांत सहभागी होऊन. हे साक्ष देण्याचे निरनिराळे प्रकार आहेत; परंतु ते सर्वच सुवार्ताप्रसार नाहीत. सुवार्ताप्रसार हा साक्ष देण्याचाच एक प्रकार आहे, पण प्रत्येक प्रकारची साक्ष देणे म्हणजे सुवार्ताप्रसार नव्हे. आपण ख्रिस्ताच्या प्रभुत्वाची साक्ष अनेक मार्गांनी देतो; आणि त्यांपैकी एक मार्ग म्हणजे सुवार्तेची घोषणा करणे होय.

आपण यावर इतका भर का देतो? हे महत्त्वाचे आहे कारण काही लोक म्हणतात, “मी माझ्या उदाहरणाद्वारे सुवार्ताप्रसार करतो. मी कधीही शब्दांनी ख्रिस्ताची घोषणा करत नाही. मी माझ्या जीवनानेच ख्रिस्ताची घोषणा करतो.” परंतु, प्रश्न हा आहे की तुमचे जीवन सुवार्तेच्या मजकुराविषयी लोकांना नेमके काय सांगू शकते? लोक आजपासून राज्य येईपर्यंत तुमच्याकडे पाहत राहिले, तरी ख्रिस्ताचे प्रायश्चित्त, ख्रिस्ताचे पुनरुत्थान, किंवा केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरविले जाणे या सिद्धांताविषयी त्यांना काहीही कळणार नाही. केवळ तुमचे जीवन पाहून कोणी हे सर्व कसे जाणू शकतो? तुमच्या देवभिरू आचरणामुळे कदाचित कोणीतरी तुम्हाला विचारेल, “तुमची जीवनपद्धत अशी का आहे?” आणि तो क्षण त्यांना सुवार्ता समजावून सांगण्यासाठी तुम्हाला संधी देऊ शकतो. परंतु तुमच्या देवभिरू जीवनाचे उदाहरण, स्वतःहून लोकांशी सुवार्तेचा संवाद साधणार नाही. काही वेळा आपण गप्प राहण्यासाठी आणि लोकांना सुवार्ता घोषित न करण्यासाठी सबबी देतो. आपण म्हणतो, “मी माझी मते इतरांवर शब्दरूपात

लादणार नाही. माझ्या प्रकाशमान जीवन आदर्शाला ते पाहून ते जोपर्यंत मला काही विचारणार नाहीत, तोवर मी शांत राहतो." मात्र, आपल्याला हेही मान्य करावे लागेल की आपल्यापैकी फार थोडे जण पवित्रीकरणात इतके पुढे गेले आहेत की जग आमचा दरवाजा ठोठावत उभे आहे, आणि आमच्यात असे कोणते वैशिष्ट्य आहे, तसेच ते त्यांनाही कसे प्राप्त होईल, हे आम्ही त्यांना सांगावे म्हणून विनवणी करीत आहे.

दुसरीकडे, जर आपण आपल्या शेजाऱ्यांच्या दैनंदिन मूलभूत गरजांकडे लक्ष न देता पूर्ण उदासीन राहिलो, आणि आपण जे काही करतो ते फक्त येशूविषयी त्यांना उपदेश करणेच असेल, तर आपला उपदेश त्यांना ओसाड आणि निष्फळ वाटेल. होय, देवाने जगाचे तारण उपदेशाद्वारेच साध्य करणे निवडले आहे, आणि लोकांना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी तो ज्या सामर्थ्याचा उपयोग करतो, ती सुवार्ताच आहे. तरी नवा करार आपल्याला सावध करतो: "माझ्या बंधूंनो, माझ्या ठायी विश्वास आहे, असे कोणी म्हणत असून तो क्रिया करत नाही तर त्यापासून काय लाभ? तो विश्वास त्याला तारण्यास समर्थ आहे काय? भाऊ किंवा बहीण ही उघडी आहेत, त्यांना रोजच्या अन्नाची वाण आहे, आणि तुमच्यामधील कोणी त्यांना म्हणतो, 'सुखाने जा, ऊब घ्या व तृप्त व्हा;' पण त्यांच्या शरीराला पाहिजे ते त्यांना तुम्ही देत नाही तर त्यापासून काय लाभ?" (याकोब. २:१४-१६).

लोकांना आपण फक्त "ऊब घ्या, तृप्त व्हा" असेच सांगत असलो, तर ती कसली साक्ष म्हणायची? ती निष्फळ साक्ष ठरेल. कलम १८ मधील नकार असे म्हणतो: "आम्ही नाकारतो की वैयक्तिक साक्ष, भक्तिपूर्ण पवित्र जीवन, आणि आपल्या शेजाऱ्यासाठी दया व परोपकाराची कृत्ये, सुवार्तेच्या घोषणेवाचून, स्वतःमध्येच सुवार्ताप्रसार ठरतात." आपल्यापैकी बहुतेकांना हे सहज कळू शकते की केवळ आपल्या जीवनाचा आदर्श हा सुवार्ताप्रसार नाही. लोकांच्या अन्न, वस्त्र, सांत्वन, रोजगार, आणि इतर दानशूर अशा

परोपकाराच्या कृत्यांच्या संदर्भात ऐहिक गरजा पूर्ण करण्यात गुंतले पाहिजे, परंतु केवळ एखाद्याच्या हाती भाकरीचा तुकडा किंवा थंड पाण्याचा पेला देऊन सुवार्तेचा मजकूर व्यक्त होत नाही. ज्याला तुम्हीं अन्न-पाणी देता त्या व्यक्तीला अद्यापही सुवार्ता माहीत नसते.

कलम १८ मधील नकारात उल्लेख केलेला साक्ष देण्याचा दुसरा प्रकार म्हणजे वैयक्तिक साक्ष देणे. एखादा मनुष्य विश्वासात कसा आला, आणि ख्रिस्ती झाल्यानंतर त्याच्या जीवनात काय परिवर्तन घडले, हा त्या साक्षीचा आशय असतो. लोकांपर्यंत देवविषयक गोष्टी पोहोचविण्याचा हा एक महत्त्वाचा भाग आहे, आणि वैयक्तिक साक्षीचे मोठे मूल्य आहे. तरी, वैयक्तिक साक्ष म्हणजे सुवार्ता नव्हे. देवाने असे वचन दिलेले नाही की आमची वैयक्तिक साक्ष त्याच्याकडे रिकामी परत येणार नाही. जगाचे तारण साध्य करण्यासाठी देवाने आपल्या वैयक्तिक साक्षीच्या सामर्थ्याची निवड केलेली नाही. आमची वैयक्तिक साक्ष अप्रत्यक्ष रीतीने ख्रिस्ताविषयी बोलते, परंतु प्रत्यक्षात ती विशेषतः आपल्याविषयी आणि आपल्या विशिष्ट परिस्थितीविषयी बोलत असते, आणि आपण ज्याच्याशी बोलत आहोत त्याच्याशी ती संबंधित असू शकते किंवा नसू शकते. परंतु सुवार्ता प्रत्येक मनुष्याशी संबंधित आहे. सुवार्ता हे वस्तुनिष्ठ आणि बंधनकारक सत्य आहे, आणि आपल्याला त्याचीच घोषणा करायची असते.

आपण परीक्षण करीत आलेल्या “द गॉस्पेल ऑफ जीझस क्राइस्ट: ॲन इव्हॅन्जेलिकल सेलिब्रेशन” या घोषणापत्राचा शेवट पुढील विधानाने होतो:

> सुवार्तेमध्ये ऐक्यबद्ध झालेल्या इव्हॅन्जेलिकल्स म्हणून, आम्ही एकमेकांवर लक्ष ठेवण्याचे आणि एकमेकांची काळजी घेण्याचे, एकमेकांसाठी प्रार्थना करण्याचे आणि एकमेकांना क्षमा करण्या-चे, तसेच सर्वत्र देवाच्या लोकांपर्यंत प्रीतीने आणि सत्याने पोहो-

चण्याचे वचन देतो, कारण आपण एक कुटुंब आहोत, पवित्र आत्म्यामध्ये एक आहोत, आणि ख्रिस्तामध्ये एक आहोत.

शतकांपूर्वी हे सत्यच म्हटले गेले होते, आवश्यक गोष्टींमध्ये एकता असावी, आणि ज्या गोष्टी कमी आवश्यक आहेत त्यामध्ये स्वातंत्र्य असावे, आणि सर्व गोष्टींमध्ये प्रीती असावी. सुवार्तेतील ही सर्व सत्ये आम्ही आवश्यक मानतो.

या समारोपाच्या वचनबद्धतेचा आशय हा आहे: या घोषणापत्राच्या निर्मितीत विविध विश्वासपरंपरा आणि संप्रदायांतील लोक सहभागी झाले होते, आणि ईश्वरशास्त्रीय प्रश्न अजूनही निरनिराळ्या मुद्द्यांवर आपल्यामध्ये फूट पाडू शकतात, हे त्यांनी मान्य केले होते. तरी, सुवार्तेने त्यांना एक बंधनात आणले होते. हाच तो आवश्यक बिंदू आहे, ज्यावर ख्रिस्ती लोक सहभागितेमध्ये एकत्र येऊ शकतात, कारण केवळ आणि केवळ देवाच्या पवित्र वचनात दिलेली खरी सुवार्ताच मनुष्याला तारू शकते.

# लेखकाविषयी

**डॉ. आर. सी. स्प्रौल** हे 'लिगोनियर मिनिस्ट्रीज'चे संस्थापक, सॅनफोर्ड, फ्लोरिडा येथील 'सेंट अँड्रयूज चॅपल'चे पहिले मुख्य उपदेशक आणि शिक्षक, 'रिफॉर्मेशन बायबल कॉलेज'चे पहिले अध्यक्ष आणि *'टेबलटॉक'* मासिकाचे कार्यकारी संपादक होते. त्यांचा *'रिन्यूइंग युअर माइंड'* हा रेडिओ कार्यक्रम आजही जगभरातील शेकडो रेडिओ केंद्रांवर आणि इंटरनेटवर दररोज प्रसारित केला जातो. त्यांनी १०० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत, ज्यामध्ये *'द होलीनेस ऑफ गॉड', 'चोझन बाय गॉड',* आणि *'एव्हरीवन्स अ थिओलोजियन'* यांसारख्या प्रसिद्ध पुस्तकांचा समावेश आहे. पवित्र शास्त्राची अचूकता आणि देवाच्या लोकांनी त्याच्या वचनावर ठाम विश्वासाने उभे राहण्याची गरज, या विषयांवरील त्यांच्या स्पष्ट आणि प्रभावी मांडणीसाठी ते जगभरात ओळखले जातात.

-------------------------------------

लिग्निएर लायब्ररी

लिगोनियर मिनिस्ट्रीज ही एक आंतरराष्ट्रीय ख्रिस्ती शिष्यत्व संस्था आहे, जी डॉ. आर. सी. स्प्रौल यांनी १९७१ मध्ये स्थापन केली. तिचे ध्येय म्हणजे देवाच्या पवित्रतेचे संपूर्णत्व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे, शिकवणे आणि त्याचे समर्थन करणे होय. लिगोनियर लायब्ररीचे चिन्ह जगभरात आणि अनेक भाषांमध्ये विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते.

महाआज्ञेच्या प्रेरणेने, लिगोनियर जगभरातील लोकांना मुद्रित आणि डिजिटल स्वरूपात शिष्यत्व साधने उपलब्ध करून देते. विश्वासार्ह पुस्तके, लेख आणि व्हिडिओ शिक्षण मालिका पन्नासपेक्षा अधिक भाषांमध्ये भाषांतरित किंवा डब केल्या जात आहेत. आमची इच्छा म्हणजे येशू ख्रिस्ताच्या मंडळीला आधार देणे, जेणेकरून ख्रिस्ती लोकांना ते काय मानतात, का मानतात, ते कसे जगावे आणि ते इतरांपर्यंत कसे पोहोचवावे हे समजावे.

MR.LIGONIER.ORG

# तुमचा 'शुभवर्तमानावर' विश्वास आहे का?

अनेक लोकांना वाटते की देव चांगला असल्याने, जर आपण चांगले जीवन जगतो तर तो नक्कीच आपल्याला जवळ करेल. परंतु हे शुभवर्तमान नाही, कारण आपल्यापैकी कोणीही देवाची बरोबरी करण्याइतपत सात्त्विक नाही. जर आपण आपल्या स्वतःच्या भरवशावर राहिलो, तर आपल्या जीवनाला जे योग्य आहे तेच आपल्याला मिळेल: म्हणजे देवाचा न्याय.

या पुस्तिकेत, डॉ. आर. सी. स्प्रॉल यांनी सुवार्ता स्पष्ट केली आहे—जी आपल्यासारख्या पापी लोकांसाठी देवाची 'आनंदाची बातमी' आहे. आपण त्याच्या न्याय्य दंडापासून स्वतःला कधीही वाचवू शकत नाही, म्हणून देव आपल्याला त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याच्यावर विश्वास ठेवण्याचे आवाहन करतो, जो एकटाच त्याच्या नीतिमान जीवनाद्वारे, प्रायश्चित्तकारक मृत्यूद्वारे आणि विजयी पुनरुत्थानाद्वारे आपल्याला मुक्त करू शकतो.

डॉ. आर. सी. स्प्रॉल यांच्या द क्रूशियल क्वेश्चन्स पुस्तिकामालिकेत ख्रिस्ती लोक आणि गंभीरपणे चौकशी करणारे लोक वारंवार विचारत असलेल्या महत्त्वपूर्ण प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे दिली आहेत.

**डॉ. आर. सी. स्प्रॉल** हे 'लिगोनियर मिनिस्ट्रीज' चे संस्थापक, सॅनफोर्ड, फ्लोरिडा येथील 'सेंट अँड्र्यूज चॅपल'चे पहिले मुख्य उपदेशक आणि शिक्षक, 'रिफॉर्मेशन बायबल कॉलेज'चे पहिले अध्यक्ष आणि 'टेबलटॉक' मासिकाचे कार्यकारी संपादक होते. त्यांनी १०० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत.

लिग्निएर लायब्ररी